Six monthly......

Single copy ......

किरकोळ अंकास ......................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ........८१

Advertisement

Below 10 lines ...... 118

Per line over 10 ......4 as

Repetition Per line... 3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 1 AUGUST 1898 — NO 30

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख १ माहे आगष्ट सन १८९८ इ० — अंक ३०



## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. पात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

टीप:—तारीख १ आगस्ट १८९८ इ० पासून वरील ठेवीवर दरसाल दर शेंकडा तीन रुपये व्याज दिलें जाईल.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ — A. G. Watson, Agent.


## अध्यापन आणि परीक्षण यासंबंधानें कांहीं विचार

[ रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज, यांनीं "विद्यासमाजा" पुढें वाचलेला निबंध ] नंबर ५

या घोकंपट्टीच्या संबंधानें मे. एच्. फिच् यांचा या संबंधाचा विचार खालीं देतों. ते ह्मणतात:—

"परीक्षांच्या संबंधानें नीं कित्येक भ्रामक रूपकें योजण्यांत येतात त्यांच्या योगानें आपली भलतीच समजूत न होण्या विषयीं आपण खबरदारी घेतली पाहिजे. अशा रूपकां पैकीं क्रॅम् ह्मणजे अधाशीपणानें, न चावतां, न चव घेतां बकाबक खाणें हें होय. शाळाखात्याच्या परीक्षकांस एखादी गोष्ट आवडली नाहीं किंवा तिजवर त्यांचा विश्वास पटला नाहीं ह्मणजे त्या ठिकाणीं क्रॅम् या शब्दाचा उपयोग करणें सोयीचें झालें आहे. पण या विषयीं आपल्या मनाची खात्री करून घेण्याला आपण झटलें पाहिजे. या शब्दाचा जर आपण अप्रामाणिकपणाची तयारी, किंवा घाईनें केलेला वेडावाकडा अभ्यास असा अर्थ घेऊं तर आपण सर्वांनीं सारखा त्याचा तिरस्कार केला पाहिजे" घोकंपट्टीला उत्तेजन मिळणें न मिळणें हें परीक्षकांच्या हातीं आहे या करितां सर्व पाठ केलेल्यास घोकंपट्टी न ह्मणतां कोणती ही पाठ केलेली गोष्ट चांगली समजलली आहे किंवा नाहीं हें पाहण्यास परीक्षकांनीं वेळोवेळीं वेगवेगळे यत्न करावे. परीक्षेंत नियमित काळांत नियमित काम करावयाचें असतें या साठीं पॅरॅफ्रेज, इतिहासांतील प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, शास्त्रीय विषयांतील ऋतु, ग्रहणें, चंद्राच्या कला, इत्यादी बद्दलची माहिती वगैरे गोष्टी समजलेल्या असल्या तरी पुस्तकाच्या भोंपंत तोंडपाठ केल्या असतां त्या थोड्या वेळांत चांगल्या लिहिल्या जातात ह्मणून पाठ करणें सोयीचें वाटतें व त्यामुळें विद्यार्थी तसें करितात व गुरु करवितात. सुमारें २ वर्षां पूर्वीं मुंबई युनिव्हर्सिटींत एका संस्कृत परीक्षकानें कांहीं विद्यार्थ्यांनीं कांहीं संस्कृत श्लोकांचा किंवा गद्यात्मक उताऱ्याचा अर्थ पाठ केल्याप्रमाणें लिहिला होता ह्मणून त्यास सांगून सवरून त्या परीक्षकानें नापास केलें. हें त्याचें करणें न्यायाचें किंवा अन्यायाचें याचा आपणच विचार करा ज्याचा इंग्रजींत आयता अर्थ केलेला होता असे भाग परीक्षकानें द्यावयाचे नव्हते व जर दिले होते तर जरी मुलांनीं पाठ केलेलें लिहिलें होतें तरी तें त्यांस समजलें नाहीं असें मानण्यास परीक्षकास आधार काय? हल्लीं विद्यावृद्धि फार झाली असल्यामुळें व छापखान्यांचेंही काम बरेंच सुलभ झालें असल्यामुळें अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं आज जर आपण एकादें पुस्तक परीक्षेला नेमिलें तर एका महिन्याच्या आंत त्याचा अर्थ ह्मणा त्याजवर टिपा ह्मणा किंवा त्यांतील विषयावर प्रश्नोत्तरावळी ह्मणा तयार होईल व सोयी करितां विद्यार्थी त्याची मदत घेतील. तेव्हां अशा स्थितींत सगळें पाठ केलेलें घोकंपट्टी ह्मणणें न्याय होणार नाहीं. तें वेगळ्याच उपायानें तसें ठरवावें लागेल.

परीक्षेचे निकाल बरे वाईट होणें हें अंशतः परीक्षणावर ही अवलंबून आहे. मग तो अंश इतर अंशा पेक्षां कितीही लहान असो. शिक्षणाची परीक्षणा संबंधानें नेहमीं कुरकुर असते. तींत नेहमींच अर्थ असतो असें नाहीं. पण विचारातीं पाहिलें तरी कांहीं प्रसंगीं परीक्षणांत वास्तविक दोषास थोडी बहुत जागा असते. तथापि ती जितकी कमी होईल तितकी इष्ट आहे. सरासरी ६ इयत्तां पर्यंत परीक्षण तोंडींच असतें व पुढें बहुतेक लेखी असतें. एकंदरीनें शिक्षणाचा परीक्षणावर इतका भरंवसा असावा कीं परीक्षेची जबाबदारी परीक्षणावर टाकून शिक्षणास झोंपी जातां यावें. एक मलबत एका वादळांत सांपडें असतां सर्व लोकांची जेव्हां धांदल उडाली त्या वेळीं कप्तानाची मुलगी निजली होती तिला उठविलें तेव्हां जागी होऊन तिनें विचारिलें बाबा आपल्या जागीं उभे आहेत ना? होय असें उत्तर मिळाल्या नंतर ती ह्मणाली "तर मग सर्व ठीक होईल. काळजी करावयास नको." असे शब्द बोलून ती पुन्हा डोळ्यावरूण पांघरून घेऊन स्वस्थ झोंपीं गेली. याप्रमाणें शिक्षणरूप मुलीचा विश्वास परीक्षणरूप पित्याचे ठिकाणीं असला पाहिजे. परीक्षण कालीं परीक्षणाच्या मनांत वस्तूचे यथायोग्य गुण दुर्गुण विवेचन करणें व तदनुरूप त्याचें मूल्य त्यास देणें या पलीकडे अन्य विचार नसावा. व तें होण्या परीक्षकांच्या ठिकाणीं उत्पन्न होणारी भीति वगैरे ज्या प्रतिबंधक गोष्टी त्या कमी होण्यास साह्य करावें आणि असलेले गुणच पाहण्याकडे दया ळूपणाचें लक्ष ठेवावें. भीत्यादि अनेक प्रतिबंध असल्यामुळें खरें परीक्षण होण्यास अशी दया आवश्यक आहे. ही गोष्ट बऱ्याच अंशीं तोंडी परीक्षेस लागू आहे. दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी कीं विशाल प्रश्न वर्ज्य करावे या संबंधानें फिच साहेब लिहितात "साधारणतः सर्व प्रकारचे विशाल व संदिग्ध प्रश्न वर्जावे. १ तुला त्याबद्दल कसें काय वाटतें? २ आठवा हेनरी हा कोण त्या प्रकारचा मनुष्य होता? ३ सिव्हिल वॉर मध्यें काय काय घडलें त्याचें वर्णन करा. ४ लोखंडाचे काय काय उपयोग आहेत ते सांगा. हीं चार उदाहरणें त्यांनीं दिलीं आहेत. पुढें ते लिहितात "एका शिक्षकाला नातावरणाचा धडा शिकावतांना आह्मी पाहिलें. त्यानें बुडणाऱ्या एका मनुष्याचें वर्णन केलें आणि अखेरीस असें प्रतिपादन केलें कीं हवेच्या आभावा मुळें तो मेला. असें सांगून आपल्या ठिकाणीं आपणांस विजयी मानून पुढें असा प्रश्न केला कीं "बरें, आतां तुमच्या मनांत कोणता विचार येतो?" या प्रश्नावर फिच् साहेबाचा कटाक्ष आहे. फिच् साहेब ह्मणतात या प्रश्नाचें उत्तर मला कांहीं देतां आलें नसतें कारण माझ्या मनांत पुष्कळ विचार आले. पण शिक्षकाच्या मनांत कोणता विचार आहे कीं जो मुलांनीं त्याला सांगायास पाहिजे होता तो मला स्पष्ट न कळल्यामुळें मी गप्प बसलों. असतों व तसेच सर्व विद्यार्थी गप्प राहिले. फिच साहेब ह्मणतात, अशा प्रकारचे प्रश्न कीं ज्यांत पुष्कळ उत्तरें संभवतात. किंवा ज्यांचीं उत्तरें दीर्घ आणि अनेक गोष्टींचा अंतर्भाव करणारी असतात असे प्रश्न तोंडी परीक्षेंत विचारूं नयेत. तोंडी परीक्षेंतील प्रश्न अणीदार ह्मणजे ज्याचें एकच उत्तर संभवतें असें असावें. परीक्षकास बरोबर मनांतील उत्तर न मिळालें ह्मणजे जो त्रास होतो तो यां योगानें टळेल यांत शंका नाहीं. लेखी परीक्षे संबंधानेंही जितके प्रश्न विशाल व संदिग्ध उत्तर मागणारे नसतील तितकें बरें असें आह्मांस वाटतें. लेखी परीक्षेंत दुसऱ्या प्रकारची काळजी घेणें अवश्य आहे. उदाहरण गणित विषय घेऊं. या विषयांत थोडी चूक होण्याचा संभव असतो. एखादें उदाहरण दिसण्याला सोपें दिसतें पण त्यांत विचारक्रियेस व कृतीस बराच काळ लागतो. याकरितां अशीं उदाहरणें स्वतः करून पाहून त्यांस लागणाऱ्या काळाच्या मानानें त्यांस मूल्य देऊन कित्येक परीक्षक त्यांचा पेपरांत शिरकाव करितात असें ऐकण्यांत आहे असें करणें योग्य आहे हें उघड आहे.


( पुढें चालू )


वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १४ शके १८२०

बराकपूर येथील डाक्टर सरकार यांच्या खूना बद्दल तिघां सोल्जरांना सक्त मजूरीची ७।७ वर्षांची शिक्षा तरी झाली. पण मद्राकडे मोरादाबाद येथें खून करणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्याची ७००। ८०० रुपये दंडावर सुटका झाली. डाक्टर सरकारच्या खुनाच्या रात्रीं मोरादाबाद येथें रेसिडेंट इंजिनिअर जान टर्नबुल्ल मार्किनटायर हा रहात असे. त्याच्या घरा समोर रात्रौ १० वाजतां एक लग्नसमारंभ वाजत गाजत आला, मडम किंचित मांदी होती असें ह्मणतात व साहेब नुकतेच झोपीं गेले होते. गोंगाटानें झोंप मोडली, लागलीच साहेब बंदुक घेऊन बाहेर आले आणि 'बी बी' खुणेच्या २ गोळ्या बिनचूक झाडल्या आणि सातजण जखमी झाले व त्या पैकीं एकजण तीन दिवसांनीं मरण पावला. प्रथम साहेबांनीं दडपादडपी केली व बिजवाविजव चालविली पण एक मनुष्य मरण पावल्या बरोबर सर्वजण कोर्टांत न्याय मागण्यास गेले. आरोपीला ३०४ (अ) व ३३८ कलमा प्रमाणें अनुक्रमें ५०० व ३०० रुपये दंड झाला. साहेब ह्मणतात कीं बंदुक लोकांस भेडावण्यासाठीं घेतली होती पण मातीच्या ढीगावरून उतरतां उतरतां पाय घसरला व गोळी निसटली ती ७ मनुष्यास घायाळ करीत करीत चालती झाली. नेटिवांचा प्राण आणि त्याची काळजी गोऱ्या अधिकाऱ्यांस कशाला पाहिजे! कोर्टें कोर्ट तरी काय करणार! जेव्हां अगदीं पुराव्यामुळें नाईलाज होईल तेव्हां त्याला दंड ठोठावणार! १ इसम मेला व ६ इसम जखमी झाले आणि ही मौज म्यार्किनटायर यांस ८०० रुपयांवर मिळाली! लेफटेनंट एअर्स्ट व पिन्यांड यांचा खून करितांना दामोदर चाफेकर देहभानावर नव्हता व त्याला वेडेपणानें घेरलें होतें अशा सबबीवर दंडावर सोडलें

असतें तर पुराव्याच्या दृष्टीनें व वरील न्यायाच्या तत्वानें मोठीच शिक्षाच झाली असती. पण डाक्टर सरकारच्या खून करणारांस किंवा मि० मॉकिंटायर यांस योग्य शिक्षा झाली नाहीं असें खेदानें ह्मणावें लागतें.

---

सन १८९८ ची राष्ट्रीय सभा मद्रासेस भरविण्यांत येईल असा गेल्या वर्षी उमरावतीस ठराव झाल्या दिवसा पासून मद्रास इलाख्यांत पुष्कळ चळवळ चालू आहे. मद्रास इलाख्यांवर राष्ट्रीय सभा भरविण्याची प्रचंड जबाबदारी चार वर्षांनंतर ह्मणजे थोड्याच काळांत पुन्हा पडली आहे हें सर्व राष्ट्र ओळखून आहे. १८९६ तच कलकत्यास सभा भरली होती, मध्यप्रांत, वायव्यप्रांत दुष्काळानें ग्रासल्यामुळें अजून पूर्वस्थितीला पावले नाहींत, आणि मुंबई इलाखा प्लेग व दुष्काळ यांनीं जर्जर होऊन गेलेला आहे या गोष्टी लक्ष्यांत घेऊनच मद्रासच्या निस्सीम राष्ट्रभक्तांनीं यंदाची सभा मद्रासेकडे मागून घेतली हें त्यांस अत्यंत भूषणास्पद होय. गेल्या सोमवारच्या 'हिंदुपत्रांत' सर्व मद्रासी लोकांस या सभेची उभारणी उत्तम प्रकारें करण्या विषयीं प्रोत्साहनपर मोठा नामी लेख आला आहे. त्यांत जिल्ह्या जिल्ह्याच्या कांग्रेसवाल्यांचा नामनिर्देश करून त्यांस उत्तम कामगिरी बजावण्या विषयीं विनंती केली आहे आणि एकंदर चालू असलेल्या तयारी वरून आह्मी सर्वत्रांस पक्कें आश्वासन देऊं शकतो कीं यंदाची सभा इतर बैठकी प्रमाणेंच मोठी टोलेजंग व वर्णनीय होईल. वर्गणी जमविण्याची सिद्धता कडेकोट चालविली आहे आणि वर्गणीच्या भिक्षेची पद्धति अशी काढली आहे कीं राष्ट्रकाजा साठीं प्रत्येक घरामागें कांहीं तरी रक्कम आकारली जाईल. वर्गणीला भिक्षेची संज्ञा दिली आहे; पण ही राष्ट्रभिक्षा मागणारास व देणारास सर्वत्र पूज्य व पवित्र करिते असा कांहीं तिचा विलक्षण महिमा आहे.

मद्रास कांग्रेस-कमिटीचा अभिप्राय अध्यक्षाची निवडणूक करण्या संबंधानें असा पडतो कीं बाबू आनंद मोहन बोस या थोर सद्गृहस्थांस अध्यक्षत्वाचा बहुमान यंदा देण्यांत यावा. बाबू आनंद मोहन यांनीं विलायतेंत उत्कृष्ठ देशसेवा केली असून राष्ट्रीय सभेचा पक्ष विलायतवाल्यांच्या मनांत चांगला भरवून दिला आहे. बाबू आनंद मोहन यांस अध्यक्ष नेमण्याची सूचना सर्व राष्ट्र मोठ्या आनंदानें स्वीकारील व ही नेमणूक लवकर निश्चित झाली तर तिजपासून मोठा फायदा होण्याचा संभव आहे. बाबू आनंद मोहन हे प्रख्यात वक्ते आहेत, त्यांची देशसेवा अप्रतिम कोटींतील आहे, आणि लोकांचा विश्वास त्यांच्या ठिकाणीं मोठा आहे. यांचें खानगी वर्तन सार्वजनिक वर्तना प्रमाणेंच अत्यंत निर्मळ असून यांच्या सद्गुणाविषयीं सर्वत्र ख्याती आहे. असा लोककल्याणकारी महासंत राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं विराजमान पाहून कोणता सूज्ञ नेत्राचें साफल्य करूं इच्छिणार नाहीं. मि. बोस हे लवकरच विलायतेहून परत येणार आहेत तेव्हां त्यांस विसांवा न मिळतां दुसरी मोठी लोकसेवा करावी लागणार आहे.

---

मुंबई युनिव्हरसिटी मध्यें नामदार महादेव गोविंद रानडे यांनीं दोन उपयुक्त सुधारणा विषयीं मोठी क्रांती चालविली आहे देशी भाषांस युनिव्हरसिटीच्या अभ्यासक्रमांत स्थळ मिळावें ह्मणून त्यांचा प्रयत्न कित्येक वर्षांपासून चालूंच आहे पण त्यांस अद्याप या बाबदींत यशश्री माळ घालीत नाहीं हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय. प्रयत्नाची कांस नामदार रानडे यांनीं बळकट धरली आहे त्या अर्थी कालावधीनें आमच्या सुदैवानें देशी भाषा युनिव्हरसिटींतून चालूं होतील असा आमचा पक्का ग्रह आहे. देशी भाषे संबंधी प्रश्न नामदार रानडे यांच्या हातीं आहे ही गोष्टच सर्व राष्ट्रास समाधानकारक वाटत आहे. त्यांची दुसरी सुधारणा परीक्षे संबंधानें आहे. देशी भाषा प्रमाणें ही सूचना देखील पूर्वी फेकून देण्यांत आली होती पण तिचें पुनरुज्जीवन चांगलें झालें असून आतां ती सफळ होईल अशी आशा आहे. ही सूचना अशी कीं युनिव्हरसिटीच्या परीक्षेंत जे विद्यार्थी ज्या विषयांत चांगले पसार होतील त्यांस त्या विषयांत पुन्हा पास होण्याची जरूरी नसावी. विषयवारीनें परीक्षा देण्याची रीत विलायतेंतील व इंडियांतील दुसऱ्या युनिव्हरसिट्यांनीं पसंत केली आहे. ही रीत अपायकारक असल्या विषयीं कोणाचीच तक्रार नाहीं, आणि विद्यार्थ्यांस या रीतीनें पुष्कळ सवलती मिळून त्यांच्या शरीरप्रकृतीला ही चांगला फायदा होईल. नामदार रानडे यांची सूचना सिनेटमध्यें पसार झाली व आतां मुंबई सरकारच्या हातीं या प्रश्नाचा निकाल राहिला आहे.

---

## रा. शेवडेकृत अहल्या चरित काव्य.

( आमच्या एका मित्रांकडून ) नंबर १

---

अहल्या चरित काव्याचे कर्ते रा. शेवडे हे वऱ्हाडांतील ट्रेनिंग कालेजाच्या प्रिन्सिपालाचे जागीं आहेत हें निदान वऱ्हाडांतील वाचक मंडळीस तरी सांगण्याची अवश्यकता आहे असें नाहीं. रा. शेवडे हे शाळा खात्यांत शिक्षकाचें काम आज बरींच वर्षें करित असून त्यांस संस्कृत भाषेचाही व्यसंग आहे ह्मणून समजतें. महाराष्ट्र भाषेची पोषक जी संस्कृत भाषा तिचे परिशीलना विषयीं ज्यांची ह्मणून नित्य आसक्ति आहे त्यांस काव्य ह्मणजे काय व त्यांचे ठायीं कोणते गुण असावे लागतात या संबंधानें ज्ञान असणें असाधारण आहे असें नाहीं. त्यांत शाळा खात्यांतील उच्च वर्गाच्या शिक्षकाचें काम असल्यामुळें मराठी भाषेचे अध्ययनांत ज्यांनीं आपले आयुष्याचा बराच काल कांठिला आहे अशांस तर वरील गोष्टी अगदीं करतलामलक असणें साधारण आहे. रा. शेवडे अशाच शिक्षक वर्गापैकीं एक आहेत यावरून पाहतां त्यांनीं प्रस्तुत केलेलें काव्य त्यांनीं प्रस्तावनेंत लिहिले प्रमाणें "नूतन प्रयत्नांत" सहसा गणतां येईल असें नाहीं. सदर्हू काव्याचे खालील त्रोटक परीक्षण कर्तव्यकर्म या अर्थानें करण्याचें आरंभिलें आहे. ह्या कर्तव्यकर्मास मुख्य कारणें दोन आहेत. पहिलें रा. शेवडे यांनीं केलेले काव्यावरून भावी मराठी काव्यास भलतेंच वळण लागण्याची भीति व दुसरें सदरील काव्याचे बाह्य स्वरूपावरून तत्संबंधी लोकांचे मनांत होणारा गैरसमज. आमचे मतें प्रस्तुत काव्याचें परीक्षण निबंधमालाकारा सारख्या लेखनपटु विद्वानाचे हातीं पाहिजे होतें ह्मणजे अशा प्रकारचें काव्य व असले काव्यकर्ते महाराष्ट्र भाषा शिणविण्यास पुनः उपजण्याची भीतिच राहतीना. असो.

रा शेवडे यांनीं प्रस्तुत काव्य पृथ्वीछंदांत ग्रथित केलें असून त्याची रचना होईल तेथपर्यंत शुद्ध प्राकृत करून तें संस्कृताचे कांहीं मिश्रणानें प्रौढ अथवा गंभीर केलें आहे असें त्यांनीं आपले पुस्तकाचे प्रस्तावनेंत लिहिलें आहे. आमचे मतें वस्तुस्थिति अगदींच उलट आहे कारण प्रस्तुत काव्य शुद्ध प्राकृत ह्मणावें तर बरेच ठिकाणीं प्रचारांत कधीं ही व्यावहृत नसलेले असे अमरकोशांतील कानाकोपऱ्यांतील शब्द रचनेंत गोंविले आहेत बरें, प्रौढ अथवा गंभिर अशा अर्थानें काव्याचें पर्यालोचन करावें तर अश्लील शब्दांची व ग्राम्य दृष्टांतांची जागोजाग रेलचेल करून सोडिली आहे. यावरून प्रस्तुत काव्य "अश्लीलत्व" या काव्यदोषाचें मोठें उत्कृष्ठ उदाहरण आहे असें ह्मणण्यास कांहीं अडचण आहे असें आह्मास वाटत नाहीं.

१ अश्लीलत्व.

साहित्य शास्त्रांत काव्याचे ठिकाणीं असणाऱ्या ज्या दोषाचें वर्णन आहे यांत अश्लीलत्व याची गणना आहे. अश्लीलत्व ह्मणजे चावटपणा नव्हे. अश्लीलत्व ह्मणजे प्रौढ काव्यांत न खपण्यासारखा ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले हे होत. सत्कवींची शब्द पद्धति व अर्थ पद्धति लक्ष्यपूर्वक पाहिली असतां ही गोष्ट सहज लक्ष्यांत येण्यासारखी आहे कीं दोहोंमध्यें ग्राम्यतेचा लेशही खपत नसतो. नुसती वाक्यरचना ही कवितेंत व्यावहारिक भाषेहून निराळी असावी लागते. आतां त्यांतून शब्द व दृष्टांत हे तर प्राकृत व्यवहारांतले व ग्राम्य भाषेंतले मुळींच उपयोगीं पडत नाहींत. काव्याचा उद्देश मनोरंजन असल्यामुळें व जे विषय नेहमी या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्या पासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत. उलट असें देखील होतें कीं एखादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत प्रौढ अर्थ संगृहित केलेला असतो. पण वरल्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्या प्रमाणें होऊन जातें. वरील दोषाचीं उदाहरणें प्रस्तुत काव्यांत जागोजाग आहेत. मासल्या करितां खालीलवेंचे पाहा.

कविता ९

॥ हल्या स्तविति कीं वदा जरि असे मला लड्ड तो ॥

हींत सार्वभौम राजाचे वर्णनापेक्षां एखाद्या मांडलिक राणाचेंच चरित्र गाणें बरें हें दाखविण्या करितां कवीनें राजास "लड्ड हल्याची" अश्लील उपमा दिली आहे!

कविता. २२

कह्या करुनि तोषवी बहुत सासुला सासऱ्या।
तिला स्वदुहिते समा जपति तीं सुनांशीं सऱ्या॥
अनेकपरि देति तीं उभ सुनेस आशीर्वचा।
तयें सुलभ कीर्ति हो तिस जसा मुला पर्वचा॥

वरील कवितेंत अहिल्या बाईस तिचे सासू सासरे कसे जपत होते हें वाचकांचे मनांत बिंबण्या करितां दुसऱ्या ओळींत "सुनांशीं सऱ्या" ह्मणजे सुना जशा सऱ्यांना जपतात त्या प्रमाणें असा ग्राम्य व अव्यापक दृष्टांत दिला आहे. जगांतील सर्व सुनांना आपल्या नाकांतील नथेपेक्षां, डोक्यांतील बिंदीपेक्षां अगर गळ्यातील चंद्रहारादिक मौल्यवान् डागिण्यापेक्षां गच्च्यांतील एका सरीचेंच जिवा पलिकडे रक्षण करण्याचें विशेष माहात्म्य कधीं पासून वाटूं लागलें याचा उलगडा रा० शेवडे यांनीं टीपेंत केला असता तर बरें झालें असतें. अलिकडे तंबाखूच्या विड्या ओढणारे लोकही आगपेटीस विशेष जपूं लागले आहेत, वास्तव आमच्या कवींनीं सदरील दृष्टांताचा उपयोग वरील गहन अर्थ प्रतिपादन करते वेळीं केला असता तरी देखील संशयास जागा राहती ना! वास्तविकपणें "सुनांशीं सऱ्या" याचा अर्थ "सुनांला सऱ्यांनीं जपणें" असा उलट होत असून "सुना सऱ्यांना जशा जपतात त्या प्रमाणें असा अर्थ कसा निष्पन्न होतो हें कळत नाहीं. पुढील दोन ओळींत अहल्याबाईस कीर्ती सुलभ होण्याचें कारण तिचे सासू सासरे आशीर्वादाचा नित्य परांचा ह्मणत असत ह्मणून लिहिलें आहे. ज्या प्रमाणें मुलांस परोच्याच्या साह्यामुळें उजळणी लौकर येते त्याप्रमाणें आशीर्वादांच्या नित्य परोच्यामुळें अहल्याबाईस कीर्ती सुलभ झाली हा रा. शेवडे यांचा गहन कोटिक्रम!

कविता ६९ शेवटील दोन ओळी.

निजासन तये क्षणीं सुभृति शक्ति ज्ञा शोक दे।
पळे न मुकटा कसा त्वरित पाहिला कीं कदें॥

यांत धैर्यामुळें शोक कसा पळाला हें दाखविण्या करितां 'कदास पाहिलें असतां नसा मुकटा पळतो' असा उदात्त दृष्टांत दिला आहे! डायरेक्टर यांस पाहिलें असतां मास्तरानें पळ काढणें, बटास पाहिलें असतां जोड्यानें पळ काढणें किंवा चहा भिक्षुकें पाहिलीं असतां लड्डू पुऱ्यांनीं पळ काढणें वगैरे अश्लील मासल्याचे दृष्टांत काव्य रचनेंत घुसडणारे रा० शेवडे हे महाराष्ट्र भाषेतील आद्य कवि होत! या मासल्याचा दृष्टांत कवितां ९२ हींतही दिला आहे. पुढील दोन ओळी पाहा.

मुलांस उघडीं अगें करिशि मालुमुक्तां कशी
आह्मी उभयतां असूं जरठ पांढरी ताकशीं॥

यांत ह्मातारपणास 'ताकाची' उपमा दिली आहे!

कविता ७० पहिल्या दोन ओळी

सती श्वशुर जीवतां बहुत कारभारा बघी
ह्मणूनि नच घाबरे; विपुल संग्रहीं राब--धी॥

यांत सासरा जीवंत असतांही अहल्या बाई पुष्कळ कारभार पहात असे ह्मणून ती

घाबरत नसे व त्यामुळें तिजजवळ संपत्तीचे उपलक्षणभूत पदार्थ ह्मणजे "राब" व "घी ऊर्फ तूप" हे विपुल होते असें दाखविलें आहे. ह्मणजे यावरून ती मोठी संपत्तिवान् होती असे वाचकानें समजावें अर्थ "घी शक्कर" घरांत पुष्कळ असलें ह्मणजे तो मांडलिक राजा, लक्ष्मीकांत समजण्याची ही अपूर्व कोटि रा० शेवडे यांचे मताप्रमाणें क्षणभर व्यवहारांत प्रचलित झाल्यास खेडेंगांवातील बोच मारवाडी संस्थानिकाचे पंक्तीस बसवावे लागतील! व : संपत्तीचें उपलक्षण तर फार खुबीदार व मनोहर असें शोधून काढिलें आहे! या प्रमाणें वर्षासनांचे उपलक्षण ह्मणजे "लडूपुऱ्या" कविता २२२ हींत केलें आहे पुढील ओळ पहा.

पुसा सकल पावनां चिर मिळेन कीं त्यां पुरी।

येथें 'पुरी' ह्मणजे वर्षासनें वगैरे समजण्याविषयीं कवीनें टीपेंत वाचकांस विनंती केली आहे!

कविता १८६ शेवटील दोन ओळी पहा.
न कैक धनदांपरी ऋण ह्मणून मागें धना।
स्वपाक करण्यास कां बुध सजो विणें इंधना॥

येथें अहिल्या बाई हिणें ऋण काढून दान धर्म केला नाहीं अशा अर्थी काव्यकारानीं त्यास "शहाणा मनुष्य नसा इंधन ह्मणजे लांकडें गोवऱ्या प्रथम हस्तगत झाल्या वांचून स्वयंपाक करण्यास तयार होत नाहीं" असा घाणेरडा दृष्टांत दिला आहे!

कविता २२६ शेवटील ओळ पहा.
समर्थ जरि साह्य ना करिति खास रंग्या फसे।

येथें "रंग्या" हें तिरस्करणीय रूप "रंगनाथ स्वामी" बाबदल केलें आहे. वरील ओळ रंगनाथस्वामी याबद्दल "नाथ साधु" या शद्वाची योजना करून जुळविता आली असती जसें—समर्थ जरी साह्य ना करिती नाथ साधू फसे।

असेंच कविता ११६ पहिली ओळ
तुक्यासमचि दुसरा मदतनीस देवें दिला।
हींत तुकोजी बदल "तुक्या" हें रूप अत्यंत गर्हणीय आहे. हीच ओळ खालील रचने प्रमाणें जुळवितां आली असती. जसें—
तुकोजि सम दूसरा मदतनीस देवे दिला।

कविता २३१ पहिल्या दोन ओळी पहा.
करा स्वनियता कृती झटुनि हर्षुनी सर्वही।
प्रभूस रिझवा मुदें टिपि तयां स्वकीं जो वही॥
स्वकर्म करूनी चला परनटांस जागा करा।
न जागृत करील हें वच, न होय जागा करा॥

वरील सर्व कविता बहु वचनार्थी असोन दुसरे ओळींत एक वचनीं प्रयोग केला आहे. संबंध जुळत नाहीं. "सर्वजण आपापलीं नेमलेलीं कामें आनंदानें झटून करा. प्रभूस संतुष्ट करा. व जो आपलीं कामें आनंदानें आपल्या चोपडींत लिहून ठेवतो (तो पुढें काय?) असें हें त्रिशंकू सारखें वाक्य मध्येंच लोंबत ठेवून त्यास आमचे रसिक कवीनें मुक्ती दिली नाहीं!

(पुढें चालूं)

---

# The Berar Samachar

MONDAY, AUGUST 1 1898.

The Police department in Berar renders a satisfactory account of its working in the year 1897. The year was exceptionally bad and crimes against person and property were abnormally numerous and extensive throughout the whole province. The Police had a very heavy work to do and it was a matter of great credit that they checked the rise in crime with tact and ability and firmly secured the peace and safety of the province. Murders, dacoities, robberies, house-breakings and thefts were rampant and people were moved to commit them through the pangs of hunger. The poorer classes added a large number from amongst their own ranks to the generally well—known classes of criminals. One fact was however patent that the offence, when committed by crude and inexperienced hands, was easily discernible and was, in ninety cases out of a hundred, discovered with no great trouble to the police department. There was no such dire famine within the memories of the people in the province and it was appalling that, at one touch of famine, the whole province presented the extensive spectacle of crime done without the least fear of law. Many persons were forced to commit an offence and their greatest hope was to put off the yearnings of hunger. Starvation either half or total having already crushed people there was no staying power in the general masses to face with a bold front the preliminary evils of famine. Poverty has been the curse of the people for years together and hundreds of families fell an easy prey to the first famine that visited a province well—known for its rich and abundant food—stock. It is one thing that the Police worked well to secure order, peace and safety in spite of so many odds; but it is another thing when we come to think of the causes that led to the down—fall of the middling classes of our society in the last famine. The tale of the last famine is a sad commentary upon the British administration of Berar during the last forty years.

The police department is, like other departments of administration, starved for want of funds; and the higher ranks in the police service are preserved, like a reserved forest, for admissions of the chosen few. Expenditure can be curtailed to a large amount by introducing local and native agency in the higher branch of the service and it will be a welcome measure to recognize, as tests of efficiency and economy, the passport of education, social position and ability of a special kind best suited to the requirements of the police administration. It will be no surprise if we see that young gentlemen are appointed to District posts of authority and responsibility when their extreme inexperience, exuberant youth and want of knowledge of the habits and customs of the people will argue their incompetency for the work entrusted to them. When ample funds are thus utilized to favour some persons of particular denominations we can take our readers a step further to see that the lower branch of the service will also remain ill-equipped. In the constabulary force the educational test of simple reading and writing is not satisfactorily enforced and it will be more surprising when we read the following figures without the help of an explanation from the pen of the Inspector-General:—

| | per cent |
|---|---|
| Bassim | 48 |
| Amraoti | 43 |
| Buldana | 32 |
| Wun | 31 |
| Ellichpur | 23 |
| Akola | 13 |

We are undeceived in this connection with respect to Akola. It is a matter of regret and we hope that our popular District Superintendent Mr. Galloway will at once see that the force under his control is well recruited by men who can read and write. We would rather presume that there must be a great blunder somewhere in the figures quoted above.

---

We offer our heart-felt congratulations to Rao Bahadur Balkrishna Kashinath Joshi on his elevation to the Deputy Commissionership in Berar. People have felt it a matter of pride and pleasure to welcome in their midst Rao Bahadur Joshi in his exalted position. He is a self—made man. He has risen to this high position from the lowest grade in service and it requires no great effort to understand the sterling worth of the gentleman who continues to be a great favourite of Sir T. C. Plowden an astute politician of high authority and learning. Mr. Joshi is a type of officers who will do credit to any work entrusted to them. His large experience, acute knowledge of the human nature, broad sympathy with the people's cause and sound education in law and politics guarantee a successful career and a glorious administration and we hope that he will in course of time rise as high as our hearts and smiling fortune wish him to rise.

---

It is always a special pleasure to see a promising young gentleman rise to a position wherein be can muster up his abilities and energies of a high order. Mr. Kashinath Shriram Jathar is made an Assistant Commissioner in the Berar commission. He has before him a splendid field to shine with his excellent virtues both in private and public life. We hope he will prove a worthy son of his father Rao Bahadur Shriram Bhicaji Jathar C. I. E. the late Director of Public Instruction in Berar. It is our privilege to note with satisfaction that Mr. K. S. Jathar has done well as an Attache and we hope that, as an Assistant Commissioner, he will please his parents the more the higher he will rise in public estimation for the good qualities of heart and head.

---

## वऱ्हाड

हवामान—प्रारंभीं बराच पाऊस पडल्या नंतर तीन चार दिवस उघाडी आहे. एकंदर पाऊस १३ इंच झाला. हंवेत गारवा येत चालला असून सार्वजनिक आरोग्य वाईट नाहीं.

राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी डिपुटी कमिशनर, इलिचपूर यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार यांस असिस्टंट कमिशनर नेमल्या विषयींची आनंदकारक बातमी गेल्या ग्याझिटांत आली आहे.

क्याप्टन डब्ल्यू हेग असिस्टंट कमिशनर यांस कलकत्याला आगष्टचे ८ वे तारखे पासून सहा महिने पर्यंत बोर्ड आफ एक्झामिनर्सचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

---

मि० म्यागिल पोलीस सुपरिन्टेंडेंट उमरावती हे रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं मि० ओग्रेडी यांस नेमून रा० रा० गोपाळ वामन बापट ए. अ. कमिशनर यांस उमरावतीस नेमिलें.

---

## आकोला बाजारभाव

| | | दर खंडी |
|---|---|---|
| आळशी | | ७८ रुपये |
| जवारी | ३८ पासून | ४२॥ रु० |
| गहू (कांठे) | | १२६ |
| " (बनशी) | | १३० |
| चणे | | ७७ |
| तेल | | ४।= |
| तूप | | ८॥ रु० मण |
| सोने | | २९ तोळा |
| चांदी | | ७६ |
| कपाशी | | ३९ |

---

## जाहिरात

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफीकीट मिळाव ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर ७
१८९८

विद्यमान सिविल ज्यडज्य साहेब जिल्हा आकोलायांचे कोर्टात.

नांव— कुंदनलाल

बापाचे नांव— बलुलाल

राहणार— आडगांव खुर्द जाहगीर तालुके अकोट जिल्हा आकोला यांस मयत तानबा बापाचें नांव बहिरम माळी राहणार अडगांव खुर्द ता० अकोट जि० अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख २० माहे आगष्ट सन १८९८ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २६ माहे जुलई सन १८९८ इसवी.

Sk. Ismail
सिव्हिल ज्यडज.

---

## वर्तमानसार

ग्रीनलंड जातीच्या माशाचें वजन ७८ हत्तीच्या वजना इतकें असतें.

परदेशांतून जनावरें येतात, त्यांबरोबर रोग येतो ह्मणून जनावरांवर क्वारंटाईन बसविण्याचा विचार चालला आहे.

पंचवीस तीस वर्षांमागें बाटलीं भरून ठेवलेल्या वाईन दारूंत, एका जर्मन प्रोफेसरास रोगाचे जंतू सांपडले.

बा०

"भयंकर खून!—सायखेडे येथील प्रसिद्ध श्रीमान् व्यापारी शेट दामूसा पांडूसा गुजर यांचा एकुलता एक २०।२२ वर्षांचा तरुण रूपवान् आणि सशक्त मुलगा, त्याचे गळ्याला फांस घालून कोणी ठार मारलेला त्याचा मुर्दा नदीचा पूर ओसरल्यावर नदीचे कांठीं सांपडला! त्या प्रेताला मोठमोठे जड दगड बांधले होते. सायखेडे हें गांव श्रीमंत विंचूरकरांच्या ताब्यांतील असून ह्या खुनाची चौकशी चालू आहे. मुर्दा डाक्टरी तपासणी साठीं सिन्नर येथें नेण्यांत आला होता. ह्या खुनाच्या संबंधानें अशी हकीकत समजते कीं, सदर खून झालेला तरुण मुलगा आपल्या घराजवळील एका तरुण सासूरवासी मुलीवर आषक्त असून त्याचा व तिचा संबंध बरेच दिवसा पासून होता. व हें सर्व तिच्या सासरच्या माणसासही माहीत होतें. परंतु अब्रूकारितां त्यांणीं त्याबद्दल फारसा गवगवा न होऊं देतां तिच्या जाराचें मात्र पारिपत्य करण्याचा विचार केला. त्यांणीं त्या तरुण मुलीला तिचे सर्व अपराधाची पूर्ण माफी देण्याची लालूच दाखवून तिणें फक्त त्या गुजराला पकडून देण्याचा योग जमवून आणावा, असें तिला कळविलें. त्यावरून त्या तरुणीनें, खून झालेल्या रात्रीं, तो गुजराचा मुलगा एका उपरण्यानिशीं दोन प्रहर रात्रीं लघवीला ह्मणून बाहेर आला. तों त्याला बोलाऊन आपल्या खोलींत नेलें; व तोही विश्वासानें तिचे बरोबर खोलींत गेला. तो त्याचे गळ्यास फांस बसवून त्याचा गळा दोघां चौघांनीं दाबला व त्याचे वर्मस्थानीं पाहरीचे तडाके मारून तेथल्या तेथें त्याचा जीव घेतला; आणि त्याच रात्रीं त्याचें प्रेत गंगेला पूर आला होता त्यामध्यें, वर सांगितल्या प्रमाणें मोठमोठाले दगड बांधून, नेऊन टाकलें. आतां ह्या खटल्याचा काय निकाल होतो तो पाहणें आहे."

तंबाखूची पेरणी— अवघ्या जगावर एकंदर १२॥ लाख एकर जमीन तंबाखूच्या लागवडीकडे गुंतली असल्याचा हिशोब निघाला आहे.

तारेचें दळणवळण—साउथ इंडिया रेल्वेकडे उतारूंचे गाडीच्या डब्यांमध्यें तार लावून विद्युत्प्रवाहानें सर्व ट्रेनचें गार्डाशीं दळणवळण चालावें अशी योजना करण्यांत येणार आहे. आलीकडे त्या रेल्वेवर स्त्रियांवरील जुलमाचीं उदाहरणें बरींच अनुभवास आलीं. ह्यासाठीं ही तारेची योजना करण्याचें ठरलें आहे.

विलक्षण ठगाई!—मुंबईच्या म्यु. प्या. मध्यें नूरखां बडेखां नांवाचा एक नालबंद नोकर आहे व त्यांस २० रुपये पगार आहे. गेल्या मार्च महिन्याचा पगार वांटणें चालले असतां त्याचें नांव पुकारल्यावर दुसराच एक मनुष्य पुढें जाऊन त्यानें त्याचा पगार घेतला व अक्वटूयाक्टवर त्याची सही करून तो चालता झाला. मागाहून खरा नूरखां येऊन आपला पगार मागूं लागल्यावर झालेली ठगाई उघडकीस आली. पोलिसाकडून त्या ठगाचा पुष्कळ शोध झाला, परंतु तपास लागत नाहीं. पुढें खऱ्या नूरखांचा पगार म्यु. प्या. नें दिला. ज्ञा० च०

दया ही प्राणिमात्राला असते. मनुष्यालाच ती असते असें नाहीं. एकपरी मनुष्याला कमी असूं शकेल- परंतु कांहीं प्राणी इतके दयाशील आहेत कीं, त्यांचा तो दयाळूपणा पाहून मन अगदीं थक्क होऊन जातें. सयामांत हत्ती पुष्कळ आहेत. तेथील एका सयामी बाईजवळ एक हत्ती होता. तिला तीन लहान लहान मुलें होतीं. तीं तिन्ही मुलें नेहमीं त्या हत्तीशीं खेळून सारा दिवस घालवीत असत. त्यांत त्या बाईचें एक तान्हें मूल होतें त्या मुलाला सुद्धां ती बाई हत्तीपुढें एखादें वस्त्र पसरून त्यावर निजवून ती घुण्यापाण्याला अगर दुसऱ्या एखाद्या कामधंद्याला जात असे. पण एक दिवस सुद्धां त्या हत्तीनें त्या पोरांना दुखविलें नाहीं. तान्हें मूल फार रडूं लागलें ह्मणजे तो हत्ती त्याला हलकेच सोंडेंत धरून इकडून तिकडे व तिकडून इकडे झोके देऊन उगी करी. व पुनः त्या वस्त्रावर त्याला अल्हादपणें ठेवी त्याच्यापेक्षां जी दोन किंचित् मोठीं मुलें होतीं त्यांना तर तो सोंडेंत धरून पाठीवर बसवी, गंडस्थळावर बसवी व त्यांना आपल्या सोंडेनें गुदगुल्या करून हंसवी, त्याप्रमाणें तो हत्ती त्या मुलांची अगदीं दायीसारखी शुश्रषा करून त्यांना संभाळीत असे. व त्या बाईचाही तिच्या हत्तीवर जसा विश्वास होता तसा शेजारणीवरही नव्हता.

नुसत्या ब्राजिल देशांत एकंदर ३०० भाषा आहेत.

फ्रान्समध्यें असा कायदा आहे कीं, एक वर्षांच्या खालील पोराला उष्टावण करायचें नाहीं. पोराला चांगलें भरीव अन्न खायला घालायला डाक्टरची कायदेशीर परवानगी लागते.

बर्लिन येथील एका डाक्टरानें एक दोन चाकी सायकल अगदीं नवीनच तयार केली आहे ह्मणतात. तिच्यावर दोन इसम बसून ती चालवितां येते.

लंदन शहरच्या जनरल पोस्ट हाफिसांतून दर आटवड्याला १०००००० टेलिग्राम्स सुटतात.

होलिगोल्यांड देशांत सोळा वर्षांच्या आंतील वयाच्या माणसास नाटकगृहांत जाऊन नाटक पहाण्याची सक्त मनाई आहे.

जर्मनींत नवऱ्यानें बायकोला कधीं एखादी चपराक अगर लाथ मारली, तर तो शिक्षेस पात्र होतो. बायकोला मुळींच मारतां ह्मणून उपयोगाचें नाहीं, आण यदाकदाचित् जर एखाद्या नवऱ्यानें आपल्या बायकोला एखादे वेळेस चोप दिला, तर त्याला त्या अपराधाबद्दल दर शनवारच्या रात्रीं एका साध्या तुरुंगांत ठेवितात व पुनः सोमवारीं सोडतात. या प्रमाणें दहा आठवडेपर्यंत त्याची शिक्षा वाढवितात. नवऱ्याचे कामाचे पैसे त्याला न मिळतां ते त्याच्या बायकोला देण्यांत येतात. याप्रमाणें त्या मारक्या नवऱ्याला शिक्षा देण्याची पद्धति आहे.

फ्लॉरिडा देशांत रेल्वे लांकडी रुळावरून चालवितात. लोखंडी रूळा इतके ते जरी टिकाऊ नसतात तरी ते बरेच टिकतात असा त्या लोकांचा अनुभव आहे. हा रेल्वेचा फांटा ऑव्हॉन पार्क व हेन्स सिटी मधून नेलेला आहे. त्या रेल्वेचे रूळ एका प्रकारच्या वाळूनें मढविलेले असतात. अशाच प्रकारची लांकडी रेल्वे शिकाग यथेंहा केलेली आहे. तिचा फाटा ट्रेस पिनास येथून काढलेला आहे. ती रेल्वे सारी बारा मैलच नेलेली आहे क्विबेक, कॅनाडा वगैरे ठिकाणीं लांकडी रुळाची रेल्वे आहे. ती तीस मैल लांब नेलेली आहे. क०

आथेन्स शहरीं एक साप्ताहिक वर्तमानपत्र निघतें. तें सारें पद्यात्मक असतें. त्यांतील जाहिराती सुद्धां संगीतांत लिहिलेल्या असतात.

जर्मनी देशांत प्रत्येक सार्वजनिक शाळांतून अशी चाल आहे कीं, चांगलीं हुशार अभ्यास करणारीं मुलें निवडून काढून त्यांचा निराळा वर्ग करितात. आणि उनाड शाळेंत न येणारीं व कधींच अभ्यास न करणारीं मुलें अगदीं दूर निराळ्या जागेंत बसवितात. अशा मुलांपासून दुसरीं चांगलीं मुलें बिघडण्याचा विशेष संभव असतो.

साऱ्या जगांत सुमारें प्रतिदिवशीं टांकांचीं नाकें साडे तीन लक्ष उपयोगांत येतात.

लंदनमध्यें एका आठवड्यांत सरासरी ४९ लक्ष रुपये किंमतीचे जिन्नस गहाण टाकिले जातात.

इंग्लंदांत दर वर्षी कमींत कमी ४०,००,००,००० पौंड साबण लागतो.

सर्वोत्कृष्ट कागदी लिंबें सिसिली बेटांत आहेत. तशीं लिंबें साऱ्या जगांत नाहींत. एक एकर लिंबांच्या जमिनीला तिकडे तीन साडे तीन हजार रुपये पडतात.

चौदाव्या शतकांत इटली देशामध्यें पायांत जोडे घालणाऱ्यापासून त्याबद्दल कर घेण्यात येत असे.

लहान मुलांच्या शरीराची वाढ झोंपेंत होते असें पुष्कळ डाक्तरांचें मत आहे.

स्त्रिया आपले अपराध आपल्या अश्रूंनीं घालवितात; आपल्या गोड भाषणांनीं आपले हट्ट पूर्ण करून घेतात; व आपल्या प्रेमपूरित दृष्टीनें त्या नवऱ्याला ताब्यांत ठेवितात. असाच त्यांचा नैसर्गिक गुण आहे.

बायकोवर दाब मारहाण करून व बोलून बसविण्यापेक्षां आपल्या निष्कपट पण किंचित् वरून कडक अशा प्रीतीनें व शुद्ध वर्तनानें बसविला असतां तो झट् बसतो.

आकाश जसें तेजोमय नक्षत्रांनीं व तारकांनीं शोभतें, त्याप्रमाणें घर सुशील व गुणवान कन्यापुत्रांनीं शोभतें.

साऱ्या इंद्रियदमनांत जिव्हेचें दमन करणें कठीण आहे. तिला नेहमीं चटकदार पदार्थ व चटकदार विषय आवडत असतात. ह्मणून साधुजन तिच्याविषयीं फार सावध असतात.

सर्पाच्या नुसत्या दातांतच विष असतें, विंचवाच्या फक्त नांगींत असतें. परंतु दुर्जनाच्या सर्वांगीं विष असतें. ह्मणून त्यांच्या वाऱ्याला सुद्धां उभें राहूं नये.

विचारवंत मनुष्याचा बंदा गुलाम व्हावें, पण मूर्ख व क्षणिक बुद्धीच्या माणसानें आपली प्रधानकी जरी दिली तरी उपयोगाची नाहीं. क०

सिन्सिलीपासून फ्लॉरेन्सपर्यंत कांहीं मेडिकल स्टुडंटस् (वैद्यकविद्या शिकणारे विद्यार्थी) आगगाडीतून चालले होते. त्यांच्या जवळ एक मेलेल्या मनुष्याचें डोकें होतें, तें त्यांनीं एका लांबशा काठीच्या टोकाला बांधलें होतें. ते डोकें त्यांनीं पलिकडच्या डब्यांत कांहीं बायका बसल्या आहेत असें पाहून डब्याच्या दारांतून वांकून त्यांच्या डब्यांत सोडलें. त्यासरशा त्या बायका आरडूं लागल्या व ज्यांच्या आंगावर तें डोकें पडलें त्या तर अगदीं भयभीत होऊन अगदीं बेशुद्ध पडल्या. कांहीं वेळानें गाडी स्टेशनावर जाऊन उभी राहिली. त्या डब्यांतल्या बायकांनीं स्टेशनमास्तरला वर्दी दिली. आणि मास्तर येऊन पहातों तों दोन बाया अगदींच भेदरून गेलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. चौकशी अंतीं शेजारच्या टारगट व उनाड मुलांनीं मेलेल्या माणसाचें डोकें काठीच्या टोंकाशीं बांधून तें यांच्या डब्यांत सोडलें ह्मणून असा भयंकर परिणाम झाला, असें त्यास कळून आलें. त्या घाबरलेल्या दोन्ही बाया खालीं उतरून घेतल्या. त्यांपैकीं एक तर जावडतोब मेली व दुसरीला थोडीशी धुगधुगी मात्र राहिली होती. त्या मुलांना विचारतां "आह्मी नुसती थट्टा केली. दुसरा तिसरा कांहीं आमचा कांहीं हेतु नव्हता. आणि यापासून असा भयंकर परिणाम होईल असें आमच्या स्वप्नांतही आलें नव्हतें." असें त्यांनीं सांगितलें. पण थट्टेचा किती भयंकर परिणाम झाला. क०

## जाहिरात

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळाव ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर ८/१८९८

विद्यमान सिव्हिल ज्यडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— भगवान वल्लद मारूती माळी

राहणार—चांदूर तालुके व जिल्हा आकोला यांस मयत झीमाई बापाचें नांव तुकाराम राहणार चांदूर तालुके व जिल्हा अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख २७ माहे आगष्ट सन १८९८ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २८ माहे जुलई सन १८९८ इसवी.

Sk. Ismail

सिव्हिल ज्यडज.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................⁄४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........⁄१ ⁄६

सरे खेपेस ............⁄१

Six monthly...

Single copy ..........................

Advertisement

Below 10 lines ...... ॥८

Per line over 10 ......4 as

Repetition Per line... 3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 8 AUGUST 1898 — NO 31

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख ८ माहे आगष्ट सन १८९८ इ० — अंक ३१

NOTICE

In the matter of the Estate of Henry Alexander Heath late of Yeotmal, Berar, European inhabitant deceased.

Notice is hereby given that all persons claiming against the Estate of Henry Alexander Heath above-named who died at Yeotmal aforesaid on or about the 21st. day of August 1897 and Letters of Administration with the will and Codicil annexed of whose estate having effect throughout the Province of Bombay were granted on the 27th. day of July 1898 to Thomas Withey Cuffe Esquire are required to send in their claims to the said Administrator at his office, Standard Buildings Fort Bombay within one Calendar month from the date hereof at the expiration of which time he will hand over the assets to the persons entitled thereto, having regard only to the claims of which he shall then have notice.

All persons indebted to the Estate of the the said deceased or having property belonging to him are required to pay their debts or hand over such property to the said Administrator.

Dated this 6th. day of August 1898.

Craigie Lynch & Owen
Administrator's Attorneys

## "दार्जिलिंगचा प्रवास"

( आमच्या एका मित्राकडून. )

नंबर. ६

सुकाना हें ठिकाण समुद्रसपाटी पासून ५३२ फूट उंचीवर आहे. येथून ११ वा मैल गेल्यावर थोड्या अंतरावर एक बोगद्या सारखें लागतें. लांबून वर्तळाकृति सडक येऊन वर चढविली आहे. या वर्तळाकृति सडकेवर आगगाडी आली ह्मणजे मोठी मजा दिसते. इंजन व शेवटचा ब्रेक अगदीं एकमेकाला येऊन भेटतो कीं काय असें वाटतें. १४ मैलांवरहीं असाच प्रकार आहे. या ठिकाणीं आपण आलों ह्मणजे समुद्राचे सपाटी पासून २८९० फूट उंच आपण चढतों १६ व्या मैला पाशीही असेच वर्तुळाकृति लहान बोगद्याचें ठिकाण लागतें. १६ व्या मैलावर आलों ह्मणजे खालीं दूर टीस्टा नदी वाहत जातांनां दिसते. तिचा देखावा या स्थाना पासून फारच नयनमनोहर दिसतो. १७ व्या मैलावर "रिव्हर्सिंग" लागतें. हें पहिलें होय. येथूनच टिंडारिआ नांवाचें स्टेशन दिसूं लागतें. तें वरती व गाडी खालून चढत असतांना फारच बहार दिसते. हें स्टेशन २० व्या मैलावर आहे. आगगाडीच्या डब्यांतून उतरायच ह्मणजे चारी बाटा मोकळ्या. बसून बसून कंटाळा आला होता ह्मणून आह्मी खालीं उतरलों. आह्मी उतरलों ह्मणजे डोंगराच्या कडेलाच. दोन चार हात पुढें गेलें कीं खालीं दऱ्या खोऱ्या पाताळच; ह्मणून लोखंडी कठडा घातलाच आहे. रिफ्रेशमेंट रूममध्यें बटलर, शागीर्द सर्व एतद्देशीय पहाडीच लोक. या आगगाडीचा इंजन ड्रायव्हर एक गुरखाच होता. त्याच्याशीं आह्मास बोलावयास सांपडलें. त्यांस हिंदुस्थानी येत होतें. इंजनापुढें एक मनुष्य तांबडें निशाण धरून आगगाडी चालत असतांनां धांवत असतो. आगगाडीला फार वेगानें जातां येत नाहीं. कारण एक तर चढण व दुसरीं वळणें. नागिणी सारखी आगगाडी जात असते. घटकेंत पर्वत पोंखरूनच आंत शिरतें कीं काय, घटकेंत कड्यावरून उडीच टाकायला धावते कीं काय असा भास होतो. अगदीं कडेला आली ह्मणजे सारे दोन हाताचेंच अंतर असेंत. हेलकावे खात खात आगगाडी जाते तेव्हां आतां कड्यावरून पडतेंच इतकी भीति वाटते. त्यांतून सडकेला कड्या या बाजूला सर्व ठिकाणीं बांध नाहीं त्यामुळें डोळे फिरतात. कित्येकांना घेरी देखील येते. कोणी ओकतात देखील. आगबोट जशी लागते ह्मणतात तसा प्रकार कांहीं अंशीं होतो. सुकना स्टेशना पासूनच थोडी थोडी थंडी वाजू लागली, आकाशांत तर सूर्याचें दर्शन नकोच. ढगांचें घरच हें असें वाटूं लागलें. धुक्यांचें तर कळपच खालून दऱ्या मधून धांवत धांवत वर येतानां दृष्टीस पडत असत. ते जणू आमच्या अगोदर दार्जिलिंगास जाण्याच्या विचारांत होते असें दिसे. किंवा आह्माला ही आगगाडी दररोज त्रास देते, तिचा कांहीं बंदोबस्त करा ह्मणून गाऱ्हाणें करण्यासाठीं मेघराजाकडे धांव घेताहेत असें वाटे. आणि लहान मुलाची कोणी खोडी केली ह्मणजे त्याची समजूत घालण्यासाटीं आपण जसें ह्मणतो कीं "थांब त्याचें घरच उन्हांत बांधू अं" तसेंच मेघराज त्या धुक्यांचीं समजूत करण्यासाठीं त्यांनां "थांबा अं मी पावसानें या गाडीला भिजवूनच टाकतो" असें ह्मणतांना व त्याप्रमाणें पाऊस पाडतांनां दिसत. या हिमालयावर चढणी पासूनच गगनचुंबित वृक्षांची घनदाटी लागते, विविध प्रकारचे तरू वेली अगणित असे दृष्टोत्पत्तीस पडतात, वेली तर वृक्षास सर्वतोपरी आपल्या बाहूंनीं आलिंगून आकाशदर्शना साठीं किंवा मेघराजाच्या भेटी साठीं वर येतांना दृष्टीस पडत. एकही वृक्ष किंवा एकही वेली ओळखीची दिसेना. ना वड, ना पळस, ना खैर, ना पिंपळ, ना साग, ना जांभूळ, ना बाभूळ कांहीं नाहीं. सर्व नवखें! आणि ज्याप्रमाणें एखादी गोष्ट नवीन दिसली ह्मणजे ती विलायती असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे तसेंच यांनां विलायती ह्मणावें; झालें. कारण हिमालय पर्वत विलायतवाल्यांनींच व्यापून टाकला आहे! पण हिमालयी वृक्ष वगैरे असें ह्मणणें बरें! शाब्दिक स्वाभिमाना करितां तरी असें ह्मणण्याला काय हरकत आहे. अहो "वचने किं दरिद्रता"! वेलींची जाळींचीं जाळींच दिसत. तेव्हां या मध्यें श्वापदें असावींत असा तर्क वाहीं. गाडींतून यांच्या साठीं पहावें पण श्वापद एकही दिसलें नाहीं. कोठें कोठें वाघासाठीं जाळी टाकलेली, मेणीं घातलेलीं पिंजऱ्यांत ( सांपळयांत ) बकरीं घातलेलीं दिसत. गाडी चालतांनां एक टिकिट कलेक्टर- हा बहुत करून मुसलमान असावा- तो टिकिटें तपासण्यास येत असे. त्यानें आह्मांस वाघ पुष्कळ वेळां आगगाडींतून दृष्टीस पडतात ह्मणून सांगितलें. हिमालयाच्या पायथ्याशीं, दऱ्याखोऱ्यांतून हिंस्र पशू पुष्कळ आहेत ह्मणतात.

हिमालयाच्या पायथ्याशीं सपाटीवर पूर्व बाजूला मोठालीं जंगलें आहेत तेथें हत्ती रहातात. हिमालयावर चढावयाला लागलें ह्मणजे व पर्वतांच्या रांगा ओलांडून ओलांडून हिमप्रदेशा जवळ येऊं लागलें ह्मणजे हीं श्वापदें दिसत नाहींत. क्वचित् बर्फांत राहणाऱ्या पांढऱ्या अस्वली आहेत ह्मणतात, वृक्ष सदा हिरवे गार! पिकलेलें पान ह्मणून दृष्टीस पडेना, कोंवळीं पानें तेवढीं लाल, बाकी सर्व हिरवेंच हिरवें! उन्हाच्या तापामुळें झाडें वाळून जाण्याचा संभवच नाहीं, पाण्यानें कुजून, थंडीच्या कडाक्यानें होरपळून, कोणी तोडील तेव्हां, वाऱ्यानें पडून अशा रीतीनें त्यांचा नाश व्हावयाचा काय तो. आगगाडी डोंगरांतून वळणा वळणांनीं जाऊं लागे तेव्हां इंजनाचा "भक् भक्" आवाज दऱ्यांतून प्रतिध्वनित होऊन परत ऐकूं येई, तेव्हां हालाहल विष प्याल्यामुळें अंगाचा जो दाह झाला त्या योगानें "हुश हुश" करीत अद्याप हिमालयदुहितापति जो शंकर ते येथेंच कोठें तरी बसले आहेत कीं काय असें वरचेवर वाटे किंवा गाडीच्या भारानें त्यांच्या अंगावरील मालाकृति सर्प चेपल्या मुळें ते फुसकारींत आहेत असें वाटे

"टिंडारिआ" स्टेशनापाशी डोंगराची समुद्र सपाटीपासून उंची २८२२ फूट आहे या स्टेशनाचे पुढेंच जरा गेलें ह्मणजे आणखी रिव्हर्सिंग स्टेशन लागतें. व नंतर ४ थें व शेवटचें वर्तुळाकृति बोगद्या प्रमाणें वळण लागतें. पुन्हा २ रिव्हर्सिंग स्टेशनें लागतात. नंतर २९ $\frac{1}{4}$ मैलापाशी इंजनांत पाणी घेण्या साठीं गाडी उभी राहते या ठिकाणीं दोन मोठालीं लोखंडी टाकीं आहेत. त्यांत डोंगरांतील झऱ्यांचें पाणी नळानें आणून सोडलें आहे. पुढें चढून गेलें ह्मणजे एक मोठा थोरला धबधब्या सारखा झरा लागतो त्याला "पागलझरा" असें ह्मणतात. नांव अगदीं यथार्थ आहे. इ० स० १८९० सालीं जुलई महिन्यांत अतिवृष्टि झाल्यामुळें या झऱ्यानें सुमारें १६०० फूट रस्ता धुवून टाकला व आगगाडीचे रूळ स कडेलोटाची शिक्षा दिली या झऱ्याला पावसाळ्यांतच भयंकर स्वरूप येतें. आह्मी गेलों तेव्हां उन्हाळाच होता तेव्हां तो बहुतेक शुष्कच होता. त्यांतील घराप्रमाणें दिसणारे काळे, पांढरे, तांबूस असे खडक मात्र त्या झऱ्याच्या कर्तुत्वाची पूर्ण साक्ष देत होते वर पासून खाल पावेतों खडकांच्या दरडीच्या दरडीच आहेत जणूं त्या भयंकर झऱ्याला वर्षांतूनमध्यें उतरण्या करितां या प्रचंड पायऱ्याच आहेत असें वाटतें. नंतर महानदी ह्मणून स्टेशन लागतें येथेंच महानदीचा उगम आहे असें कोणी ह्मणतात. नंतर ३१ $\frac{3}{4}$ मैलापाशी 'कुरे सांग बझार' ह्मणून स्टेशन लागतें. या ठिकाणीं पर्वताची उंची ५००० फूट आहे. या ठिकाणीं मोठा बाजार आहे. वस्तीतूनच आगगाडी गेलेली आहे. तेव्हां बाजारांतली गमत दिसली. येथें रिव्हार्सिंगसारखेंच वळण आहे. कापडांची, धान्याची, वाण्यांचीं व युरोपिअनांची वगैरे सर्व तऱ्हेची दुकानें आम्हास दिसलीं. हे स्टेशन सोडल्यावर "क्लेरेन्डन्" नांवाचें हाटेल लागतें. येथें पूर्वी "टिफिन" साठीं गाडी थांबत असे. याच हाटेलाच्यावर एका टेकडीवर यहुदी पंथाचे पाद्र्यांचें एक ट्रेनिंग कालेज "सेंट मेरी" नांवाचें आहे. ५६५६ फूट उंच गेलें म्हणजे "ट्रंग" या नांवाचें स्टेशन येतें. नंतर ४१ $\frac{1}{4}$ मैलापाशीं म्हणजे ६५६२ फूट उंचीवर आल्यावर "सोनाडा" या नांवाचें स्टेशन लागतें. या ठिकाणीं दार्जिलिंगाहून येणाऱ्या व दार्जिलिंगास जाणाऱ्या गाड्यांची भेट होते. सर्व रस्ताभर चहाची शेतेंच शेतें चढण लागल्या पासून दृष्टोत्पत्तीस पडतात. व माळावर, उतरणीवर चहाच्या शेतापाशीं इकडील लोकांचीं (मजूरदारांचीं) झोपडीं, चहा तयार करण्याचा कारखाना, व कारखान्याच्या मालकाचा अगर त्याच्या मुनीमाचा एक बंगला असा सर्व थाट जिकडे तिकडे दिसतो. व मध्यंतरीं सर्व डोंगरभर पुष्कळ साहेब लोकांनीं हवा खाण्यासाठीं जागोजाग बंगले बांधले आहेत. ४७ $\frac{1}{4}$ मैलावर 'घूम' या नांवाचें स्टेशन आहे. हेंच सर्वांत उंच स्टेशन हें ७४०७ फूट उंचीवर आहे. येथून ४ $\frac{1}{2}$ मैलावर फूट ६०० खालीं ह्मणजे ६८०७ फूटावर "दार्जिलिंग चें स्टेशन आहे. या "घूम" स्टेशनांवर आह्मास आमची मित्र मंडळी वगैरे उतरून घ्यावयास आली होती. त्यांपैकीं कांहीं जण उगीच ओझरते दिसले. आह्मी "दार्जिलिंगास" गाडीला उशीर झाल्यामुळें वेळेवर पोंचणार नाहीं म्हणून त्यांनीं अशी व्यवस्था केली होती पण आम्ही दार्जिलिंगास अगदीं वेळे-

वर ह्मणजे १॥ वाजतां येऊन पोंचलों. स्टेशन साधारण बरेंच मोठें आहे. उतरण्याची अतिशय गडबड् एतद्देशीय बायका, पुरुष "कुली" होना "कुली" चाहिये असें ओरडतांना व सगळ्यांच्या गठड्यास हात लावतांनां दिसले. "कुली (cooly मजूर) हा शद्ब अगदीं प्रचारांत येऊन गेला आहे. 'दंडी' हे चलो असेंही किंबिक ओरडतांना दिसले. सर्व एकच गर्दी. त्या गर्दींत एखादा एखादी सानानाची गठडी लांबवयाचा देखील. आह्माला ज्यांचे बिऱ्हाडी जावयाचें होतें ते आमचे आप्त संबंधीच होते. पण ते 'बून' येथें गेले होत. त्यामुळें ते आह्मास दिसले नाहींत. त्यामुळें आमची बरीच तारांबळ उडाली होती. बिऱ्हाड ठाऊक नाहीं. पत्ता माहीत नाहीं. तार आफिसांत जाऊन त्यांच्या पत्याचा शोध काढण्या साठी गेलों तोंच आमचे स्नेही आप्त मंडळी दाखल झालीं, बूनचे स्टेशन पासून अतिशय थंडी वाजू लागली व दार्जिलिंगास उतरल्यावर तर आमची अगदीं दांतखिळीच वाजू लागली. आह्मी एक कूली केला व एक दंडी केली व आपल्या बिऱ्हाडीं गेलों. बिऱ्हाड स्टेशनापासून सुमारें मैल सव्वा मैल होतें. गाडींत बसून बसून कंटाळलों होतों. तेव्हां मैलभर चालत जावें लागलें त्यामुळें पाय जरा मोकळे झाले. दार्जिलिंगास गाड्या, टांगे, शिग्राम वगैरे कांहीं मिळत नाहींत. कारण वस्ती डोंगरावर उंच सखल वाटेल तशी वसली असल्या कारणानें सडकांची [ गाड्या जाण्या जोगत्या ] सोय होत नाहीं. प्रवासाचा थकव्यामुळें लवकर भोजन वगैरे आटपून आह्मी वामकुक्षीच केली. तो दिवस आमचा तसाच गेला.

पुढें चालूं.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती श्रावण वद्य ७ शके १८२०

---

सर एम. इ. ग्र्यांटडफ मद्रासचे माजी गव्हरनर यांनीं गेल्या महिन्यांत सरहद्दीवरील लढाई विषयीं बोलतांना या लढाईचा निरर्थकपणा उत्तम प्रकारें प्रतिपादित केला आहे. ते ह्मणाले कीं आफगाणच्या मोहिमेला सुमारें दोन कोट पौंड खर्च लागला, व परिणामीं कांहींच लाभ न होतां उलटी एक अपकिर्या मात्र राज्यतृष्णेनें प्रकट केली असून तिचा शेवट होईंपर्यंत काय काय प्रकार दृष्टीस पडतील ते खरें. लार्ड लारेन्स यांनीं वायव्य सरहद्दी संबंधानें जी राजनीति नेमस्त केली होती तिचा त्याग केल्या दिवसांपासून एका मागून एक चुक्यांची मालिकाच चालू आहे. एका चुकीमुळें दुसरी चूक करणें भाग होतें तसा प्रकार या सरहद्दीच्या प्रकरणांत घडला आहे. या चुकीच्या राजनीतीचा पहिला वाईट परिणाम लढाईच्या द्वारानें लोकदृष्टीस पडला. सरकारच्या लष्करास हुद्देदारांच्या पदव्या मिळाल्यां व नेटिव संस्थानिकांची राजभक्ति निदर्शनास आली तथापि सर्व कारस्थान आरंभापासून अगदीं अनिष्ट दिशेनें चालविलें आहे ही गोष्ट चांगल्या मुत्सद्दीपणाचें लक्षण नाहीं. या भयंकर चुकीचा अर्थ इतकाच निघाला कीं लष्करी अंमलदारांनीं बहुतेक सर्व व्हाइसरायांस आपल्या इच्छेच्या आधीन ठेविलें आणि आपल्या तरवारीचा व बंदुकीचा जयजयकार सर्वत्र गाजविला. यांत लष्करी अधिकाऱ्यांचा दोष नाहीं कांकीं लढाई चालूं करणें हा त्यांचा धंदाच होता पण त्यांच्या इच्छेला व्हाइसराय अनुसरले यांत व्हाइसरायांच्याच माथीं सर्व अपयश येतें.

वर दर्शविलेला अभिप्राय अधिकारावर बहाल असतांना कोणीकडे लोपला होता तें ईश्वरास ठाऊक ! लार्ड क्रोमर, सर आकलंड इत्यादि मुत्सद्यांचे शहाणपण अधिकार सोडल्या नंतरच जगापुढें येत आहे. ह्मणून वाईट वाटतें.

---

गेल्या १८९७-९८ सालीं स्टांपांची विक्री पुष्कळ कमी झाली व सरकारचें नुकसान मोठें झालें. एकंदर जनरल स्टांप व कोर्ट फी स्टांप मिळून विक्री रु. ८,२९,६०९-११ ३ पै ची झाली; व स्टांप खात्या निमित्त खर्च रुपये २८०६९ २ आ. ९ पै आला. उत्पन्न १०० रुपयामागें ६ या प्रमाणानें कमी झालें. स्टांप विक्रीचें उत्पन्न कमीजास्त होतें या संबंधानें मेजर वारन हेस्टिंगस लिहितात कीं गेल्या रिपोर्ट प्रमाणें या रिपोर्टांत दुष्काळ वगैरे कारणांचीं परस्पर विरोधी कार्यें दृष्टीस पडतात. वणी व वाशिम जिल्ह्यांत जनरल स्टांपाची विक्री पुष्कळ वाढली आहे हें मोठें नवल आहे. गेल्या दहा वर्षांचें आंकडे ताडून पाहिले असतां वणी व वाशिम या दोन जिल्ह्यांचे स्टांपाच्या उत्पन्नाचे आंकडे इतर जिल्ह्यापेक्षां निराळेपणा व विलक्षणपणा दाखवितात १८९३-९४ सालीं स्टांपाचें उत्पन्न अतिशय वाढलें होतें आणि त्या सालाच्या बरोबरीला आज स्टांपाचें उत्पन्न आलें नाहीं. गेल्या दहा वर्षांत १८९७-९८ प्रमाणें उमरावतीस स्टांपाचें उत्पन्न कधींच कमी नव्हतें. गेल्यासालीं जनरल स्टांपाची विक्री १५०६० रुपयांनीं कमी असून कोर्ट फीचें उत्पन्न ४३,७०२ रुपयांनीं कमी आहे. अलिशान रेसिडेंट साहेब ह्मणतात कीं गेल्या दोन वर्षांत दुष्काळामुळें व्यापार फार कमी झाले, न्यायकोर्टांचीं कामें कमी झालीं व त्यामुळें स्टांपाच्या उत्पन्नास धक्का बसला.

---

## रा. शेवडेकृत अहल्या चरित काव्य.

( आमच्या एका मित्रांकडून ) नंबर २

---

पद्य २३१ मध्यें दुसरी ओळ पहा

करा स्वनियतां कृती झटुनी हर्पुनी सर्व ही।
प्रभूस रिझवा मुदें टिपि तयां स्वकीं जो वही॥

यांतील "जो" या संबंधी सर्वनामाचा संबंध परमेश्वरा कडेस लावल्यास "जो परमेश्वर आपले चोपडींत त्या कामांना आनंदानें टिपून टेवतो त्यास संतुष्ट करा" असा अर्थ करावा लागतो व असा अर्थ घेतल्यास परमेश्वराचे अमर्याद बुद्धिमत्तेस बहिष्कार घातल्या सारखें होतें! तथापि या जगावर "चोपडींत कामें टिपून ठेवणारा" दुसरा एक समर्थ प्रभू येशू खिस्त आहे त्यास उद्देशून हें पद्य असल्यास न कळे! कारण रा. शेवडे यांचा गहन कोटिक्रम कोणते वेळीं कोणीकडेस भरारी मारील याचा नियम नाहीं.

( २ ) काव्यांत वऱ्हाडी प्रयोगांची भेसळ.

कविता ५३ शेवटील ओळ पाहा

। प्रसून गति माळियाविण बरी न बागेंत व ॥

वरील कवितेंत सासऱ्यानें अहिल्या बाईस सती न जाण्या विषयीं आग्रह करीत असतां तीस "व ह्मणजे अग" या वऱ्हाडी संबोधनानें संबोधित केलें आहे! वऱ्हाडांत स्त्रियामध्यें "तू कुठी जात व" "काय कतं व" असे प्रयोग प्रचारांत आहेत हें सर्वांस महशूर आहेच. त्यास अनुलक्षून आमच्या कवींनेंही आपल्या काव्यांत त्या संबोधनाचा उपयोग करून अहल्या बाईस सासऱ्याचे तोंडून "अत्र अहल्याबाई व" अशा वऱ्हाडी अश्लील संबोधनानें संबोधित केलें आहे ! तसेंच.

कविता २०५ शेवटील दोन ओळी पहाः–

पुरा पठन लेखन प्रभृति अल्प या कारणीं
न नीति कमती ह्मणा, बुध तुह्मीच, या
कांरणीं ॥

वरील कवितेंत "कमती" हा वऱ्हाडी शद्ब "कमी" या शद्बाचे ऐवजीं आहे "त्याले काय कमती आहे" अशी वऱ्हाडांत भाषणाची पद्धति आहे. तीस अनुलक्षून वरील प्रयोग आहे.

कविता २१३ ओळ दुसरी पाहा.

जवाब करणें पुढें मज असे तया सामनीं ।

वरील कवितेंत "तया सामनीं" ह्मणजे त्याच्या समोर हा वऱ्हाडी प्रयोग आहे. वऱ्हाडांत "माह्या सामने यें" असा भाषणांत प्रयोग करण्याची वहिवाट आहे. त्यास अनुलक्षून आमचे कविराजांनीं वरील प्रयोग घातला आहे.

कविता २५० ओळ दुसरी.

भूवन्या होय वर्षें सुखभर नमिता
वीस उणी अशी ती।

येथें "अशी" हा वऱ्हाडी शद्ब "ऐंशी" या शद्बाबद्दल योजिला आहे. वऱ्हाडांत "ऐंसी" या संख्येच्या शद्बाचें रूप "अस्सी" असें आहे. त्या धोरणावर कवीनें "अशी" या शद्बाची योजना केली आहे.

वरील प्रकारा सारखे प्रयोग याहून अधिक पाहण्याची इच्छा असल्यास वाचकांनीं १४२, १४६, १८७ इत्यादि पद्यें लक्ष्यपूर्वक पाहावीं.

( ३ ) व्याकरण व शद्बशुद्धता.

या संबंधानें लिहितांना कवीनें आपले काव्याचे प्रस्तावनेंत "पुरातन कवींनीं जी मांकळीक घेतली आहे तिचेंच आह्मी न्यूनाधिक्यें करून अनुकरण केलें आहे असें ह्मटलें आहे." यावरून पुरातन कवींची रसिक, प्रेमळ व मनोहर कृती, तींतील शद्बसौष्ठव, अर्थ गांभीर्य, मासादिक व अलंकारिक रचना इत्यादि अपूर्व गुण यांचें आमच्या कविशिरोमणीनें अनुकरण न करितां "दोषग्राही गुणत्यागी चालिनिरिव दुर्जनः" या उक्ती प्रमाणें दोषा पुरतें मात्र अनुकरण केलें आहे असें उघड दिसतें. आतां ज्या शुद्धाशुद्धतेच्या दोषाचें आमचे शिरोमणी अनुकरण करूं पाहातात तो दोष पुरातन कवींच्या कृतींतील एकंदर उत्कृष्ट गुणांशीं ताडूं पाहतां एखाद्या महान जलाशयाचा त्यांतील जलतुषाराशी किंवा एखाद्या वालुकामय अरण्याचा त्यांतील एखाद्या क्षुद्र कणाशी जो संबंध त्याप्रमाणानें आहे. उलट आमचे मतें तर अशा महाराष्ट्रभाषेत ललामभूत झालेल्या कविकृतिस कुत्सित जनांची दृष्ट न व्हावी या हेतूनेंच कवींनीं तीस वरील शुद्धाशुद्धतेचें यत्किंचित् दोष रूपी गालबोट लाविलें असावें! पुरातन कवींचे हे वरील गुण प्रस्तुत काव्यांत यत्किंचित् अंशानें जरी परावृत्त जाहले असते तरी देखील सदरील दोषांस विशेष महत्व येतें ना परंतु काव्यास सहन न होणारीं अशीं इतर व्यंगें प्रस्तुत काव्याचे ठायीं अगणित असल्यामुळें "निरंकुशाः कवयः" इत्यादि सवलतींचे आड आमचे कवीस दडतां येत नाहीं. व्यवहारांत एखादे प्रामाणिक मनुष्यास जर कांहीं निरुपायाचे प्रसंगामुळें खोटें भाषण करण्याचा प्रसंग आला तर तो प्रसंग कोणासही क्षम्य भासणारा आहे परंतु ज्याची नेहमींची कृतीच खोडसाळ आहे अशा मनुष्यानें जर खोटें भाषण केलें व तें तो खपवण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्यायोगें लोकांत त्याचे संबंधानें असलेला वाईट ग्रह जास्त बलवत्तर होतो याप्रमाणेंच वरील गोष्ट आहे असो.

प्रस्तुत काव्यांत इंग्रजी भाषेप्रमाणें मराठी भाषेंतील नामांस फक्त प्रत्यय जोडून देऊन त्यांस क्रियावाचक शद्ब बनविल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. जसें: 'प्राणतां' ह्मणजे श्वासोच्छ्वास करित असतांना 'जीवतां' ह्मणजे जीवंत असतांना वगैरे कविता २२७ व ७० पाहा. महाराष्ट्र भाषेंत अशीं क्रियापदें बनविण्याची हातोटी दादोबा अगर कृष्णशास्त्री कृत व्याकरणांत अथवा मोरोपंत, वामन पंडितादि कविश्रेष्ठांचें कवनांत कोठेंही असलेली आमचे आढळण्यांत नाहीं. महाराष्ट्र भाषेवर हा नवीनच अनुग्रह दिसत आहे !

खालील पद्यांत 'शास्त्र' व 'वी' यांचीं रूपें अनुक्रमें "शास्त्रियी" व "वियें अशीं केलेलीं आहेत. हीं व्याकरणांतील कोणत्या नियमाचे आधारें केलीं आहेत तें समजत नाहीं.

तयांस भजण्या पुसे विधि कुठें
वचीं शास्त्रीयीं ।
परी सुकृतिनें तिच्या विपुल
भूमिधेनू वियें ।

छंदांतील गण जुळण्याकरितां कित्येक शद्बांचीं मुद्दाम वेडी वाकडीं रूपें केलीं आहेत. जसें पाथरडी यांचें पाथारडी, मानवतो यांचें मानावतो, ताईत यांचें ताविज इ० खालील पद्यें पाहा.

प्रकाशावि इची जनी तिमिर छन्न पाथारडी।
अशाविण कसा तिला दहनवेश मानावतो।

क्षमा न कवणा मिळे जरि गळयांतला ताविज।

कित्येक स्थलीं तर ऱ्हस्वाचें दीर्घ व दीर्घाचे ऱ्हस्व असे शद्वही केलेले आढळतात.

पुढील कांहीं चरणें पाहा.

मुलीस गुण मंदिरा भुषवि नार मुक्ता बरें।
स्विकारुनि परादरा परतला निजा मंदिरा।
किमर्थ अवणा सुधी ह्मणविती अहो पूरुष।
तयां तादिय हक्क दे; तयिं न कां सुभक्ति रुने।
मिळे वितरणें बरी जनि न तें लघू सार्थक।

वरील ओळींतील भुषवि, स्विकारुनि, पूरुष, तादिय, लघू हे शद्ब, ठळक अशुद्धतेचीं उदाहरणें आहेत.

ग्राम्य व अत्यंत व्यावहारिक शद्वांचा प्रयोग ज्यांत केला आहे अशीं पद्यें जागोजाग आहेत. तथापि त्यांतील कांहीं वेंचक स्थलें पुढें दिलीं आहेत. तीं पाहा.

स्मरोत सकला स्त्रिया अनघ युग्म हें बारमा।
विधुंत लघु अंक ही परि तयीं नसे गोम ती।
सुषुप्ति अपरा ह्मणा मरण कां करा गोगवा।
न लेश नृप पूरुषीं मदिं सुबद्ध जेवीं रशी।
विरक्ति करी जी मनी वरिल होतिये गादि कां।
सिधी मनि वचीं तितें कुलजधर्म कां तो त्यजो।
जयास तमि ठेविति सतत माणसें थेरडीं।
कफा दि जायें मारि कां न समयीं अखेरीस ती।
चुरी पलिकडे स्त्रिया अकल कोठची बोलती।

वरील ओळींतील बारमा, गोम, गौगवा, गादि. सिधी, थेरडीं, अखेरी, चुली, अकल हे शद्ब ध्यानात घ्यावे.

( ४ ) हत वृत्तत्व.

सदरील काव्यांत कांहीं ठिकाणीं छंदभंग ही झालेला आढळत आहे. खालील पद्यें पाहा.

किंवा कवण साधुची सफल पुण्य आशी गणा
विवाहित अनूढ कीं पितृगृहीं किंवा सासरीं।
किंवा जग विशाल दे सकल रंगभूमी ह्मणा।

( पुढें चालेल. )

## The Berar Samachar

MONDAY, AUGUST 8 1898.

The good old days of plenty are no more and the struggle for bread is very hard and keen. The present competition has introduced a new principle of classification. Possession of wealth is the dividing agent and our society is gradually being re—modelled on these new lines. The change is however hardly preceptible. Our people are very sluggish to adapt themselves to the new conditions of life. The western civilization is a new plant to be engrafted on the old society; and we do not know where we are being drifted by the process of the present social revolution. The standard of comfort is slowly pushed forward but we are not moving as a nation to prepare ourselves to live that new life which modern European influences force upon us. The claims of the latter life are far-reaching and we are called upon to live as an industrial nation if we mean to survive the slow and sure change that is coming upon India. India must not allow itself in its own market as well as the markets of the world to be supplanted by the European manu—facture. The new life demands foreign goods on a grand and extensive scale and it will take a good number of years before India can supply its markets with home—manufactured articles. When we see that we must unite ourselves for the common object of preserving our own nationality we are extremely sorry that our life is a curse to ourselves and to the country at large. We do not make any effort to awaken ourselves to the new demands of an industrial and commercial life and our inability and helplessness is most blamworthy when we do not equip well the rising generation with the educational requirements of the day. The government are fol—lowing a system of curtailing expendi-ture and are not prepared to give a fitting education. It is indeed deplorable because the government do not lift us higher to bring us to the level of their manufacturing natior. The social revolution of the day is destructive in so far as it does not enable us to compete with the other nations of the world in industrial and commercial life. Our fate is sealed and we shall be extinct as a nation if we do not come up to the new exigencies of a national life. The fact is plain enough and the question is whether we shall arrest the progress of events downwards or be for ever fallen. We hope the government to be benign and benevolent and with the hope we aspire to restore India to its old grandeur from its present position at the bottom in the scale of nations.

The British administration is not an unmixed blessing. Its courts of justice and the business of money—lenders have practically killed our peasantry as a class and this destructive process receives an additional force from the system of assessing and re—assessing land—revenue according to the sweet will of the government. The last famine was most powerful to bring down the peasantry in Berar to the level of mere day—labourers. The large number of agriculturists who owned land is fast dwindling and many land—owners have become simple labourers in the field. Poverty was at work amongst them for a number of years and the general indebtedness of the people hastened the work of ruin to an appreciable proportion. The magnitude of this down—fall of the land—owning classes in Berar is alarming and we are sorry for the sad fate that awaits a vast class of men who stuck to their land as the last thing they can transfor to others with a heavy heart. The process of transferring lands from the peasants to the money—lenders has developed in a number of unknown channels and if matters have their due course we shall be in a painful potition to see the last of the agri—culturists as a class. The Government of India have on their legislative anvil the biil of Interest with some proposals of giving Civil Courts full discretion to validate the agreements between borrowers and their money—lenders provided they satisfy their sense of giving fair and impartial advantage to the weaker parties. We have no faith in such partial and one—sided remedies to help the peasantry from the clutches of the money—lenders. The relief must be in actual cash and should leave the poor people no occasion to borrow from their old shylocks. Unless this is done we do not believe in the goodness of any relief given in a half—hearted measure.

The revenue from the sale of general and Court—fee stamps shows a great decrease whereas the increase in the registration of documents both com—pulsory and optional has a sure tendency towards a decided increase. These fluctnations cannot be only accounted for but we are forced to be content with the summary abstract of the Inspector General in this connection:—

"In every district there is an increase under optional registration, affecting immovable property and a decrease under compulsory registration, except Bassim and Wun, which show an increase under the latter head also. Under registrations affecting movable property, Akola, Basim, and Ellichpur show an increase, Buldana and Amraoti show a decrease; while Wun stands stationary. In total registrations Basim, Amraoti, and Wun show an increase, while Akola, Buldana, and Ellichpur show a decrease. The increase in the Basim district follows an increase in the previous year, and amounts to 27 per cent. Some of this increase is without doubt due to the opening of new offices at Jowalka and Manora, which together registered 500 documents, while the work in the old sub-districts of Basim and Mangrul, from which the new sub—districts were almost entirely taken, show a combined diminution of only 42 documents, the net increase being 458 or 34 per cent. Apart from this the general increase is an indication of progress in this district and of the growth of confidence in the efficacy of registration.

In the Wun district the increase amounts to nearly 20 per cent., but here it is of the nature of a recovery and the district is still very backward. The drop in Ellichpur, which amounts to 10 per cent., is remarkable, but the figures here for the previous year were exceptionally large."

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पाऊस थोडा पडला व एकंदर पाऊस १४ इंच झाला आहे. हवेंत थंडपणा थोडथोडा येत चालला आहे. पिण्याच्या पाण्याचें दुर्भिक्ष्य अद्याप संपलें नाहीं. सार्वजनिक आरोग्य साधारपणें चांगलें आहे.

आमचे लोकप्रिय आफिशिएटींग कमिशनर मि० हेअर साहेब हे गेल्या शुक्रवारीं वार्षिक तपासणीच्या निमित्तानें येथें आले. दोन तीन दिवस मुक्काम आहेत.

रा० रा० दामोदर नानाजी सिंदेकर क्लार्क आफ कोर्ट निसबत डिपुटी कमिशनर, अकोला, यांस दर्यापूरच्या तहशीलदारीच्या जागेवर नेमल्या प्रमाणें ते लवकरच तिकडे जातील.

रा० रा० सी. शामराव, अध्याची अकोला यांस समरी माजिस्त्रेटाचे अधिकार देण्यांत आले.

येत्या सोमवार पासून अकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे.

## आकोला बाजारभाव

| | | दर खंडी |
|---|---|---|
| आळशी | | ७८ रुपये |
| जवारी | ३८ पासून | ४२॥ रु० |
| गहू ( कांठे ) | | १२५ |
| ,, ( बनशी ) | | १३० |
| चणे | | ७७ |
| तेल | | ४।= |
| तूप | | ८॥ रु० मण |
| सोने | | २५ तोळा |
| चांदी | | ७५ |
| कपाशी | | ३५ |

नोटीस.

रामप्रताप रघुनाथदास दुकान अकोला यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस करण्यांत येते कीं अकोले मंगळवारा येथें मी राहतो त्या नजीक पूर्वेकडची तुह्मी जागा घेऊन दरम्यानचा बोळ असतां तो तुह्मी आंत घेऊन इमारत बांधली व वळचणांचे पाणी माझे घरावर घातलें त्यामुळें माझ्या घरांत पाणी सांचून सर्वत्र ओल झाली आहे व घरांतील माणसें देखील आजारी झालीं आहेत. यास्तव ही नोटीस पावल्या पासून तीन दिवसांत तुह्मी वळचण काढून टाकून तुम्ही आपले हद्दीतून पाणी न्यावें. मुदतशीर या प्रमाणें न केल्यास मी सर्व कौलारें काढून फेकून देईन व योग्य कोर्टांत याजबद्दल दावा केला जाईल. कळावें तारीख ५ आगष्ट सन १८९८ इसवी.

सही

शामराव सखाराम पिटीशन
रायटर राहणार अकोला
मंगळवारा दस्तुर
खुद्द.

नोटीस.

किरकोळ दि० मु० नंबर २ / १८९८

वि० जिल्हा ज्यडज्य साहेब बहादूर जिल्हा अकोले यांचे कोर्टांत सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं गंगाराम वल्लद रामबकस बनिया राहणार खामगांव हा तारीख २६।१०।९७ इसवी रोजीं खामगांव येथें मरण पावला. त्यानें तारीख १० माहे सप्टेंबर सन १८९७ इसवी रोजीं नथु वल्लद कन्हयालाल अगरवाले अज्ञानपालण करणार आई सुंदराबाई मर्दे कन्हयालाल राहणार खामगांव याचे नांवचें मृत्युपत्र लिहून दिले आहे त्यांत सदरहू मयताचे जिनगीचा मालक नथु वल्लद कन्हयालाल यांस केले आहे. त्यावरून मृत्युपत्रांत लिहिले प्रमाणें सदर्हू जिनगीची व्यवस्था करण्या करितां हुकूम मिळण्या विषयीं सुंदराबाई मर्दे कन्हयालाल राहणार खामगांव इनें आमचेकडेस अर्ज केल्यावरून सदरहू अर्जाची चौकशीची तारीख १९।९।९८ इसवी रोजीं दिवसा १० वाजतां अकोले येथें आमचे कोर्टांत नेमली आहे. तर ज्यास सदर्हू मिळकतीवर आपला हक्क संबंध दाखविणें असेल त्यानें सदरहू तारखेस नेमले वेळेस आमचे कोर्टांत हजर होऊन आपला हक्क संबंध दाखवावा. तसें न झाल्यास पुढें तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें तारीख ४ माहे आगष्ट सन १८९८ इसवी.

F. W. A. Prideaux
Deputy Commissioner and
District Judge
*Akola.*

## वर्तमानसार

नाशिकतालुक्यापैकीं कसबे त्रिम्बक येथें शाबतीपाशी चावडी (पोलीसची चौकी ग्वाट) आहे तेथें पोलिसचे जमादार व शिपाई रहात असतात. मौजे खरवळ येथील ९।३ कोळी इसम बंडखोर चोरश्यास सामील असल्याचे वहिमावरून त्यांस त्रिंबकास धरून आणले त्यांनीं पोलिसास हैबत्या खाड्या यांस आझी पकडून धरून देतो वगैरे नादीं लाऊन एक दोन दिवस सदर चावडीवर ते राहिले होते. गेले गुरुवारी रात्रीं ८।९ वाजण्याचे सुमारास पोलिसचे लोकांची नजर चुकवून त्यांच्या १।२ बंदुका संगिनीसुद्धां व ड्रेस कपडे वगैरे सामान चोरून घेऊन हे इसम पळून गेले त्यांचा आजवर तपास नाहीं. तपास जारीनें सुरू आहे.

आगगाडीचे एका डब्यांत एक तरुण फ्रेंचमन मिशाला पीळ घालीत बसला होता. त्याचेच समोर एक मद्रासी आप्या क्षौर केलेले बसले व त्यांच्याच जवळ एक मया—तैन व आलफ आपले मिशांचें जाळें साफ करीत बसले होते. इतक्यांत रेल्वे स्टेशनावर गाडी उभी राहिली आणि तिकिट तपासणारा गाडीचे कठड्यावर "टिकिटें" "टिकिटें" करूं लागला. तेव्हां हे राजश्री मिशाचे जाळींत कंगवा अडकवून तिकिट शोधूं लागले तों त्या तिकीट कलेक्टरानें हातांतील तिकिट कापण्याचा चिमटा त्याचे नाकावर मारून कंगवा उडवीला आणि 'टिकिटें जलदी निकालो', ह्मणून दुसरा टोला देणार तों यांनीं नाक मुठीत धरून तिकिट पुढें केलें तें पाहून तो मद्रासी गृहस्थाकडे वळला तोंच त्यानें अगोदर तिकिट पुढें केलें. ही कृती जवळ असलेला फ्रेंचमन पहात होताच. त्यानें आपले तिकिटास दोरा लाऊन तें गाडीचे खिडकीचे एका गजास अशा बेतानें टांगलें कीं, तें त्यांचे दृष्टीस तेव्हांच पडावें. पण तो टिकिट तपासणारा इतका चाणाक्ष नसल्यामुळें त्याच्या तें लक्षांत आलें नाहीं. खेरीज तो युरोपियन असून आपल्या अधिकाराच्या आणि पोरपणाच्या जोरांत असल्यामुळें त्याने या फ्रेंचमन जवळही याच ऐटीनें तिकेट मागितलें. त्यानें प्रथम तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. दुसऱ्यांदा मागितलें. तेव्हां त्या तिकिटाकडे नजर केली. तरी त्याचे लक्षांत न येतां तिसऱ्यांदा जरा रागानें तिकेट मागतांच त्यानें त्याचा कान धरून तिकिटाकडे तोंड वाकविलें! त्याबरोबर तो घाबरून मुकाट्यानें चालता झाला. इतक्यांत गाडीची शीळ होऊन ती चालू झाली. वाटेनें या तिघांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी चालतां चालतां वाणुकीवर विषय आला तेव्हां तो फ्रेंचमन मद्रासी गृहस्थास ह्मणाला, आपण मिशा काढतां ही गोष्ट चांगली कारण मिशा असल्या ह्मणजे त्यांना पीळ घालण्याची इच्छा सहजी उत्पन्न होते, ज्यांच्या अंगांत पीळ नाहीं त्यांनीं मिशा राखणें आणि जनावरांच्या खाण्याचेही उपयोगी न पडण्यासारखें गवत राखणें सारख्याच योग्यतेचें आहे असें आमचे लोक मानतात. याकरतां आपण मिशा राखीत नाहीं, हेंच चांगले इ० हें ऐकून हे कलेवाले तर दिग्मूढलेच पण लौरीसही स्वास्थितीबद्दल वाईट वाटलें असेल.

सूत—एका आनंदा नांवाच्या माहितगार कोळ्यास बरोबर घेऊन दरोडेखोरांचे तपासा करितां पेठेकडे गेलेली ६।७ इसमांची एक पोलिसपार्टी काल रोजीं पेठ तालुक्यांतील मौजे कोहोरें गांवीं मुक्कामास उतरून सैंपाकपाण्यांत गुंतली असतां दरोडखोरांचे एका टोळीनें रात्रौ तिजवर हल्ला करून त्यांचे बरोबरचा कोळी व पोलिसपैकीं एक नाईक असे दोन इसमांचा भयंकर रीतीनें खून करून आणखी २।४ पोलिसचे शिपायांस जखमी केल्याची व त्यांचे ड्रेस व हत्यारें नेल्याची वर्दंता आतांच आली आहे ही हकीकत खरी असल्यास दरोडखोरांपासून आजपर्यंत जो मारवाडी वगैरे रयत लोकांसच त्रास होत होता त्याची मजल सरकार पर्यंत पोंहचली तेव्हां आतां तरी सरकार या दरोडखोरांची उपेक्षा करणार नाहीं अशी आह्मास उमेद आहे. अ०

एका सूक्ष्मदर्शक यंत्र करणाऱ्या कुशल कारागिराचें असें ह्मणणें आहे कीं सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें अत्यंत सूक्ष्म अशा केसांचें देखील परीक्षण करितां येतें. तें इतकें कीं, त्या केसाच्या रचनेवरून ते केस स्त्रियांचे आहेत कीं पुरुषांचे आहेत हें समजावें.

व्हेरोनेजमधील फेगिटलोफ नांवाच्या एका वनस्पतिशास्त्रवेत्त्यानें अगदीं शुद्ध काळ्या रंगाचा गुलाब कांहीं रसायनी क्रियेनें उत्पन्न करितां येतो असा अनुभव घेऊन पाहिला आहे. त्यांचे या कामीं सारखे दहा वर्षे प्रयोग चालले होते. शेवटीं त्यांत त्याला चांगलें यश आलें.

मि० टेस्ला या नांवाच्या एका शिल्पशास्त्रज्ञानें असें शोधून काढलें आहे कीं, कृत्रिम विजेच्या सहाय्यानें पृथ्वीवरून आकाशांत सुद्धां तारायंत्र नेतां येईल. जर त्या ठिकाणीं बातमी घेण्यादेण्याला कोणी माणसें असतो, तर तारायंत्रानें खगोलांतली प्रत्येक बातमी खालीं आणला असता.

लंडनपासून बर्मिंगहॅमपर्यंत समुद्रांतून जें तारायंत्र आहे त्याच्या तारा कागदाच्या केलेल्या आहेत. त्या कागदांत तांब्याची तार घातलेली असते. गटापर्चाच्या दोरखंडापेक्षां याला खर्च फारच कमी लागतो.

ज्या प्रमाणें करवतींनीं मोठमोठे लांकडाचे ओंडे कापतात त्याप्रमाणें मोठमोठे दगड कापण्याचें यंत्र फ्रान्सामध्यें एका हुशार शोधक गृहस्थानें नवीन शोधून काढलें आहे. तें यंत्र पोलादी दोरखंडाचें केलेलें असून त्याला वरून बारीक वाळू लावलेली आहे तें करवताच्या दातापेक्षांही तीक्ष्ण आहे.

व्हिक्टोरियामध्यें नीं डिंकाचीं झाडें आहेत त्यांच्या इतकीं उंच झाडें दुसऱ्या कोठें ही नाहींत. त्यांची उंची सरासरी ३०० फूट असते.

पूर्व आफ्रिकेंत एक पाण्याचा मोठा थोरला प्रवाह आहे. तो समुद्राकडे वाहत जातो पण त्याला मुळींच मिळत नाहीं. विषुववृत्ताच्या उत्तरेकडे व इंडियनओशन पासून बऱ्याच मैलाच्या अंतरावर तो एका वाळवंटाच्या मैदानांत वाहत गेलेला आहे. त्या ठिकाणीं तो एकदम अदृश्य झालेला आहे.

सेंट पिटर्सबर्ग पासून टॉमस्कपर्यंत जी आगगाडी केलेली आहे, तिच्या इतकी चैनी व विलासी रेल्वे दुसऱ्या कोठें नसेल. तींत उत्तम मखमलीनें मढविलेल्या खुर्च्या, कांचे सुंदर लायब्ररी, जेवणाची उत्कृष्ट सोय, स्नाना करितां उत्तम स्नानगृहें, विजेचा उत्तम प्रकारचा दिवा, वाजाची पेटी, खेळायच्या पत्त्याचे जोड व तालमीचें सर्व सामान, इतक्या गोष्टीची अगदीं पहिल्या नंबरची व्यवस्था केलेली आहे.

जगावर जितके ह्मणून समुद्र आहेत तितक्या साऱ्या समुद्रांतून फार झालें तर ९००००००००००००००० इतकें टन मीठ सांपडेल. ह्मणजे त्या मिठाचा थर जमिनीवर दिला तर तो १००० फूट जाडीचा होईल.

ज्यू लोकांत बायको नेहमीं नवऱ्या उजव्या हाताला बसते. व इतर देशांत बायको डाव्या हाताला असते.

झुलूलंदमध्यें चंद्राचा पूर्ण प्रकाश असला ह्मणजे सात मैलाच्या अंतरावरचे पदार्थ चांगलें स्पष्ट दिसतात. नुसत्या चांदण्याचा प्रकाश असला तर चांगलें वाचतां येतें.

युनायटेड किंगडममध्यें प्रतिवर्षीं पोष्टाचीं कार्डें तयार करण्याकडे कमींत कमी ७२००० इतका टन कागद खर्च होतो.

ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल १२०००००० इतक्या पौंड किंमतीचे कातडें नुसते बूट तयार करण्याकडे खर्चतें.

ग्रेट ब्रिटनचें प्रधानमंडळ.—या चालू शतकांत हल्लींचे धरून सुद्धां ग्रेट ब्रिटनच्या प्रधानांची संख्या ऐकोणीस आहे. त्यांचीं नावें खालीं लिहिल्या प्रमाणें:—१ लॉर्ड सिडमाऊथ. २ ड्यूक आफ वेलिंगटन. ३ अर्ल ग्रे. ४ लॉर्ड पामरस्टन. ५ अर्ल रसेल. ६ ड्यक आफ पोर्टलंद ७ लॉर्ड रिपन. ८ लार्ड अबरडीन, ९ लॉर्ड बीकन्सफील्ड, १० लार्ड ग्रेनव्हेली, ११ सर रॉबर्ट पील १२ लार्ड डर्बी, १३ मि० पर्सिव्हल, १४ लॉर्ड लिव्हरपूल्ड, १५ मि० क्यानिंग १६ मि० पिट, १७ मि० ग्लाडस्टन, आणि लार्ड सॉलिसबरी व लॉर्ड रोजबरी उभयतां हयात असून त्यांचीं वयें अनुक्रमें ६१।५१ वर्षांचीं आहेत. एकून १९ प्रधान होतात हीच नांवनिशीं अगदीं क्रमवार आहे असें नाहीं.

असे बहुत कालपर्यंत जळत असलेले दिवे आज काल बरेच शोधून काढले आहेत. ह्मांत रोममधील व्याया आपिया येथील एका थडग्यांत एक दिवा सापडला. तें थडगें सोळाव्या शतकांत बांधलें गेलें. तें सिसरोची पोरगी टुलिया नांवाची होती तिचें होय. तो त्या थडग्यांतून जेव्हां बाहेर उकरून काढली, त्यावेळेस तेथें एक दिवा जळत असलेला दृष्टीस पडला. तिला पुरून आज सुमारें १५०० वर्षें झाली. तेव्हांपासून तो दिवा तिच्या थडग्यांत जळत होता असें ह्मणतात तिचें केंस एका सोन्याच्या दोरीनें बांधिले होते. तिला त्या थडग्यांतून बाहेर काढतांच तिच्या शरीराचा अगदीं भुगा झाला व तो दिवा एकदम विझून गेला. त्याप्रमाणें दुसरे कित्येक पांचशें हजार, आठशें वर्षांचे दिवे आढळण्यांत आले आहेत.

| | दर वर्षीं पौंड |
| --- | --- |
| महाराणी व्हिक्टोरिया.... .... | ३८५००० |
| रशियाचा झार .... | ....२५००००० |
| टर्कीचा सुलतान .... ....,.... | १५८०००० |
| आस्ट्रियाचा राजा .... .... | ९३०००० |
| इटालीचा राजा ........ | ....५८५००० |
| बेलजियमचा .... ........ | १२५००० |

येणें प्रमाणें प्रतिवर्षीं वरील राजस्त्रीपुरुषांना त्यांच्या खाजगी खर्चाला ह्मणून वर नमुद केलेल्या रकमा खर्चीं पडतात.

रेव्हरंड एस. बेअरिंग गूल्ड नांवाचा एक इंग्लिश ग्रंथकार आहे, त्याच्या इतका विशाल लेखक आजकाल कोणीही नसेल. यानें एकंदर १३० ग्रंथ लिहून तयार केलेले आहेत. ते सर्व ब्रिटिश म्युझियममध्यें आहेत. मि० ॲन्ड्रू लँग नांवाच्या एका ग्रंथकारानें तर १३४ ग्रंथ लिहिलेले आहेत. डा० फर्निव्हलनें ११८ व मि. पर्सि फिट्झगर्लंड यानें ९८ ग्रंथ लिहिलेले आहेत. यांच्या तोडीची एक स्त्री लेखक आहे. तिचें नांव मिस ब्रॅडन. शिवाय ज्यूल्स व्हेर्नी नांवाचा एक फ्रेंच कादंबरीकार आहे तो तर दरवर्षी दोन पुस्तकें बाहेर काढतो. याचा जन्म इ. स. १८२८ मध्यें झाला. अजून त्याचें ग्रंथोत्पत्तीचें काम अगदीं अव्याहत चाललें आहे. त्याच्या कादंबरी भारीच लोकप्रिय झालेल्या आहेत. अगदीं ह्मातारवयापर्यंत ह्मणजे लिहिणें जितक्या वर्षे शक्य आहे तितक्या वर्षांपर्यंत लिहून तो पुस्तकावर पुस्तकें लिहून काढणार आहे. त्याचें पहिले नॉव्हेल "विमानांतील पांच आठवडे" हें होय. आणि सगळ्यांत अतिशय नांवाजलेली कादंबरी "ऐशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा" ही होय.

सगळ्या जगामध्यें साडेबारा लक्ष एकर जमिनींत तमाखूची लागवड होते.

ग्रेटब्रिटनांत तमाखु व तमाखुच्या नळ्या याजकडे दरसाल एकवीस कोटी रुपये खर्च होत असें एका हिशेबी गृहस्थानें अजमावलें आहे. क०


# जाहिरात

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें खील एक ठेव ठावितां यईल. व त्यांच्य हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. पात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

टीप:—तारीख १ आगस्ट १८९८ इ० पासून वरील ठेवीवर दरसाल दर शेंकडा तीन रुपये व्याज दिलें जाईल.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै
१८९८

A. G. Watson
Agent.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

„ „ १ ०८
किरकोळ अंकास ……………………०४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस……… ०१ ०६
दुसरे खेपेस …. ….….०१

Six monthly………
Single copy ………………

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines …… 2 Rs
Per line over 10 ……4 as
Repetition Per line…3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII | AKOLA MONDAY 15 AUGUST 1898 | NO 32

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख १५ माहे आगष्ट सन १८९८ इ० | अंक ३२

NOTICE

In the matter of the Estate of Henry Alexander Heath late of Yeotmal, Berar, European inhabitant deceased.

Notice is hereby given that all persons claiming against the Estate of Henry Alexander Heath abovenamed who died at Yeotmal aforesaid on or about the 21st. day of August 1897 and Letters of Administration with the will and Codicil annexed of whose estate having effect throughout the Province of Bombay were grantep on the 27th. day of July 1898 to Thomas Withey Cuffe Esquire are required to send in their claims to the said Administrator at his office, Standard Buildings Fort Bombay within one Calendar month from the date hereof at the expiration of which time he will hand over the assets to the persons entitled thereto, having regard only to the claims of which he shall then have notice.

All persons indebted to the Estate of the the said deceased or having property belonging to him are required to pay their debts or hand over such property to the said Administrator.

Dated this 6th. day of August 1889.

Craigie Lynch & Owen
Administrator's Attorneys

## जाहिरात
### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक } A. G. Watson
आकोला १५ जुलै } Agent.
१८९८ }

## गणपती उत्सव.

मोठमोठ्या विद्वान लोकांचें असें मत आहे कीं धर्म संबधाच्या राष्ट्रीय महोत्सवापासून साधारणपणें तीन मोठे फायदे आहेत परमार्थं मिळविण्या विषयींचीं मुख्य तत्वें आणि ज्ञानभक्ति इत्यादि गोष्टींचा असल्या गोष्टींनीं प्रादुर्भाव होतो. प्रत्येक पोट जातीचे लोक भक्ति भावानें इच्छित देवतेची पुजा करण्यासाठीं एके जागीं मिळतात व त्या योगानें सुशिक्षित व समंजस लोकांना ऐहिक व पारमार्थिक विषयावर आपलीं निरनिराळीं मतें मांडण्यास संधी सांपडते. व अशीं कामें करण्यासाठीं लोकांनाही उत्साह वाटतो आणि अशा योगानें सात्विक सुखाचा लाभ राष्ट्रास मिळतो. नाना जातीचे लोक एक ठिकाणीं मिळाल्यामुळें त्यांचे एकमेकाचे हरएक बाबतींतले विचार एकमेकास कळतात, व अशा योगानें दळण वळणही बरेंच वाढतें. कितीही भयंकर प्रसंग राष्ट्रावर आले, कितीही अरिष्टें राज्यकर्त्यांवर उत्पन्न झालीं तरी जर राष्ट्रांत अशा तऱ्हेची लोकांची जूट असेल तर कसल्याही विघ्नांस हाणून पाडण्यास रयत सुशिक्षित लोकांच्या मदतीनें नेहमी तयार असते. अशा तऱ्हेचे उत्सव प्रत्येक राष्ट्रांत होत असतात. आपल्या ह्या दारिद्र्यानें पिडिलेल्या हिंदुस्थान देशांत अशा तऱ्हेचे उत्सव विशेषेंकरून फारच थोडे आहेत. त्या पैकींच श्री गणपतीचा उत्सव हाही एक आहे. पेशवाईचा लय झाला, हिंदु पद पादशाहीचा अम्मल नष्ट झाला, व कुंपिनी बाईचा अंमल सुरू झाला त्या नंतर मलिकामा आझमा व्हिक्टोरिआ यांनीं हिंदुस्थानची सुखदुःखाचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. हिंदुस्थानची हिंदु देवस्थानें व महोत्सवा प्रीत्यर्थ पेशव्यांनीं बक्षिस ह्मणून दिलेलीं वर्षासनें यांचा निकाल करून खालसांत जमा करावीं कीं काय अशा तऱ्हेचा प्रश्न एकवेळ मागें निघाला होता त्यावेळीं नामदार एलफिन्सटन साहेबांनीं असा जबाब दिला कीं ‘असल्या महोत्सवा पासून राष्ट्रास जें शिक्षण मिळतें तें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनीं मिळणार नाहीं सबब ह्या देणग्या बद्दल सरकारनीं हट्ट करूं नये’ ज्या राष्ट्रांत धर्मबुद्धि नाहीं तें राष्ट्र जीवंत काय आणि मेलें काय सारखेंच असेंच इतर नामांकित लोकांचें मत आहे. हल्लीं अशा महोत्सवास उत्तजन देण्यांत जे श्रम व खर्च होत आहेत ते सर्व व्यर्थ आहेत असें कित्येकांचें ह्मणणें आहे. उगीच धर्माची आस्था दाखवून जातीजातींत द्वेष वाढविणें चांगलें नाहीं. असें कित्येकांचें ह्मणणें आहे. नेहमी सरकारची बाजू धरून खऱ्या खोट्याचा निर्णय न करितां लिहिणाऱ्या अंग्लो इंडियनांनीं अशा प्रकारच्या उत्सवास राजद्रोही ह्मटलें आहे. अशा प्रकारचे आक्षेप आपल्या श्रीगणपती महोत्सवावर आलेले आहेत. हा आरोप मिथ्या असून श्रीगणपतीचा उत्सव खरोखर चांगला आहे असें समजून लोक तो करीत असतात. मुसलमान लोक ताबूत करून आपली धर्मजागृती दर्शवितात ती हिंदु लोकांशी भांडण तंटे करण्याच्या आशेनें दाखवीत नसून प्रेमळ अंतःकरणानें ईश्वराची सेवा करितात असें दर्शवितात त्याचप्रमाणें श्रीगणपतीचा उत्सव हाही आहे जातीजातींत द्वेष वाढवून चीड आणण्या सारखे प्रकार हिंदलोकाचे मनांतून नसतात. ते केवळ ईश्वरभक्ति ह्मणूनच हे उत्सव करितात. अशा उत्सवास राजद्रोही ह्मणणें आणि त्याच्या पुढाऱ्यावर राजद्रोहाचे आरोप करणें ह्मणजे मूर्खपणाची कमालच करण्या सारखें आहे. श्रीगणपतीच्या उत्सवा प्रीत्यर्थ अलीकडे पुणें वगैरे ठिकाणीं कांहीं चमत्कारिक गोष्टी घडून येतात त्याबद्दलचे दोन शब्द सांगितले असतां वावगें होणार नाहीं असें मला वाटतें ह्मणून मुद्याच्या कांहीं गोष्टी सांगण्याचें खालीं देतों.

१ देशी कपडा वापरण्या संबंधानें अलीकडे बऱ्याच लोकांच्या मनाची प्रवृत्ती झाली आहे. परंतु श्रीगणपतीच्या उत्सवांत जे मेळे निघतात त्यांत स्वदेशी कपड्यास अगदींच फांटा मिळून विलायती कपड्याची बरीच चंगळ उडते, व दिवसें दिवस विलायती मालाकडे अशा रीतीनें मनाची प्रवृत्ती होत गेल्यास स्वदेशी कापडास कोणीही विचारणार नाहीं.

२ मेळ्यांत जीं पदें ह्मणण्यांत येतात तीं कांहीं अंशीं परकीयास चीड उत्पन्न करण्या सारखीं आहेत. त्या पदांत देवाचीच स्तुती असावयास पाहिजे, परंतु तसें नसून कैक वेळा निंदादर्शक मतलब असतो.

३ घरीं मीठ भाकरी मिळण्याची पंचाईत असलेल्या लोकांना सुद्धा कर्ज काढून असा थाटमाट करण्याचा नाद लागल्यामुळें लोक कर्जबाजारी होण्याचा संभव फार आहे.

४ पैसे निरर्थक फार खर्चले जाऊन त्या पासून यत्किंचितही फायदा होत नाहीं. इ० इ०

अशा तऱ्हेच्या गोष्टी फक्त करूं नयेत या शिवाय दुसरे खेळ, दुसऱ्या करमणुकीच्या गोष्टी, शारिरिक श्रमाच्या गोष्टी, इ० केल्या तर फार हितावर होऊन लोकांच्या निंदेस पात्र होण्याचा संभवही फार कमी होईल. येवढ्याच कारणा करितां पुढें येणारा श्री गणपतीचा उत्सव करतेवेळीं मंडळींनीं वर दर्शविलेल्या गोष्टीकडे लक्ष द्यावें अशी सूचना आहे. ता० २८-७-९८ इ०

सारासार विचारी.

## अहल्या चरित काव्य

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि.

खालीं जो मी मजकूर लिहीत आहे त्या संबंधानें पाहूं गेलें असतां या पत्रास वरील माथळा नको आहे. तथापि या काव्यासंबंधानें आपल्या पत्रांत जी हल्लीं टीका येत आहे तिच्या टीकाकारांना आणि त्या टीकेच्या वाचकांना संबोधून हा माझा लेख आहे व त्याकडे त्यांचें लक्ष एकदम वळावें यासाठीं हा माथळा मुद्दाम घातला आहे. वास्तविक पहातां माझ्या पत्राला ‘ काव्याची भाषासरणी, टीका आणि शद्बांचें ग्राम्यत्व ’ हा माथळा अवश्यक आहे परंतु असा माथळा घातला असतां सदर्हू टीकेच्या टीकाकारांचें व तिच्या वाचकांचें तिकडे अवश्य लक्ष जाईल, असा नेम नाहीं; ह्मणून लक्ष जाण्यास आवश्यक असा माथळा घातला आहे तो कृपा करून कायम ठेवावा.

अहल्या चरित काव्याच्या प्रस्तुत टीकाकारांनीं जितक्या काळजीनें तें काव्य वाचलें असेल तितक्याच काळजीनें किंबहुना कांकणभर जास्त काळजीनें मीं ही तें वाचलें आहे. परंतु त्यांना जितकें तें त्याज्य वाटत आहे तितकें कांहीं मला वाटत नाहीं. एकंदर टीकेवरून मला असें दिसतें कीं, सदर्हू टीकाकारांचें मराठी काव्य ग्रंथांचें अवलोकन असावें तितकें विस्तीर्ण नाहीं, आणि काव्याची भाषासरणी टीकेचा उद्देश, व शद्बांचें ग्राम्यत्व, या विषयींही त्यांचे विचार कायम झालेले नसून इतर विद्वानांचे या गोष्टींच्या संबंधानें अभिप्राय त्यांच्या वाचनांत केठपर्यंत आले आहेत, हेंही माझ्यानें सांगवत नाहीं. परवां मी कै. महादेव मोरेश्वर कुंटे, यांनीं केलेलें ‘ राजाशिवाजी ’ नांवाचें काव्य सहज पहात असतां त्याची प्रस्तावना वाचली. ही प्रस्तावना इंग्रजीमध्यें असून तिची एकंदर २८ पृष्ठें आहेत. कुंटे हे इंग्रजींत महापाण्डित असून संस्कृत आणि मराठी भाषांचे उत्तम अभिज्ञ होते, हें आपणां सर्वांस माहीत आहेच. आणि यांच्या प्रस्तावनेंत ज्या तीन मुद्यांसंबंधानें मी त्यांचें मत देत आहे त्या संबंधाचा शांतपणें व सर्व दृष्टींनीं विचार त्यांनीं केला आहे. ती प्रस्तावना एकवार वाचण्या बद्दल अहल्या चरित काव्याचे टीकाकारांस व तिच्या वाचकांस मी शिफारस करतों. परंतु सर्वांस तें पुस्तक उपलब्ध होणार नाहीं, आणि सर्वांच्या हातून ती सर्व प्रस्तावना वाचण्याचेंही कदाचित् होणार नाहीं; याकरितां तींतील संक्षिप्त उतारे खालीं देऊन मराठी वाचकांकरितां त्यांचें भाषांतर ही देतो. प्रथम कुंटे यांनीं कलम ६ यांत Negative Criticism ह्मणजे ‘ निषेधात्मक किंवा दोषाविष्करणात्मक टीका ’ याबद्दल लिहिलें आहे. तो उतारा लहान असल्यामुळें जशाच्या तसा देतों.

‘ Negative Criticism is indefinite and endless, but transiently injurious to authors. Negative Criticism requires to be distinguished from positive criticism. The former arises from ignorance and vanity; the latter from knowledge and large—minded—ness.

He raves and seeks demolition, the other sticks to the point, and encourages construction. The first can be managed by *any body*. The last a *real critic* alone can do.'

भाषांतर

'दोषाविष्करणात्मक टीकेला कांहीं धरबंध नसतो, आणि तो हवी तशी करतां येऊन, हवी तिकडे नेतां येते. मात्र ती तितक्यापुरती कवीस आहितकारक होते. ही टीका गुणग्रहणात्मक टीके पासून ओळखणें जरूर आहे. पहिल्या प्रकारची टीका अज्ञान आणि वृथाभिमान यांपासून उत्पन्न होते, व दुसऱ्या प्रकारची टीका करणारा विद्वान आणि धीर मनाचा असावा लागतो. पहिल्या प्रकारची बडबडीची असते, आणि तिचा उद्देश असेल तें नष्ट करण्याचा असतो. आणि दुसऱ्या प्रकारची टीका मुद्याला धरून असते आणि तिचा उद्देश अधिक ग्रंथ होण्यास उत्तेजन देण्याचा असतो. दोषाविष्करणात्मक टीका लागेल त्या मनुष्यास करतां येते; पण गुणग्रहणात्मक टीका करण्यांचें काम खऱ्या टीकाकारालाच मात्र करतां येईल."

आपले प्रस्तुत टीकाकार वरील दोहोंपैकीं कोणत्या प्रकारचे आहेत, हें वाचकांच्या लक्षांत येईल. शब्दांच्या ग्राम्यत्वाच्या संबंधानें मि० कुंटे यांनीं प्रस्तावनेच्या ९ व्या कलमांत जे विचार लिहिले आहेत, ते अगदीं यथार्थ दिसतात. तिकडेही आपल्या वाचकांचें लक्ष मी ओढण्यास इच्छितों.

"Again if pure Marathi words were largely introduced into poetical compositions, writers would be exposed to the opposite danger of using vulgarisms. This is, to a certain extent, reasonable, and vulgarisms should be avoided by all means. I have not put here a mere supposition. An educated critic actually favoured me with a list of what he considered to be vulgarisms. If tried by his standard, the greater portion of the Marathi language would have to be proscribed. But certainly a word, as such, cannot be vulgar or otherwise. It is the sense of a word, that requires to be considered. A vulgarism, therefore, may be defined to be a word or an expression which conveys *heinous*, *obscene* and *nauseating* sense. I assure the reader that I have always taken great care to avoid such vulgarisms. If this definition were not recognized, *the charge of using vulgarisms could be brought against almost every writer*. I ought to be prepared, therefore, to submit to what is the lot of all."

भाषांतर

"दुसरी गोष्ट अशी कीं पद्यात्मक काव्यांत जर शुद्ध मराठी शब्द पुष्कळ घातले तर ग्राम्य शब्दांचा प्रयोग करण्याचा भयंकर आरोप कवींवर येईल. कांहीं अंशीं असा आरोप येणें रास्त आहे. आणि ग्राम्य शब्द तर सर्वथैव त्याज्य आहेत. हें मी नुसतें कल्पनेनेंच लिहितों असें नाहीं एका विद्वान टीकाकारानें त्याच्या मतें जे त्यास ग्राम्य शब्द वाटले, त्यांची प्रत्यक्ष यादी मला आणून दिली. तीबद्दल त्याचे मी उपकार मानतों. मराठी भाषेंतील शब्दांचीं निवडा निवड त्या टीकाकाराच्या मानानें केली तर अर्ध्याहून अधिक शब्दांना बहिष्कार घालावा लागेल. परंतु वास्तविक पाहूं गेलें असतां एखादा शब्द मराठी आहे ह्मणूनच तो ग्राम्य किंवा ग्राम्येतर आहे असें नाहीं. त्या शब्दाच्या अर्थाचा विचार केला पाहिजे. यासाठीं ग्राम्य शब्दाची व्याख्या माझ्या मतें अशी करावी कीं जो शब्द किंवा जें वाक्य घोर, बीभत्स, अथवा घाणेरड्या अर्थाचें द्योतक असेल त्या शब्दास किंवा त्या वाक्यास ग्राम्य असें ह्मणावें. अशा प्रकाची ग्राम्यता माझ्या काव्यांत न येऊं देण्याबद्दल मी फार काळजी घेतली आहे. हें मी वाचकांस खात्रीपूर्वक सांगतों. जर ही व्याख्या मान्य केली नाहीं, तर ग्राम्यत्वाचा आरोप बहुतेक प्रत्येक ग्रंथकारा विरुद्ध आणतां येईल. या करितां जी गोष्ट बहुतेक सर्व ग्रंथकारांच्या हिश्शास येण्याची आहे, त्या गोष्टीला मलाही तयार राहिलें पाहिजे."

वरील उतऱ्यांत ग्राम्यत्वाच्या संबंधानें जितकें कांहीं लिहिणें आणि विचार करणें अवश्यक आहे, तितके सर्व लिहिलेलें व विचार केलेलें आहे. अहल्या चरित काव्याच्या टीकाकारांनीं जे शब्द ग्राम्य किंवा अत्यंत व्यावहारिक ह्मणून दाखविलेले आहेत त्यांच्यापेक्षां अधिक ग्राम्य किंवा अधिक व्यावहारिक शेंकडो शब्द कुंट्यांच्या 'राजाशिवाजीं'त ओतप्रोत भरलेले आहेत. कारण कुंटे यांचें काव्य सांगून सवरून शुद्ध मराटींत लिहिलेलें आहे. व तें अशा बाण्यानें लिहिलें आहे कीं, जेथें त्या अर्थाचा मराठी शब्द नसेल तेथेंच संस्कृत शब्द वापरायाचा आणि प्रस्तुत टीकाकारांच्या मतें जे शब्द ग्राम्य किंवा व्यावहारिक ठरतील, अशा शब्दांनीं भरलेलें हे काव्य नामदार रानडे यांनीं जी उत्तम ग्रंथांची यादी अलीकडे प्रसिद्ध केली आहे, तींत स्थान पावलें आहे. तेव्हां ग्राम्यते संबंधानें विद्वान लोकांचे ग्रह प्रस्तुत टीकाकाराहून भिन्न दिसतात. हें सांगणें नकोच. गुणावगुणा संबंधानें उभयता काव्यांची तुलना करण्याचा माझा बिलकूल हेतू नाहीं. ग्राम्यते संबंधानें निदान एका महा पंडिताचे विचार काय आहेत, हें दाखविण्याचा माझा हेतू आहे. आतां तिसरी गोष्ट 'काव्याची भाषासरणी' ही बद्दल यांनीं जे लिहिलें आहे, तें लांबलचक असल्यामुळें त्याचा गोषवारा मी पुढील पत्रीं देईन. कळावें.

आपला

'एक नेमस्त विचारी'

---

वऱ्हाडसमाचार

---

मित्ती श्रावण वद्य १४ शके १८२०

---

मुख्य अधिकारी कच्चा असला ह्मणजे विघ्नां मागून विघ्नें कशीं निपजतात यांचा प्रत्यक्ष दृष्टांत लार्ड एलजिन यांची कारकीर्द होय. मूळ पाया मक्कम पाहिजे असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. नित्याच्या व्यवहारांत देखील कांहीं कांहीं प्रसंग असे येतात कीं तेव्हां एक जोरदार निश्चयाची बाजू घ्यावी लागते अशा वेळीं ठरीव संकल्प ढळला व थोडीशी कचर खाल्ली कीं सर्व घर फसतें. आपापल्या विचारांची मूळ दिशा चुकविता कामा नये आणि तसें करितांना स्वमताच्या स्थापनेसाठीं मनुष्याला दुसऱ्याच्या मनांचा क्षोभही करावा लागतो. लार्ड एलजिन व्हाईसराय होऊन आले तेव्हां त्यांच्या विषयीं फार उत्तम ग्रह होता पण पुढें त्यांच्या कौंसिलदारांचें देव्हारें फार माजलें आणि लार्ड एलजिन यांची सद्बुद्धि दुसऱ्याच्या गतीनें फिरूं लागली. मध्यवर्ती सूत्रधाराची चालनक्रिया बंद पडली व सभोंवतालच्या कौंसिलदारांनीं अस्ताव्यस्त भराऱ्या मारल्या आणि परिणामीं लार्ड एलजिन यांच्या कारकीर्दी इतकी वाईट कारकीर्द कोणाचीच झाली नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें सांप्रत इंडियांत जी राजपद्धती चालूं आहे तिजपासून या देशाचा मोठा ऱ्हास होत चालला आहे. लार्ड एलजिन यांच्या कारकिर्दी संबंधानें बाबू रोमेशचंद्र दत्त यांनीं गेल्या 'इंडियांत' एक नामी लेख लिहिला आहे. लार्ड एलजिन विषयीं सर्व आशा नष्ट झाल्या. राज्यें जोडण्याची पद्धति त्यांनीं वायव्य सरहद्दीकडे चालविली, देशाचा खजिना रिता केला व देशाच्या सांपत्तिक सुधारणा तितक्या मानानें मागें टाकल्या. १८९८ च्या महाराणी सरकारच्या जाहिरनाम्यांतल्या शर्तीला तिलांजली दिली, सरहद्दीवरील लढाया चालू केल्या व व रानटी लोकांस जर्जर केलें यांत पुरुषार्थ तो कोणता! लार्ड डफरिन यांनीं १ कोट पौंड खर्चून ब्रह्मदेश काबीज केला. लार्ड लान्सडाऊन यांनीं सेनाधिपती लार्ड राबर्टस यांस सरहद्दीच्या लोकांवर पाठविलें, तिकडे अन्यायानें दाणादाण केली, व इंडियाचा पैसा पाण्या प्रमाणें फुकट खर्चून टाकला. या दोघांच्या मागून लार्ड एलजिन आले ह्मणून आनंद वाटला होता पण सर्व मनोरथ विरून गेले. लार्ड एलजिनचे स्तुतीपाठ स्टेट सेक्रेटरी यांनीं गाईले तरी इतिहासकर्ता व लोकमत हीं या कारकिर्दीचें चित्र कृष्णवर्ण काढतील. कोळसा अधीक उगाळण्यांत अर्थ नाहीं व जाणाऱ्या व्हाईसरायांस दोष देण्यांत मोठेपणा नाहीं परंतु भावी येणाऱ्या व्हाईसरायांच्या उपयोगासाठीं सर रोमेशचंद्र यांनीं हें चित्र तात्पर्यावर नजर देऊन काढलें आहे. लार्ड एलजिन स्वभावानें गोड व निर्मळ मनाचे असे आहेत परंतु ते सभोंवतालच्या लोकांच्या स्वाधीन फार झाले होते, मृदु माती प्रमाणें ते होते. तिला रूप व आकार स्वेच्छे प्रमाणें देता येतो. राजद्रोहाचे बंड यांच्या कारकिर्दींत यांनींच फार माजविलें होतें. राजद्रोह खरोखरच नाहीं तोंपर्यंत सरकारचे कायदे वृथा आहेत. आणि राजद्रोह उत्पन्न होईल तेव्हां त्यांचा कांहींच जोर चालणार नाहीं. लार्ड एलजिन यांनीं सरहद्दीवरील लढाईच्या खर्चा निमित्त इंग्लंडाची मदत नको ह्मणून विद्युत्संदेशही धाडला! ही गोष्ट वस्तुदृष्ट्या वाईट असून मोठी लांछनास्पद होय. अशा अनेक गोष्टींनीं परिपूर्ण ही कारकीर्द लवकर संपते हें दुःखांत सुख होय. ईश्वर करो व दुसरा व्हाईसराय चांगला मिळो. लार्ड रिपन पुन्हा येतील काय?

---

लार्ड एलजिन यांच्या मागून नामदार जार्ज एन. कर्झन हे व्हाईसराय होतील. यांची नेमणूक पक्की झाल्या विषयीं विलायतेची तार सांगते. व्हायकौंट क्रास स्टेट सेक्रेटरी होते त्यावेळीं हे अंडर सेक्रेटरी होते. त्यांचा अनुभव आह्मास त्या काळीं आला आहे. इंग्रजी आन्हिक पत्रें त्यांच्या नामघोषानें आपले कालमाचे कालम अडवीत आहेत तथापि आह्मास या नेमणुकी संबंधानें मोठासा आल्हाद वाटत नाहीं. प्राप्त गोष्टीला सादरता दर्शविलीच पाहिजे. लार्ड एलजिन प्रथम आले तेव्हां मोठा आनंद वाटला होता परंतु परिणामीं त्याचा विपर्यास झाला आहे. नामदार कर्झन यांचा गुणानुवाद त्यांच्या मध्य एशिआंतील राज्यकारस्थानाच्या माहिती संबंधानें गात असतात आणि त्याला आधारभूत कर्झन साहेबांचा ग्रंथच होय. हे गृहस्थ चाळिशीच्या भरांतले आहेत. त्यांची विद्वत्ता व तरतरी फार सांगतात आणि ते आपल्या हाता खालील लोकांच्या ओंजळीनें पाणी पिणारे नाहींत असें ह्मणतात. आह्मास असाच खंबीर व्हाईसराय पाहिजे आहे आणि परमेश्वर कृपेनें त्यांची पंच वार्षिकी कारकीर्द या देशास अत्यंत लाभप्रद होवो!

---

सर रिचर्ड मीड हे १८७५ पासून १८८१ पर्यंत हैदराबादचे रेसिडेंट होते हे सर्वांस ठाऊकच आहे. त्यांची ती भव्य धिप्पाड मूर्ती पुष्कळांच्या स्मरणांत असेल. हे मोठे रणशूर होते. त्यांचें चरित्र डाक्टर थार्नटन यांनीं लिहिलें आहे. डाक्टर थार्नटन हेही सरकारी मोठे हुद्देदार होते. या चरित्राच्या ओघानें हैदराबाद दरबारा विषयीं ही त्यांनीं बराच भाग लिहिला आहे. निजाम सरकारा बरोबर १८५१ सालीं झालेल्या तहनाम्या संबंधानें ते ह्मणतात कीं "या तहामुळें निजामच्या दरबारास अमूल्य व अगाणित फायदे झाले आहेत. या तहानें ब्रिटिश सरकार व निजाम सरकार यांच्या मधील कलहाचें मूळ स्थायिक कारण दूर केलें, कांटिनजंट फौजेचा अस्ताव्यस्त खर्च कमी करण्यांत आला, निजामच्या राज्यांत अंतस्थ शांतता प्रेरित केली आणि प्रस्तुतच्या अमानी मुलूखाच्या सर्वोत्कृष्ट भरभराटीचा पाया घातला" हें वर्णन वाचण्याला मोठें रमणीय वाटतें. परंतु वस्तुतः खरा प्रकार किती भिन्न आहे या विषयीं गेल्या 'इंडियां'त एक चांगला लेख आला होता. हा तहच मूळ जबरदस्तीनें व दांडगाईनें करून घेतला ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. वऱ्हाड प्रांताची भरभराट आपल्या डोळ्यापुढें प्रत्यक्ष आहे तेव्हां तिचें चित्र लेखणीनें दाखविण्याचें कारण आह्मास दिसत नाहीं. थोरले सर सालरजंग विद्यमान होते तेव्हां त्यांनीं हा प्रांत परत करण्या विषयीं सरकारापाशीं मागणी केली होती परंतु त्या मागणीची किती उडवाउडवी सरकारानें केली हें ध्यानांत धरलें ह्मणजे सरकारची राजनीति पण्यांगने प्रमाणें नानाविध व विचित्र रूपाची असते असें स्पष्ट दिसेल. सर्वच कारस्थानें मुत्सद्दी धोरणावर चालतात तेव्हां याच गोष्टीला नांवें ठेवण्याचें कारण नाहीं.

पंजाब सरकारचे मुलकी कमिशनर मि० थारबर्न यांनीं सरहद्दीवरील मोहिमे संबंधानें सिमल्यास सरकारची हत्ती एवढी ढोबळ चूक दर्शविली तेव्हां पासून सरकारची तारंबळ उडालेली दिसते. मि० थारबर्न सारख्या प्रामाणिक व निस्पृह वक्त्याला शिक्षा देण्याचा देखील सरकारचा विचार असल्या विषयीं बातमी प्रसिद्ध झाली होती. इतक्यांत मि० डेव्हिड यूल यांनीं कलकत्त्यास सरकारचा नाण्या संबंधीची खटपट चुकीची आहे असें मुदेसूत शाबीत केलें. मि० यूल कलकत्ता बँकेचे चेअरमन आहेत व ते स्वतंत्र आहेत. त्यांचें संभाषण सरकारास विषाप्रमाणें कटु आहे. लार्ड रिपन साहेबांच्या मागें खरा मुत्सदीच कोणी आला नाहीं. १८९३ च्या २६ जूनला टांकसाळी बंद करण्याचा कायदा केला ही मोठी चूक झाली असें सांगतांना मि० यूल यानीं राष्ट्रीय सभेचेच विचार संस्थापित केले. सरकारानें आपल्या सिव्हील सरव्हंटाचीं गाऱ्हाणीं न ऐकतां हुंडणावळीचा भाव जसाचा तसाच अबाधित बदलूं द्यावयाचा होता. परंतु रुपयाच्या नाण्याची किंमत वाढविण्याची लटकी खटपट केल्यामुळें रुप्याचा भाव अतिशय उतरला, व्याजाचे दर विलक्षण वाढले, भांडवलें मिळेनाशीं झालीं आणि चालूं गोष्टींच्या प्रवाहाला प्रतिरोध होऊन लोकांचें सर्वथैव नुकसान झालें. देशांतील औद्योगिक व संपत्तिवर्धक गोष्टींचा ऱ्हास होत चालला. मि. यूल हे उत्कृष्ट उपाय दर्शवितात कीं सरकानें कर्ज फिटेनासें दिसल्या बरोबर इंडियन रेल्वे विकून टाकल्या पाहिजे होत्या, आणि सर्व सरकारी नोकराचे पगार रुपयानें देण्याचा परिपाठ सुरूं करावयाचा होता. पण ही गोष्ट सरकारास कबूल झाली नाहीं. मि. दादाभाई व मि. म्याकलीन हे तरी पूर्वीं पासून हीच गोष्ट सांगत होते. हल्लीं करन्सी कामिशन बसलें आहे परंतु यांचा अभिप्राय इंडियाला कल्याणप्रद असा बाहेर पडेल असें वाटत नाहीं. मि० यूल वा मि० थारबर्न यांनीं निस्पृहपणानें खरी बाजू जगापुढें मांडली या बद्दल सर्व देश त्यांची ऋणी आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, AUGUST 15 1898.

The Excise department of the government has a two-fold function to do. It creates a rich source of revenue and acts the role of a moral preacher. The main policy is to tax people in order to make them less vicious in point of a drink or a drug. The incidence of taxation falls on the intoxicants in some orm or another. The guiding principle is o make these articles as dear as possible so that the people may not find them within an easy reach. The aim is to make them feel the pressure when they will have to pay dearly for their vicious cuxuries. Such an excise will naturally minimize the vices of intoxcation and will, in the sequel, yield an ample revenue to the government. There is an implied assumption however upon which the Excise department should work. Look at any society and we will find that the vice of drinking or some such vice will always exist to a certain extent. Total abstinence from narcotics is an ideal and useful only as an ideal. We shall have to provide a salutary and effective procedure to check this vice within its ue limits; and if we further press ourd stringent Excise rules the result is that a new evil is added to the original vice. The excise policy should be pursued until we get at the minimum of this vice. Further extension of the policy is however the rule of the day. The government pushes forth this incidence of taxation to realize the highest revenue that the vices of the people can yield. The maximum of revenue with the minimum of the vice is in short the motto of the Excise department. The government ill consults the public good when it raises the standard of the maximum revenue to an enormous degree. The Excise revenue knows no limits and falls heavily upon the poor people. Man is more or less a machine of habits and, beyond a certain degree, he cannot control himself. When we say this we take the example of a man in the ordinary run of life. He will spend his last Rupee in order to get a drink. Such is the irresistible force of the vice of intoxication. When we come to deal with this aspect of man's nature we think that the policy of the government runs amiss in so far as it does not stop levying an additional tax on the intoxicating articles. We confess that in our province as elsewhere in India the maximum revenue has become a misnomer because the revenue has become double or treble the amount which should be fixed as the maximum amount in view of the minimum of vice that can be reached in the modern state of our society. The present revenue is excessive and many families are crushed into a state of misery, degradation and starvation. The Excise policy has thus become the cause of ruin and we would request the government to see whether it is not moral to reduce this taxation in order to bring peace, happiness and prosperity to the numerous families that fall a prey to the vice of drinking.

With the total population of 28,97,040, this province had the Abkari demand of Rs. 11,23,350 for the year 1897—98. This gives 5 As. 10 pies as the incidence of the excise taxation per head of population. This compares very favourably with the figures of the Bombay—presidency and we do not know whether we should congratulate our local government on the success it has achieved in this branch of administration. With us, it is really a matter of regret. In the report of 1896—97. Mr. Bullock has showed that this tax comes up to 1 As. 7 pies per head in the North West Provinces. We do not know why it is so excessive and absorbing in Berar unless it be presumed that the vice is most prevalent here and the people are rich. But the stern facts do not warrant such a presumption. We think that there is a great field for improvement in this direction.

The annual report on the administraion of Excise for the year 1897—98 shows a gradual decrease in the total revenue realized by the government. In 1895—96, the excise revenue amounted to Rs. 1476352, in the year that followed, viz, the year of the last famine, there was a large diminution in revenue to the extent of Rs. 1,58,711, and in the year under report there was a still further fall of Rs. 1,29,243 in the gross receipts. The year has been very unfavourable to the Excise—revenue but we donot agree with the Resident when he traces a causal connection between the decrease and "the distress and high prices which prevailed during the year of report." There was neither the distress nor the the high prices in the year under report. The resolution was perhas drafted in haste when Sir Plowden was about to proceed on leave. The famine was no doubt a great agent to diminish the revenue from excise in 1896—97; but we fail to see how the same effects can not be counteracted by the good harvest and low prices of 1897—98. The fall in the lattre year was Rs. 1,29,243 because the revenue decreased from Rs. 13,17641 to the sum of Rs. 11,88398, To our plain mind the causes must be founnd out in some other quarters. We admit that the people have not yet recovered from the worst effects of scarcity and famine and can hardly be ready to pay willingly for the luxuries of their vicious cravings. This will explain that the prostration of the people is most complete and alarming; and it will require a long time and a solid help from the government. The latter should adopt a humane and generous policy of relieving more or less the people from this excise taxation. The demands of the administrative expenses do not exceed the revenue from other sources of income and it is now time to lessen the rigour of realizing revenue in this direction.

---

Birth and Social position are great charms with the Indians. They play a great part in the same manner all over the world They guarantee certain virutes which are highly valuable. The Pioneer has some nice remarks in this connection though we do not endorse his application of the principle to the present circumstances. The Pioneer remarks:—

"That the influence acquired by right of birth and social position counts for very much in the East, is a truism which it is necessary to reiterate and emphasise in these days when, in presence of the more assertive indications of equalising forces and tendencies, its extent may easily be underrated. At the same time it is a serious political e vil, not to say danger that those who are reckoned as the natural leaders of the people are no longer always among the officially recognised leaders, and that the exceptions must tend to become more numerous until the aristocracy of rank and birth receive that liberal training in the science and literature of the West which constitutes the chie passport to dignity, position and even usefulness under the British Govern . ment. There cannot, therefore, be two opinions about the desirability of special steps being taken by Government to promote education among the nobly born of their subjects. The complaint is very general among natives of influence and position, in Upper India at any rate, that under our rule power and position have been, to a large extent, transferred to men of low birth and still lower social status, and in certain districts this has caused a good deal of dis—content and heart-burning. Men whose ancestors stood by the Government in times of trouble, and helped not a little to consolidate British rule in the Punjab after the annexation, think themselves treated shabbily whenthey find men whose fathers and grand—fathers would not have been allowed to sit besides theirs, placed in positions of power and authority over them—selves. British official, in spite of a desire to help men of this class, find it very difficult to do them any tangible good. In this life the race is to the swift and the battle to the strong, whilst a good liberal education is one of the most powerful weapons of warfare in the struggle for existence, and individuals or classes that lack it have to go to the wall. Heaven helps those who help themselves, is a maxim the value of which, in the best interests of the better classes of our native fellow-subjects, cannot be suf—ficiently emphasised. At the same time a good deal of encouragement on the part of Government will have to be given, even when these classes have taken kindly to education, in order to enable them to make up for their start in the race for power and affluence."

---

The Champion of Bombay has vigorously drawn a parallel sketch of the lives of Gladstone and Bismark. The difference is most striking and we request our reader to observe in the following para how one might have ill suited the statesmanship required in the country of the other. Both were the central suns of their countries and shone brightly in their own spheres. The learned editor of the Champion observes:—

"Between Bismarck and Gladstone there was a difference as wide asunder as the poles. It is only a truism to say that Bismarck would have been as much of a complete failure as statesman in England as Gladstone would have been in Germany. The genius of the two was wide apart. In Bismarck there was none of the high culture, the lofty moral aim and ideal, the virtues which adorn humanity, which made William Ewart Gladstone so beloved, so respected, so idolised by the civilised world at large. They stood on different planes, moving in altogether different orbits. Had they both wandered away from their respective circles, and tried to meet each other, it is to be feared, there might have been a serious collision. The righteousness of Gladstone would have repulsed Bismarck with his unscrupulous statemanship. At no time these contemporary statesmen could have agreed. And if they had agreed, they would have done so only to differ. History will have to judge the two by different scales entirely. But by whatever scales she might weigh them, the palm of superiority will always rest with Gladstone. Bismarck's vision was limited by his own country. Gladstone's embraced the wide world, which he animated by his own enthusiasm. In him was that marvellous human pathos which attracted the world towards himself. In Bismarck it was wholly wanting. While the German tried to reduce a people to slavery the Englisman nobly strove most unselfishly to free enslaved nationalities from oppressive thraldom."

---

## वऱ्हाड

मे० हेअर साहेब हे परवा शनिवार पर्यंत अकोल्यास होते. कचेऱ्या, शाळा वगैरे साहेब बहादुरांनीं पाहिल्या. हे गृहस्थ स्वभावानें फार गोड असून त्यांच्या इतका लोकप्रिय आफिसर या प्रांतीं दुसरा नाहीं. यांची स्वारी बुलढाण्यास गेली आहे.

गेल्या मंगळवारीं येथें एक क्रिकेट खेळाचा सामना झाला. उमरावती जिल्ह्याच्या व आकोला जिल्ह्याच्या साहेब लोकांमध्यें हा खेळ झाला. त्यांतच उभय पक्षीं कांहीं नेटीवही होते. दोन्ही पक्ष चांगले बरोबरीनें खेळले आणि उमरावतीच्या बाजूची अखेरीला सरशी झाली.

तानी नांवाच्या एका ब्राह्मणी विधवेवर बालहत्या केल्याच्या आरोपावरून मे. सी. शामराव माजिस्ट्रेट यांच्या समोर खटला चालू आहे. ही बाई चांगल्या घरांतली असून लहानपणींच विधवा झाली. पापकर्मीं पाय घसरल्यावर पुढें लोकलज्जेला भिऊन तिनें ही हत्या केली असा आरोप आहे. ही गोष्ट ऐकून सर्व लोक दुःखी व श्रमी होतील !

वर्तमानसार

...च्या कारखान्यांतलि मजूरमाणसें – विजेचीं निरनिराळीं यंत्रें चालविणें, तीं तयार करणें व त्यास लागणारें साहित्य तयार करणें ह्या सर्व उद्योगांत एकंदर १०,००,००० मनुष्याचा निर्वाह होतो.

विजेनें बोगदा करणें!–आल्प्स पर्वतांतून एक १२।१३ मैल लांबीचा बोगदा विजेनें खोदण्याचें काम.ब्रचांड येथील एका स्विस्स पेढीवाल्या कंपनीनें आपल्याकडें घेतलें आहे. हें काम तीस वर्षांपूर्वी सेनिस पर्वतांतून काढलेल्या ८ मैल लांबीचा बोगदा खणण्यास जी वेळ लागली त्या वेळेच्या चतुर्थांश वेळेंत आणि जो खर्च लागला त्या खर्चाच्या पाऊणपट खर्चांत करून देण्याचें ठरलें आहे. आणि असें न होईल तर दररोज २०० पौंड प्रमाणें सदर कंपनी दंड देण्यास तयार आहे.

साहसी वैमानिक—क्यापटन लारेन्स नांवाच्या एका साहसी वैमानिकानें ता० ३० जून रोजीं मसुरी येथें 'सुखदरा' नांवाच्या जागीं आपल्या विमानारोहणावरोहणानें सर्व लोकांना थक्क करून टाकणारा चमत्कार दाखविला. सदर वैमानिक आपल्या विमानांत बसून १५००० फूट उंच आकाशांत गेला. मसुरी हें ठिकाण समुद्राच्या सपाटीपेक्षां ७०० फूट उंच आहे. तेव्हां हा वैमानिक आपल्या विमानांत आरोहण करून समुद्राचे सपाटीपेक्षां २२००० फूट उंच आकाशांत गेला होता असें सिद्ध होतें. इतका उंच गेल्यानंतर तो आपल्या छत्रीचे आधारें खालीं उतरला तो ज्या ठिकाणाहून विमानांत बसून निघाला होता तेथून सुमारें पाव मैलावरच खालीं उतरला. त्याचे मागून त्याचें विमान खालीं उतरलें तें एका कांटेरी तारांच्या कुंपणावर आपटून फाटून गेलें. विमानारोहणावरोहणचमत्कार पाहण्यास फार मोठा समाज जमला होता.

एक नवीन भट्टी— न्यूयॉर्क येथें बर्टन्स लिक्विडफोर्ज नांवाची एक नवीन भट्टी निघाली आहे. तींत पाण्यानें भरलेल्या एका तांब्याच्या टाकीस एका वीज उत्पन्न करणाऱ्या यंत्राची घन विद्युत्तार जोडली असते, व तींतून एक मोठा विद्युत्प्रवाह वाहात असतो; एका सांडशीस ऋणविद्युत्तार जोडलेली असते व तिच्या मुठीस ज्यांतून विद्युतप्रवाह बाहेर जाणार नाहीं अशा पदार्थांचें वेष्टण असतें. ह्या सांडशीच्या तोंडांत एक लोखंडाचा तुकडा धरून तो टांकीतल्या पाण्यांत बुडविला ह्मणजे विद्युतप्रवाहाच्या योगानें त्या लोखंडाच्या तुकड्याभोवती हैड्रोजन वायूचें एक वेष्टण बनतें आणि मग थोड्या वेळांत विद्युत्प्रवाहाच्या जोरानें तें लोखंड लाल होतें. मग त्यास पाहिजे तसें घडून घ्यावें व वाटेल तर पुनः तापावें. ज्ञा०

बडोदे येथील श्रावणमासाच्या परीक्षेस मराठे मंडळी परीक्षक नेमिल्यामुळें, त्या दक्षिणे करितां अलीकडे कोणी जात नाहींत, असें झालें आहे.

येत्या आक्टोबर महिन्याच्या १ ले तारखेपासून, आजपर्यंत पोष्टखातें १ पैशांत ३ तोळे वजनापर्यंतचीं वर्तमानपत्रें पोंचवीत असे. तीं तें आतां ४ तोळे वजनापर्यंत पोंचविणार, व अर्धा आण्यांत १० तोळेपर्यंत नेत होतें, ते २० तोळेपर्यंत नेणार. वर्तमानपत्रकर्त्यांस, हांशीलाखेरीज मोबदला पत्रें पोंचवीत असे, तीं तशी तें आतां पोचविणार नाहीं.एजंटकडे निमे हशीलांत पत्रें नेऊन पोंचवी, त्यास आतां भर आकार घेणार. सर्व वर्तमानपत्रें नव्यानें रजिष्टर झालीं पाहिजेत.

फ्रान्स देशांत उदरांचीं प्रदर्शनें चालू आहेत. चमत्कारिक उदारांचीं किंमत शंभरदोनशें पर्यंत वाढली आहे ह्मणतात.

आगगाडीचे डब्यांत पुढें येणारें स्टेशन कोणतें तें उतारूंस आपोआप कळण्याचें एक यंत्र प्रो० भिसे ह्यांनीं तयार केलें असून त्याचे पेंटट हिंदुस्थान सरकाराकडून मिळविलें आहे. परंतु हें यंत्र नेटिवानें काढलेलें असल्यामुळें त्याचा स्वीकार इकडच्या रेलवे कंपन्या करीत नाहींत. तें तसेंच राहिलें आहे. ह्मणून अमेरिकेंतील गुणग्राही ह्याचा स्वीकार करून ह्याला आश्रय देतील; हा प्रो० भिसे यांचा अमेरिकेस जाण्यांतील एक हेतु आहे असें समजतें.

प्लेगचे खटले.—दापोली तालुक्यांतील कारंटाइन क्यांपांत पाऊस फार पडल्यामुळें बरेच लोक गांवोगांवीं निघून गेले होते, ते हजिरीस न आल्यावरून त्यांजवर खटले करून ५० हून ज्यास्त लोकांस २।२ महिने सक्तमजुरी कैदेच्या शिक्षा दापोलीचे मामलेदार यांनीं दिल्याचें समजतें.

आफ्रिकेमध्यें एक नवीन प्रकारचा रोग उत्पन्न झाला आहे, या रोगाचें लक्षण असें आहे कीं ज्याला या रोगानें पछाडलें आहे त्याला पहिल्यानें झोंप येते. झोंप येऊन तो माणूस निजला व त्याला लवकर कोणी जागें केलें नाहीं तर तो जागच्या जागींच गार होतो. क०

ऐर्लंडांत लोकल सेल्फ गव्हर्मेन्ट सुरू करण्या बद्दलचा कायदा विलायतच्या लार्ड सभेंतही पास झाला. हा प्रकार ग्लाडस्टन साहेबांच्या हयातींत झाला असता तर त्यांस विशेष आनंद झाला असता. हिंदुस्थानास लोकल सेल्फ गव्हर्मेन्ट देण्याबद्दलचा कायदा पार्लमेन्ट पुढें कधीं येईल याचें कोणी भविष्य वर्तवील तर बरें होईल.

पर्शियाच्या शहानें आपलें कस्टमचें उत्पन्न गहाण लाऊन इंग्रजव्यापाऱ्यांपासून नुकतीच बरीच मोठी रकम कर्ज घेतली. शहानें ही रकम इंग्रजांपासून न घेतां आपल्यापासून घ्यावी अशी रशियाची खटपट होती. असल्या कर्जाऊ रकमाच पुढें राजकारस्थानें करण्यास उपयोगीं पडत असतात.

विलायतच्या लार्ड सभेंत विचारलेल्या प्रश्नास जबाब देतांना लार्ड सालिसबरी ह्मणाले कीं, इंग्रजांच्या उद्योगास चीनसरकार मदत करण्यास तयार आहे. पण चीनानें तसें करूं नये ह्मणून इतर राष्ट्रें चीनास धमक्या देत आहेत. हा सर्व प्रकार असा असल्यामुळें चीनांत रेलवे व इतर लोकोपयोगी कामें करण्यास इंग्रजास परवानगी दिल्यामुळें जर कोणतेंही परराष्ट्र चीनास त्रास देवूं लागेल तर त्या कामांत इंग्लंड चीनास मदत करील, असें प्रसिद्ध करण्याचा चीनच्या दरबारच्या इंग्रज वकिलास अधिकार दिला आहे.

चीनांत इंग्लंडानें जो फायदा मिळविला आहे तो इतर राष्ट्रांनीं मिळविलेल्या फायद्या पेक्षां फार जास्त आहे असें कर्झन साहेब सांगतात.

चीनांत रेलवे करण्याच्या हक्काच्या बाबतींत रशिया व इंग्लंड यांच्या संबंधानें जो विवाद सुरू झाला आहे त्याच्या निकालावर चीनची पुढील स्थिती अवलंबून, आहे असें ह्मणतात.

लष्करी मदत—नाशिक जिल्ह्यांत दरोडखोरांचा आज बरेच दिवस पासून सुळसुळाट झालेला असून हल्लीं त्यांची मजल सरकारचे पोलिसाचे खून होण्यापर्यंत आली या दरोडखोरांचे बंदोबस्ता करितां नगराहून एक ५० ग्यारिसनचे लोकांची तुकडी बोलाविली असल्याचें ऐकतों. अ०


## ADVERTISEMENT

TENDERS are invited for the contracts for the manufacture and supply of COUNTRY SPIRIT in the Ellichpur, Amraoti and Akola districts, and in the Malkapur taluk of the Buldana district from the 1st. April 1899.

Particulars may be ascertained on application to the Inspector General of Excise, Hyderabad Assigned Districts. Amraoti Camp.

## जाहिरात

भोलेखा वल्लद तुरापखा पठाण रहाणार मूर्तिजापूर हे ह्या जाहिरातीनें सर्वत्र लोकांस असें जाहीर करितात कीं माझा मुलगा नामे करीमखा वल्लद भोलेखा यांस कोणी कर्ज उसनवार वगैरे रोख रुपये देऊं नये. व याच प्रमाणें कोणत्याही प्रकारचा माल अगर सामान देऊं नये. जर कोणी देईल तर त्याजबद्दलचा जबाबदार मी कोणच्याही प्रकारानें नाहीं हें सर्वत्रास अगोदर ह्या जाहिरातीनें जाहीर केलें आहे. माझ्या परवानगी शिवाय जर कोणी रुपये, माल अगर कर्ज वगैरे दिल्यास ज्याचा तो जबाबदार आहे. मी नाहीं हें सर्वांस जाहीर व्हावें. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख ११ माहे आगष्ट सन १८९८ इ०

(सही)

सहीची निशाणी कट्यार भोलेखा वल्लद तुरापखा याचे हातची असे.

## जाहिरात.

दिवाणी किरकोळ मुकद्दमा नंबर २ वर्ग १ सन १८९८

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सर्टिफिकीट देण्या बद्दल सन १८८९ चा आक्ट नंबर ७ यातील कलम ७ प्रमाणें नोटीस.

विद्यमान मुनशी अजिजुद्दीन साहेब बहादूर दिस्ट्रक्ट जज्ज जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार सिताबाई मर्द नारायण जात फुलमाळी रहाणार पिपळखुट ता० मोर्शी जि० उमरावती सर्व लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार इनें मयत सखाराम वल्लद रामजी फुलमाळी रहाणार मौजे रांजणे ता० इलिचपूर याचें कर्ज वसूल करण्या करितां सर्टिफिकीट मिळावें ह्मणून तारीख ३।८।९८ इ० रोजीं अर्ज केला आहे व ह्या अर्जाची चौकशी तारीख १०।९।९८ इ० रोजीं दिवसा १० वाजतां मुकर केली आहे तर सदर्हू तारखेस तुह्मी आपले दस्तैवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत इलिचपूर येथें अर्जदार याजला कां सर्टिफिकीट देऊं नये? याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस देण्यांत आली आहे.

अर्ज तारीख १० माहे आगष्ट सन १८९८ इ०

Azizuddin

शिक्का दि० ज्यड्ज्य.

## जाहिरात.

वऱ्हाड प्रांतांतील यवतमाळ येथील युरोपिअन राहिवाशी मयत हेनरी अलेक्झांडर हीथ यांच्या इस्टेटी संबंधानें:—

या जाहिरातीनें कळविण्यांत येते कीं गेल्या १८९७ च्या आगष्टच्या २१ वे तारखेला किंवा त्या सुमाराला वर सांगितलेले यवतमाळ येथें सदर्हू हेनरी अलेक्झांडर हीथ साहेब मरण पावले आणि त्यांच्या इस्टेटी विषयींचा मृत्युलेख व त्या बरोबरची मृत्युपत्राची पुरवणी बरहुकूम ( लेटर्स आफ आडमिनिस्ट्रेशन ) इस्टेटीची व्यवस्था करण्याचें अधिकारपत्र सन १८९८ च्या जूलैच्या २७ वे तारखेला थामस वुइथे कफी इसक्वायर यांस दिलें असून तें मुंबई इलाख्यांत सर्वत्र चालेल; तर सदर्हू हीथ साहेबांच्या इस्टेटी संबंधानें ज्या कोणाचा हक्कसंबंध असेल त्या सर्वांनीं वरील आडमिनीस्ट्रेटर ( व्यवस्थापक ) यांजकडेस त्यांच्या मुंबईच्या फोर्ट मधील "स्टांडर्ड बिल्डिंगस" मधील आफिसांत या नोटिशीच्या तारखेपासून एका सौरमासाच्या आंत आपापले हक्कसंबंध जाहिर करावे. ही मुदत संपल्या नंतर सदर्हू आडमिनिस्ट्रेटर त्यावेळेपर्यंत त्यांच्याकडे जे हक्क वारसे केले जातील त्यांचा योग्य विचार करून नंतर सर्व जिन्नगी ते तिच्या हक्कदारास देऊन टाकतील.

वरील मयत गृहस्थाचें ज्या कोणास कांहीं कर्ज द्यावयचें असेल किंवा त्याची कांहीं जिन्नगी ज्या कोणापाशीं असेल त्या सर्वांनीं आडमिनिस्ट्रेटर यांस कर्ज देऊन टाकावें किंवा त्यांच्या स्वाधीन जिन्नगी करून टाकावी. आज तारीख ६ आगष्ट १८९८ इसवी.

सही

क्रेग लिंच अँड ओवेन

आडमिनिस्ट्रेटरचे अटर्नी.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .......................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ......८१

Single copy ........

Advertisement

Below 10 lines ...... 2 R

Per line over 10 ......4 a

Repetition Per line...3 a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXII AKOLA MONDAY 22 AUGUST 1898 NO 33

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २२ माहे आगष्ट सन १८९८ इ० अंक ३३


नोटीस.

रा० राजश्री सेट गणेशदास कन्हयालाल आणि कंपनी अकोट.

यांस.

सेख कवडू वल्लद गुलमहमद राहणार आकोट याजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुमचे जीनचे कारखान्यांत आपली कपाशी पिळून त्याचे वझे आणी सरकी तुमचे मार्फत विकली व या व्यवहाराच्या रकमाही तुमचे येथेच जमा झाल्या व उचलल्या गेल्या. या संबंधानें आमची बाकी तुह्माकडे अंदाज्यानें एक हजारापेक्षां अधीक निघत आहे यासाठीं कळविले जाते कीं सदहू बाकी आठ दिवसांत आह्मास देऊन पावती घ्यावी तसें न केल्यास रिती प्रमाणें तजवीज केली जाऊन खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेतले जातील कळावे तारीख १८-८-९८इसवी.

सही.

शेख कवडू वल्लद गुलमहमद राहणार अकोट दस्तुर खुद्द निशाणी कब्यार.

---

## दार्जिलिंगचा प्रवास

( आमच्या एका मित्राकडून )

नंबर ७

दुसरे दिवसा पासून आह्मी दार्जिलिंगास अंतर्बाह्य प्रदक्षिणा घालण्यास प्रारंभ केला. लोंकरीचे कपडे अगदीं पावलांपर्यंत घातल्या शिवाय बाहेर पडण्याची निदान आपल्या सारख्यानां तरी मुळींच सोय नाहीं. कोट पाटलूण, बूट हे घालवित हें चांगलें. बूट, पाटलोणास आह्मी एकच दिवस पत्करलें. दररोज सकाळ संध्याकाळ ८।८ मैल चालायचें ते चालतां येईना. त्रास होऊं लागला. दिलें त्यांनां झुगारून. धोतराचा काचा व दाक्षिणी जोडा यानाच दिला मान; झालें. पण अशा रीतीनें बाहेर फार दिवस फिरवत नाहीं. कारण Hill--diarrhœa "डोंगरी हग वण" लागते असें ह्मणतात. आह्मासही मित्रमंडळींनीं ही भीति घातली: पण दैववशात आपणास कांहींच झालें नाहीं. आमचें धोतर व दक्षिणी जोडा पाहून वाटेनें लोक आह्माकडे आश्चर्यमुद्रेनें पहात नसत. त्यांनां हा अपूर्व देखावाच पहावयास मिळाला ह्मणायचा. आह्मी ज्या ठिकाणीं उतरलों होतो त्या भागास 'सिंगामारि' असें ह्मण तात. बाबू कालूसिंग या नांवाचे नेपाली जातीचे गृहस्थ आहेत, त्यांच्या बंगल्यांत आमचें बिऱ्हाड होतें.

### दार्जिलिंग

हें नांव कसें पडलें याबद्दल दोन तऱ्हेची उपपत्ती आहे "दुर्जय" लिंग ह्मणून शिवाचें स्वयंभू स्थान आहे यावरून हें नांव पडलें असें कोणी ह्मणतात. कोणी ह्मणतात कीं "दार्जि" लामा ह्मणून बौद्धधर्मीयांचा एक लामा [ धर्मगुरु ] होता. त्याचा मठ या ठिकाणीं असे. युरोपियन लोक प्रथम जेव्हां या भागांत आले तेव्हां त्यास भिऊन ह्मणा किंवा आपणास ते धर्मभ्रष्ट करतील असें मनांत येऊन ह्मणा तो येथून पळाला. त्याच्या नांवावरून 'दार्जिलिंग' असें नांव मिळालें. खरी उपपत्ति कोणती हें नीट समजत नाहीं. 'दार्जिलिंग' यांतील 'लिंग' या संज्ञेवरून हें शिवाचें एक स्थान असें उघड होतें. तेव्हां 'दुर्जयलिंग' हेंच कदाचित् मूळचें नांव असावें असा तर्क वाहतो. आतां 'दुर्जय' असें नांव कां पडलें असावें याबद्दल कदाचित् अशी मीमांसा करणें सयुक्तिक होईल. पांडव वनवासा निमित्त काम्यकवनीं असतानां अर्जुन हा हिमालय पर्वतावर जाऊन उग्र तपश्चर्या करूं लागला. तेव्हां शिवानें किरात वेष घेऊन त्याच्याशीं युद्ध केलें. त्यांत कोणाचाच पराभव झाला नाहीं. व शंकरानें अर्जुनाची युद्धकलेंत परमनिपुणता पाहून त्यास स्वसंतोषानें आपलें दुर्जय असें 'पाशुपतास्त्र' दिलें. ही कथा पुराणप्रियास अवगत असेलच. तेव्हां ह्या गोष्टीचें स्मारक ह्मणून हें स्थल आहे असें वाटूं लागतें. शंकराचें स्थान मध्य वस्तींतच आहे. तेथून एक गुहा नेपालांत, तिबेटांत गेली आहे अशी दंतकथा येथील लोक सांगतात.

दार्जिलिंग हें गांव सरासरी पूर्वपश्चिम असें वसलेलें दिसतें. डोंगरावर सपाट जागा न मिळाल्यामुळें चढ उतारानें सर्व घरें आहेत. सर्व घरांवर पत्रे आहेत. कौलें मुळींच नाहींत. कारण त्यांचा निभाव येथें लागत नाहीं नेहेमी पाऊस असल्या कारणानें भुई तक्तपोशी केलेली असते. घराचा बाहेरील भाग बहुतेक लांकडी व तावदानी असावयाचाच. आंतल्या खणास मात्र भिंती असतात. त्यामुळें ओली पासून बराच बचाव होतो. थंडी अतिशय ह्मणून प्रत्येक घरांत एक शेगटीचें धुरांडें बहुत करून प्रत्येक खोलींत असतेंच. आपल्या इकडच्या भर उन्हाळ्यांत आह्मी तेथें होतों. तरी सायंकाळीं शेगड्यांतून कोळसे पेटवावे लागतात. त्या वांचून खोल्यांतून ऊब येत नाहीं. स्वयंपाकास लांकडापेक्षां कोळशांचाच उपयोग फार. कारण लांकडे असायची ओलीं. एक मेणबत्ती संध्या काळीं लावून ठेविली तर ती बहुतेक पहाट पर्यंत जळते. थंडीमुळें ती इतकी सावकाश जळते. ज्योति पाशी वितळलेल्या मेणाची एक लहानशी वाटी तयार होते. त्या वाटींत मेण उष्णतेनें वितळून पडतें. आपल्या इकडल्या प्रमाणें मेणाचे ओघळ मेणबत्तीवर येत नाहींत किंवा जमीनीवर पडून त्याचे गोळे बनत. हा एक येथें फायदाच आहे ह्मणायचा. आह्मी होतो त्या दिवसांत पारा सकाळीं ५२ तों ५५ अंशा पर्यंत असे व दुपारी ६०—६५ अंशा पर्यंत चढे. या वरून थंडीच्या दिवसांत काय स्थिति असेल त्याचा अंदाज वाचकांनींच करणें बरें ) घरांवर पत्रे ते पांढरे, भिंती—लांकडी, दगडी विटाच्या ह्मणा—त्याही पांढऱ्या व जिकडे तिकडे हिरवी गार झाडी. त्यांतून तीं घरें डोकावून, ओणवून, लपून एकमेकांस ह्मणा किंवा खऱ्या 'हिमालयास' ( बर्फाच्या घरांस ) पहात आहेत कीं काय असें वाटे. डोंगराच्या जरा खालून पाहिलें तर सर्व शहर जाईच्या मंडपांतर्गत दिसतें. पांढरीं घरें तर दुरून हुबेहुब जाईचीं फुलेंच दिसतात. किंवा वृषभध्वजाचे हे शुभ्रभस्मांकित मठच आहेत कीं काय असा भास होतो. गांवात पाणी झऱ्यांचे नळांतून नेलेलें आहे. ठिकठिकाणीं मोठमोठाले लोखंडी हौद बांधून त्यांत झऱ्यांचें पाणी आणून सोडलेलें आहे. तरी एकंदरींत आह्मांस पाण्याचा पुरवठा हिमालयाच्या मानानें फारच कमी वाटला. आमचें बिऱ्हाड म्युनिसिपालिटीचे हद्दींत नसल्या कारणानें ह्मणा किंवा घरवाल्यास ऐपत नसल्यामुळें ह्मणा आमच्या राहत्या बंगल्यांत पाण्याचा नळ नव्हता. झऱ्याचें पाणी आणावें लागत असे. झरा ही अडचणीच्या जागीं खोलांत असावयाचा. तेव्हां तद्देशीय लोकांकडूनच गुजराथ्यांचें काम करून घ्यावें लागत असें. स्वयंपाका पुरतें पाणी काय तें आमचे बरोबरचे ब्राह्मण आणीत. बाकी वापरण्यास पाणी ह्या गुजराथ्यांनीं आणलेलें. वापरण्या करितां जें पाणी लागे त्याचा सांठा दुसऱ्या तऱ्हेनें करतां येत असे. बंगल्या सभोंताल चार कोपऱ्यावर एक एक मोठालें लांकडी पीप ठेवलें ह्मणजे झालें. एक दोन दिवसांनीं पाऊस पडेच त्यानें तीं पीपें भरून जात. पाणी अतिशय मधुर. पण त्या मानानें अन्नाला चव मुळींच नाहीं, पानचट अन्न लागतें. येथें धान्य कांहींच पिकत नाहीं. बहुतेक धान्य देशावराहून ( बंगाल्यांतून ) येते. पायथ्याशी तळ देशांत भात पिकतें. तेवढेंच. कोबी, नोल कोल, वाल घेवडा वगैरे भाज्या येथें होतात. व त्या पोसतात ही छान. गुलाबाचीं फुलें पाहावीं तों माणसाच्या पंजा येवढालीं दिसलीं. आठ आठ पंधरा पंधरा दिवस देखील फुलें झाडावरचीं गळून पडत नाहींत. उन्हाचा मारा नसल्या कारणानें फुलांचे रंगही तसेचे तसेच राहतात. विटत नाहींत. फुलें- वन्य उपवन्य—किती तऱ्हांचीं आहेत. व त्यांचे रंग तरी किती प्रकारचे! कांहीं फुलें तर थेट फुल पांखरेंच. फुलपांखरूं ह्मणून एक वेळ आह्मी फुलच धरलें इतकें माणूस या ठिकाणीं फसतें. रंगकलेची एक विशाल नैसर्गिक शालाच विश्वकर्म्यानें उत्पन्न केली आहे असा भ्रम होतो.

---

## अहल्या चरित काव्य.

( आमच्या एका मित्रांकडून ) नंबर २

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. माझ्या मागील पत्रांत मी कबूल केल्या प्रमाणें 'काव्याची भाषासरणि' ह्या संबंधानें कै. कुंटे यांनीं जे आपले विचार लिहिले आहेत, ते मी येथें खालीं देतों. कुंटे यांनीं आपले विचार इंग्रजींत लिहिले आहेत; ते त्यांच्या वजनदार शब्दांतच देतां आले असते, तर वाचकांच्या मनांवर त्यांचा जोरदार परिणाम झाला असता. पण तो उतारा फारच मोठा होईल, आणि एवढ्या उताऱ्यास आणि त्याच्या भाषांतरास आपल्याच्यानें स्थळ देववेल कीं नाहीं याची शंका वाटते, ह्मणून भाषांतरच देतों. कुंटे यांचे विचार देऊन झाल्यावर प्रस्तुत काव्याचे संबधानें त्या विचारांचें थोडें विवरण करीन.

"भाषासरणीच्या दोन प्रकारांचें अस्तित्व सर्वांस मान्य आहे. एक स्वाभाविक सरणि व दुसरी कृत्रिम सरणि. या भेदाचा पाया सृष्टिस्वरूपांत सांपडतो. जेव्हां कला सृष्टीचें अनुकरण करिते तेव्हां ती खरी कला होय परंतु जेव्हां आपण कलेच्या योगानें सृष्टिस्वरूप तीव्रतर करितों किंवा त्याच्यावर ताण करतो, तेव्हां त्या कलेला कला असें ह्मणूं नये. अशा तऱ्हेच्या वर्णनात्मक जी भाषासरणि तिला मी कृत्रिम असें ह्मणतों. ही सरणि, जिला इंग्रजींत Classical style ह्मणतात त्या तऱ्हेची होय. जी सरणि सृष्टीला अगदीं धरून राहते, ती स्वाभाविक होय. तिला इंग्रजींत Romantic असें ह्मणतात. हा भेद संस्कृत ग्रंथांत व मराठी ग्रंथांत स्पष्ट दिसतो. प्राचीन वीरपराक्रमवर्णनात्मक जे रामायण आणि महाभारत ग्रंथ ते व कालिदासाचीं काव्य हीं पहिल्या वर्गांत मोडतात. तसेंच तुकारामाचे अभंग आणि रामदासाचे ग्रंथ हेही त्यांतच मोडतात. परंतु संस्कृतांतली बहुतेक पंचकाव्यें आणि चंपू आणि मराठींतील मोरोपंताच्या आर्या ह्या दुसऱ्या वर्गांत मोडतात. हा जो दोन प्रकारचा भेद याचे मी फार मोठें महत्व समजतों. कारण पद्यात्मक काव्यांसंबंधानें महाराष्ट्रांत कृत्रिम भाषासरणिच प्रचलित आहे. ती इतकी कीं तिजपुढें दुसऱ्या हरेक गोष्टींचा विचार रद्द समजला जातो. आमच्या लोकांच्या अभिरुचीला शास्त्रीमंडळींनीं वळण लावून दिलें आहे. आणि जें काव्य चंपूच्या किंवा पंचकाव्याच्या धोरणावर नसतें, तें शास्त्री-

य. ... दीं नापसंत. आपल्या आधुनिक विद्वानांची अभिरुची अशी आहे कीं तिचें योग्य अनुमान करणें कठीण आहे. ते रात्रंदिवस मिल्ल, हॅम्याम, शेक्सपियर अशा ग्रंथकारांचे ग्रंथ वाचित असतात. आणि त्यांचीं मतें त्या ग्रंथकारांच्या मार्मिक विचारांनीं ओतप्रोत भरून गेलेलीं असतात. व ते ग्रंथकार पाहिले तर इंग्लंदांतील अत्यंत मोठे भाषाभिज्ञ आणि शास्त्रज्ञ होत यामुळें आधुनिक विद्वान् फारच बारकाई करणारे टीकाकार झाले आहेत. परंतु पुण्याच्या विद्वानांनीं जीं कित्येक मराठींत भाषांतरें केलीं आहेत, त्यांवरून पाहिलें असतां आपणांस असें वाटेल कीं त्या विद्वानांस कृत्रिम भाषाच पसंत आहे. आपण कितीही उलटसुलट पाहूं लागलों तरी हीच गोष्ट आपणांस कबूल करावी लागते. याकरितां जर कोणी शुद्ध मराठींत काव्य लिहूं लागला-शुद्ध मराठींत ह्मणजे खेड्यांतून किंवा शहरांतून जें मराठी बोलतात तें-ह्मणजे गद्यात्मक मराठी-साधारण लोकांचें मराठी तर आपणांवर लोक उलटतील आणि आपली छी थू करतील या गोष्टीस त्यानें तयार राहिलें पाहिजे. कारण ज्या काव्यांत निवळ मराठी शद्ब आहेत तें काव्य कानाला अगदीं गोड लागत नाहीं ही कल्पना अद्याप लोकांत आहेच. याकरितां शुद्ध मराठींत काव्य न लिहितां जितके संस्कृत शद्ब त्यांत मावतील तितके घालावे असा लोकांचा समज दिसतो. हा पूर्वपक्ष झाला. याला वस्तुस्थितीच आधार आहे. ”

वरील उताऱ्यांतील विचारांत कुंटे यांनीं स्वाभाविक आणि कृत्रिम असे कवींचे दोन वर्ग करून मोरोपंतांसही कृत्रिमांत लोटलें आहे. तसेंच शास्त्रियांनीं लावून दिलेली काव्याची अभिरुचि पंचकाव्यें आणि चंपु यांच्या तऱ्हेची असून ती मुळें काव्यांत संस्कृत शद्ब असल्यावांचून तें महाराष्ट्रीयांस गोड लागत नाहीं, असें दर्शविलें आहे. व आपला अनुभवही तसाच आहे. कारण इंग्रजी काव्यांचे भोक्ते मोरोपंता सारख्यांस कितीही नांवें ठेवोत, जुन्या महाराष्ट्रीयांस मोरोपंताची कविता ऐकिली ह्मणजे प्रेमपाझर सुटतात आणि ते डोलूं लागतात. बरें इतकेंही असून मोरोपंताची संस्कृतमिश्रित मराठी वाणी त्यांस चांगली समजतही नाहीं. पुण्यांतील ज्या विद्वानास अनुलक्षून कुंटे यांनीं लिहिलें आहे, ते विद्वान ह्मणजे कै० परशुरामपंत तात्या गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर वगैरे मंडळी असावी. या मंडळींनीं ही संस्कृत काव्यांचीं जीं मराठींत भाषांतरें केलीं आहेत, तींही संस्कृत शद्बांनीं भरलेलीं आहेत, असें कुंटे यांचें ह्मणणें. आधुनिक विद्वानांबद्दल लिहितांना कुंटे लिहितात कीं त्यांची अभिरुचि कळत नाहीं. मात्र त्यांना त्यांनीं हे टीका करण्याच्या कामांत मात्र पंडित असतात असें लिहिलें आहे. या नवीन विद्वानांची अभिरुचि तृप्त करण्यास हल्लीं मराठींत ग्रंथ नाहींत, तेव्हां या नवीन विद्वानांनीं जुन्या तऱ्हेच्या ग्रंथावर टीका करण्यापेक्षां शेक्सपियरच्या तोडीचे ग्रंथ करण्याच्या उद्योगास कां लागूं नये, असें मी विचारतों. कुंटे यांचा 'राजा शिवाजी' कोणास आवडो न आवडो, पण त्यांनीं त्यांच्या विचाराप्रमाणें एक काव्य तरी केलें, आणि जुन्या काव्यांस शिव्या न देतां वस्तुस्थिती प्रमाणें तीं झालेलीं आहेत ही गोष्ट मान्य केली आहे. मि. शेवडे यांच्या काव्याचे गुणदोष कांहींही असोत, तें जुन्या धर्तीचें आहे, असें मी समजतों. आणि त्यांनींही प्रस्तावनेंत या गोष्टीचा उल्लेख केला आहे. ज्या नवीन विद्वानांस लाडू आणि जिलबी यांच्या ऐवजीं कोंबडीचीं आंडीं आणि मटन हीं आवडूं लागलीं आहेत, आणि दुधाच्या ऐवजीं ब्रांडी आवडूं लागली आहे, त्यांनीं हीं काव्यें हातीं घ्यावीं कशाला, आणि तीं गोड लागत नाहींत ह्मणावें कशाला? दोन अभिरुचि वेगळ्या आहेत, याहून दुसरें मला कांहीं दिसत नाहीं, अहल्याचरितकाव्य चांगलें साधलें असल्याबद्दल निदान दोन विद्वानांचे अभिप्राय मला माहीत आहेत. आपल्या पत्रांतील टीकाकारांचें नांव जर आपण प्रसिद्ध कराल तर त्यांची विद्वत्ता जगास कळून त्यांच्या टीकेचें वजन किती मानावें हेंही कळेल. कुंटे यांच्या प्रस्तावनेंतील आणखी ही एक दोन विचार सांगण्यासारखे आहेत, ते मी पुढील पत्रीं देईन. कळावें.

आपला,
एक नेमस्त विचारी

---

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध ९ शके १८२०

---

वर्तमानपत्रा संबंधी नवीन फौजदारी कायदा फार कडक असून तो सुधारलेल्या राष्ट्रास लाजिरवाणा आहे असें प्रतिपादन करितांना 'मांचेस्टर गार्डियन' पत्रानें ह्मटलें आहे कीं असला कायदा इंडियांत चालू करणें ह्मणजे रशियाची झोटींगशाहि चालविण्यासारखी आहे. हा राजद्रोहाचा नवा कायदा व प्रेसवाल्या कडून जामीन घेण्याचा कायदा रद्द करण्या विषयीं मि० हरबर्ट राबर्टयांनीं सूचना केली व सर वेडरबर्न यांनीं तिला अनुमोदन दिलें. नेहमाच्या रीतिप्रमाणें ही सूचना तारीख १२ रोजीं नामंजूर झाली तेव्हां तिला अनुकूल ६० मतें असून ६६ मतें प्रतिकूळ होतीं. लार्ड हाम्लिटनयानीं वादविवादाच्या वेळीं सांगितलें कीं नव्या कायद्यांत सर्व जुनाच कायदा असून फक्त निरनिराळ्या खटल्यांतील कोर्टाचे ठराव एकत्र केले आहेत. हें विधान कितपत खोटें आहे याला पुरावा व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलाचें प्रोसिडिंगच पुरें आहे. लोकांस सरकारचा खरा हेतु कळून आला तेव्हां लोकांची चळवळही बंद झाली आहे. सरकार प्रेसाच्या टिकेला नको ह्मणत नाहीं तर राज्याच्या विनाशाला कारणीभूत अशी टीका मात्र सरकारास खपणार नाहीं. असलीं सर्वसाधारण विधानें ठोकून देण्यांत लार्ड हामिल्टन कुशल पंडित आहेत. असो, सत्याचा जय केव्हां तरी होईल अशा आशेवर बसलें पाहिजे.

---

चक्रवर्तिनी महाराणी सरकारास आपली प्रजा सर्व सारखी आहे आणि वर्ण, जात, धर्म इत्यादि भेद लक्षांत न घेतां सर्व प्रजेला समसमानतेनें वागविण्यांत येईल असा महाराणी सरकारचा जाहिरनामा सुप्रसिद्ध आहे. दक्षिण आफ्रिकेंत महाराणी सरकारचीच प्रजा इंडियन प्रजेला हाकलून देत आहे, इंडियन लोकांस शहर गांवांत देखील राहूं देत नाहीं आणि त्यांचे राजकीय हक्क सर्वच हिरावून त्यांस हद्दपार करण्याच्या खटपटींत आहे. दक्षिण आफ्रिकेंतील इंग्लिश राज्यकर्त्यांनीं कायद्याच्या सूत्रांनीं हीं गोष्ट सशास्त्र केली आहे ह्मणून अत्यंत खेद वाटतो व इंग्रजी न्यायाचें नवल वाटतें. इंडियन प्रजेचा असा छळ होत आहे असें पाहूनही आमचे इंडिया सरकार ह्या प्रकरणीं कांहींच हालचाल करीत नाहीं व इंडियाच्या वतीनें ब्रिटिश पार्लमेंटांत या संबंधानें प्रश्न काढीत नाहीं. ही ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी होय. ब्रिटिश प्रजेचा सारखेपणा कसा व केव्हां नष्टतेप्रत पावत असतो व राज्यकर्ते आपल्या स्वजातीयांच्या हितासाठीं अहर्निश व स्थळोस्थळीं इंडियनांस कसे कवडीमोल बनवितात हें ध्यानांत आणिलें ह्मणजे इंडियन लोकांस सर्वत्र निराशा वाटते व गुलामगिरी पेक्षांही नीच स्थिती आली आहे असा अनुभव येतो.

या बाबतींत सरकार इंडियनासाठीं कांहीं खटपट करणार नाहींत इतकेंच नाहीं तर त्या बद्दल ते अगदीं निराशा दाखवितात. तंजावर येथील सार्वजनिक सभेनें मद्रासचे गव्हरनर सर हॅवलाक यांजकडे या पायमल्ली संबंधानें विनंती केली तेव्हां त्यांनीं चमत्कारिक जबाब दिला. हा जबाब असा कीं या प्रकरणीं कांहीं सुधारणा होईल अशी गोष्ट करणें मद्रास सरकारच्या अधिकारा बाहेरील आहे. दक्षिण आफ्रिकेंतील स्थानिक सरकाराशा विनंतीनें अर्ज करावा एवढेंच आपल्या हातीं आहे; आणि ही गोष्ट आह्मी करून ही सोडली आहे. परंतु आफ्रिकन सरकारच्या हातीं पूर्ण राजसत्ता आहे आणि ती सत्ता कायमपणें चालविण्या विषयीं तें सरकार फार दक्ष आहे त्या अर्थीं तें आमच्या विनंतीला मान देतील अशी आशा नाहीं. ज्यांत त्यांचा फायदा असेल ती गोष्ट मात्र ते कबूल करितील. तंजावरच्या लोकांस आफ्रिकेंतला छळ सहन होत नसेल तर त्यांनीं आफ्रिकेंत जाऊं नये हें उत्तम होय.

सर हावलाक यांच्या स्पष्टोक्ती विषयीं आह्मी त्यांचे आभारी आहों. त्यांनीं खरा प्रकार जसा आहे तसा कळविला आणि कोरड्या व निष्फळ नादाला लाविलें नाहीं. भलतें आश्वासनही त्यांनीं दिलें नाहीं. हा सर्वच प्रश्न मोठा महत्वाचा आहे आणि त्या संबंधानें पार्लमेंटांत अखेरचा निर्णय झाला पाहिजे. हा निर्णय इतर पुष्कळ गोष्टी ध्वनित करील आणि महाराणी सरकारच्या जाहिरनाम्याला आह्मी आपल्या वेदग्रंथाच्या जोडीला नेऊन ठेवूं किंवा नव्या पिढीच्या तरुणांस या जाहिरनाम्याचा पतंग उडवावयाला सांगूं.

---

मुंबईचे सुप्रसिद्ध डाक्टर के. एन. बहादूरजी हे गेल्या सोमवारीं नवज्वरानें मरण पावले हें कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें. डाक्टर बहादूरजी यांच्या मरणानें एक उत्तम डाक्टर नाहींसा झाला इतकेंच नाहीं तर एक उत्कृष्ट राष्ट्रभक्त नाहींसा झाला. हे आपल्या वयाच्या ३८ वे वर्षांतच मरण पावले आणि त्यामुळेंच आमच्या देशाची मोठी हानी झाली आहे डाक्टर बहादूरजी यांनीं बी. ए. पर्यंत अभ्यास करून १८८२ त गिल्खिस्त स्कालरशिप मिळविली. त्यांनीं विलायतेस वैद्यकीचा अभ्यास करून मोठमोठ्या पदव्या मिळाल्या. लार्ड रे साहेबांनीं यांस मुंबईच्या कालेजांत प्रोफेसर नेमिलें होतें. फ्याक्टरी आक्ट झाला त्या वेळीं यांनीं या देशाची बाजू मोठ्या बाणीदारीनें दाखविली होती. देशी ग्रयाजुएट डाक्टरांस सरकारी हुद्याच्या जागा मिळाव्या ह्मणून त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले. यांची साक्ष वेल्बी कमिशनासमोर झाली तेव्हां त्यांनीं आपले उत्कृष्ट विचार सणसणीत व मुद्देसुत रीतीनें कळविले आहेत. मुंबईत देखील यांच्या तोडीचे डाक्टर फार थोडे आढळतील. ते लोकसेवा मोठ्या परमार्थबुद्धीनें करीत असत. डाक्टर बहादूरजी सारखे विद्वान, निस्पृही व परोपकारी देशभक्त काळाच्या दाढेंत सापडला हें आमचें दुर्भाग्य होय. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरकाल शांती देवो!

---

वऱ्हाडांतलि अबकारी खात्याचें उत्पन्न वर्षानुवर्ष कमी होत चाललें आहे. गेल्या पांच वर्षांची सरासरी काढली तरी सालिना १३,२८,४६० रुपये पडतात. परंतु १८९८--९९ सालिना करितां सर्व अबकारी खात्याचें उत्पन्न १०,६३,०६६ रुपये होईल असा अंदाज आहे. हें उत्पन्न कमी कमी होण्याला मुख्य कारण देशी दारू तयार करण्याच्या पद्धतींत केलेला फरक होय. मुंबई इलाख्यांतल्या प्रमाणें या प्रांतींही सरकारि भट्टीचा कारखाना काढला आहे. प्रथमतः सरकारी भट्टीची दारू दोन वर्षां पूर्वी उमरावती व इलिचपूर या दोन जिल्ह्यात चालू केली आणि तीच दारू १८९७ पासून आकोला जिल्हा व मलकापूर तालुका यांत सुरू केली आहे. जुन्या पद्धती प्रमाणें वऱ्हाट अजून ९ तालुक्यांत चालू आहे. जुनी पद्धत अशी कीं मक्तेदारांनीं आपल्या खानगी भट्टींत दारू उतरावी, वाटेल त्या भावानें विकावी व वाटेल त्या कसाची दारू विकावी. मक्तेवाल्यानें मक्ता घेतला ह्मणजे दारू काढणें व ती विकणें या दोन्ही गोष्टी मक्तेदाराच्या मर्जीवर असत. नवीन पद्धत अशी कीं सरकारानें बांधून ठेवलेली भट्टी थोड्या भाड्यानें मक्तेदारानें आपल्या ताब्यांत घ्यावी. ही भट्टी ह्मणजे एक दांडगा कारखानाच आहे. येथें मोठीं मोठी यंत्रें असून तेथें मोहाची दारू उत्तम प्रकारची गाळतां येते. हें पेय अगदीं निर्मळ प्रकारचें असतें. या पेयाचीं मूळ द्रव्यें ह्मणजे मोहाचीं फुलें मोठमोठ्या पिपांतून कुजवून नंतर यांत्रिक वाफाऱ्यानें त्याची दारू उतरून घेतात. दारूची शुद्धता पहिल्या प्रतीची राहील अशी व्यवस्था केलेली असते. दारू व दारूचें फूल यांच्या उष्णतेचें व मादकपणाचें मान ठरीव असतें. दारूचा कैस ह्मणजे ४० भाग दारू तर ६० भाग शुद्ध पाणी या प्रमाणांत असतो; आणि बे-

वडा किंवा दारूचा अर्क ह्मणजे ७५ भाग दारू तर २५ भाग पाणी या प्रमाणांत असतो. दारूची व, त्याच्या फूलाची किंमत दर ग्यालनास अनुक्रमें चार आणे व आठ आणे अशी सरकारांतून नियमित करून दिली आहे. या नव्या पद्धतीनें लोकांस दारू चांगल्या ठरीव कसाची, योग्य किंमतीच्या व नियमित मापानें मिळते. आणि प्रत्येक माणसा मागें दारू किती विकावयाची याचेंही प्रमाण ठरविलें आहे. मुख्य मक्तेदार सरकारनें निर्दिष्ट केलेल्या गावीं आपापलीं दुकानें घालतो आणि तालुक्या-निहाय सरकारी भट्टींतून उतरलेल्या दारूचा खजिना ठेवितो व तेथून दारू प्रत्येक दुकानास पोचवितो. एकंदर विक्रीची मोजदात, दारूची स्थिती, मापें वगैरे सर्व गोष्टीवर देखरेख सरकारी अधिकाऱ्यांची रहात असते. या नव्या रीतीनें लोक दारू किती पितात याचा नक्की हिशोब राहतो आणि लोकांचें मद्यपान वाढत्या प्रमाणावर आहे किंवा त्याच्या उलट स्थिती आहे ही गोष्ट सालोसाल कळत जाईल. या पद्धती पासून लोकांचा दारू विषयींचा फायदा असून सरकाराच्या हातीं सर्व व्यवस्थासूत्रें राहतात. या नव्या फेरफारानें सरकारांचें नुकसान होत आहे तथापि एक दोन वर्षांत अधीक स्थिरता होईल व गेल्या दुष्काळांतून लोक हळूं हळूं डोकें वर काढतील तेव्हां सरकारचें उत्पन्न चांगलें वाढेल असा अंदाज आहे. सरकारनें असें प्रमाण अंदाजानें काढलें आहे कीं लोकसंख्येच्या मानानें प्रत्येक माणशीं ९ ड्राम दारू पडेल अशी विक्री निदान होईल. उमरावती व एलिचपूरकडे या अंदाजावर कांहीं ठिकाणीं विक्री झाली होती असें आढळलें. अकोला जिल्ह्यां एकंदर विक्रीची सरकारी दर माणशीं ४० ३९ ड्राम पडते. ही सरासरी फार कमी पडल्यामुळें अशी शंका वाटते कीं दुसरी दारू चोरून विकण्यात येत असावी. या गोष्टी कडे लक्ष पुरविण्यासाठीं अलिशान रेसिडेंट साहेबांनीं डिपुटी कमिशनरास विशेष हुकूम दिले आहेत.

अबकारी खात्यात गेल्या वर्षीं कांहीं महत्वाचे फेरफार झाले आहेत त्यांपैकीं मुख्य चार आहेत. पहिला फेरफार असा कीं आकोला जिल्हा व मलकापूर तालुका यांत सरकारी भट्टीची पद्धती सुरू करण्यांत आली. नवीन अबकारी कायदा वऱ्हाड प्रांतासाठीं करूत तो सरकार भट्टीस लागू केला आणि त्या कायद्या अन्वयें पोट नियम व हुकूम तयार केले,ही दुसरी गोष्ट होय. तिसरा फरक हा कीं अफूच्या कायद्या प्रमाणें पूर्वीं केलेल्या नियमांत सुधारणा करण्या संबंधानें सूचना झाल्या आहेत. शेवटला मोठा फरक असा कीं वऱ्हाड प्रांतासाठीं गांजाचा नवा कायदा लागू केला आणि या प्रांतांतील गांजाचा पेरा बंद करण्यांत आला.

---

खामगांवाहून एक गृहस्थ लिहितात कीं तेथील मुनासिपल शाळेंत ११-८-९८ रोजीं मुलांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ रा० रा० पुरणलाल यांच्या अध्यक्षतेखालीं झाला त्यावेळीं रा० रा० विनायकराव दामले, हेडमास्तर यांनीं शाळेची भरभराट कसकशी होत आहे हें सांगितल्यावर रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं उपदेश केला. त्यांत त्यांनीं शाळेच्या समाधानकारक स्थितीबद्दल वाहवा केली, मुलांच्या खानगी सद्वर्तनाबद्दल दक्षता ठेवण्या विषयीं सुचविलें आणि खामगांव सारख्या श्रीमान पेठेच्या गांवीं ८-९ इयत्ता लोकाश्रय मिळवून चालविणें श्रेयस्कर असून लोकांस सुखावह कसें होईल तें सांगितलें. नंतर बक्षीसें वाटल्यावर समारंभ आटोपला.

---

## The Berar Samachar

MONDAY, AUGUST 22 1898.

Our current system of education has some patent defects therein. The first weak point is that it is purely literary. We do not mean to belittle the due importance of the higher education; it is not that we wish to sacrifice higher education to secure some other sort of training. But a literary education is ill suited to the wants of the largest number of the Indian masses. Their business in life is to run a hard race for bread, Education fails to equip them well for the battle which they have to fight. The general masses have neither the time, nor money nor the special aptitude to digest and appreciate the education that our schools afford. It does not supply us with the general education which ought to be the preliminary ground of a technical training. It does not help the rising generations to pursue at a later stage a course of a professional or technical education. It does not serve as a stepping stone to acquire knowledge of a special branch of study. In pointing to the defective character of our education we have often alluded to its *literary* aspect.

The second defect is the medium through which we are being educated. The medium is the English language and its study has proved a curse to many Indian students. It is often not understood that the study of the English language is only a means to an end. It is not the sole end in view. W learn for years together the language because we cannot do without it. English is now the common vehicle of thoughts. As the language of our rulers we have to master it if we want to make a mark in the courts or the service of the Government. But for the requirements of a few people who are enamoured by the emoluments of the service or the profession connected with the courts or who have the leisure, money and intelligence to pursue a high course of education, the requirements of the general classes of the people are sacrificed. The whole system in India is laid down on the model of a school or college in England; but it ignores the fact that English is not the mother—tounge of the Natives. Herein lies the fatal mistake. The study of English kills our time, wastes our energies, and sacrifies real education. We would learn in one—fourth or one—third of the time what is taught today in English if we were to learn it in our vernacula language. The mother—tongue is a dfstinct advantage and we wish to point out that our general education should be in the languages of our country. Those who have higher aspirations are of course welcome to the present schools and colleges; but for the rest of the people who form the largest and most overwhelming majority, education should be given in their own vernaculars. This is the greatest want of the day. English is no doubt a common language of the world; and knowledge of it is a significant advantage. But English has got too much predominence in our educational coure. The undue preference is a great obstacle to real education and we wish to advertise to this sad point in the current system. The modern tendency is to give the superlative excellence to the English language while it mininizes the value of our vernaculars as an instrument of education. The knowledge of English is no good qualification unless one uses it to learn the vast and rich store of knowledge that the English language contains. Through the native languages, education will advance with rapid strides. A sort of general education will be within an easy reach of the masses. Further it is necessary that the modern sciences should be taught through the medium of the vernaculars. If we once adopt the mother-tongue as the medium of our education we shall have really done a great service to our country. The step will push on education general and technical; and then it will be a distinct measure to raise our country as a manufacturing and materially prospering nation. When we rightly see the worst effects of the English medium of education we shall understand the real import of the introduction of the oriental languages in the University curriculum. The Hon'ble Mr. Justice Ranade is moving heaven and earth for their introduction because he has before him to discharge the important mission of remodelling the present system of education. The mission is of course self-imposed. It is most benign and pregnant with the immense good that is likely to result therefrom. If Rao Bahadur Ranade takes some time before he succeeds in the University, it is equally useful and urgent that we should begin education, middle and high, through the vernaculars. This will be a step in the right direction and we hope that the government will see their way to welcome this measure in right earnestness.

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पाऊस चांगला पडून पाहिजे तितकी उघाडी ही आहे. हवेंत सर्दपणा वाटतो. सध्या खरिपाचीं पिकें सुस्थितींत आहेत. एकंदर पाऊस १६ इंचावर झाला. व हवेंतील उष्णतेचें मान उतरत उतरत ७८ अंशा पर्यंत आलें आहे. रोगराई विशेषतः कोणतीच नसून आरोग्य ऋतु मानानें ठीक आहे.

गेल्या सोमवारा पासून सेशन कचेरी अकोल्यास भरली होती परंतु एक दिवस कचेरीचीं कामें तहकूब राहिलीं होती.

औरंगाबाद कोर्टानें पाठविलेल्या दोन्ही खटल्यांतील आरोपी दोषमुक्त झाले. बुलढाण्यांतील शिलाडी येथील राजश्री दुलीचंद मारवाडी यानें दोघा महारावर रात्रौ चोरीचा केल्याचा खोटा आरोप आणिला असा खटला होता पण निकालांत तो निर्दोषी ठरला. वाशिम जिल्ह्यांतील गमाई नांवाच्या बाईला मारल्या बद्दल रा० रा० देवराव पाटील याजवर खुनाचा आरोप होता पण तो शेवटी निर्दोषी ठरला.

आज सानिटरी कमिशनरच्या अध्यक्षते खाली पेनशनीला लायक लोक ठरविण्यासाठीं सानिटरी बोर्ड बसणार आहे.

यंदा ५ सप्टेंबरला उमरावतीस भरणाऱ्या वकिलीच्या परीक्षेला हेदराबादेकडील वकिलीसाठीं ३ व वऱ्हाडांतील वकिलीसाठीं ९१ मिळून ९४ उमेदवार आहेत.

राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी डिपुटी कमिशनर, इलिचपूर यांस फांशी शिक्षेच्या अपराधा खेरीज इतर खटले चालविण्याचा अधिकार देण्यांत आला.

रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एजुक्याशनल इनस्पेक्टर यांस बाटेल त्या तारखे पासून दोन महिन्यांची रजा देण्यांत आली.

उमरावती जिल्ह्यांतील उमरावती, चांदूर, दत्तापूर, कारंजा येथील आणि यवतमाळ येथील काटन मार्केट कमिटीच्या सभासदांची यादी गेल्या रेसिडेन्सी मध्यें प्रसिद्ध झाली आहेत.

रा. रा. दामोदर नानाजी हे दर्यापूर तहशिलीचा चार्ज घेण्यासाठीं आकोल्याहून गेल्या शुक्रवारीं दर्यापूरास रवाना झाले. आणि तेथील तहशीलदार रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमल्या अन्वयें ते दर्यापूरच्या दिवाणी कोर्टाचें काम पहातील.

पोलीस इनस्पेक्टर मि. नामदार खान वणी जिल्हा यांस गेल्या ५ वे तारखेपासून तीन महिन्यांची रजा देऊन त्या जागीं मि. सुर्ती चीफ यांस इनस्पेक्टर नेमिलें.

रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. यांनीं बाळापूर येथील तहशीलदारीचा चार्ज या आठवड्यांत घेतला.

---

### नोटीस

रा. रा. हरीराम रामकुवार मुंबईकर हल्लीं मुक्काम आकोला दुकान ताजनापेठ यास

नोटीस देणार रामचंद्र जोखीराम रुंगठा तर्फे मुखत्यार विठ्ठल आबाजी कोथळकर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मास तारीख १० माहे आगष्ट सन १८९८ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रांतून नोटीस दिली ती पावली त्यांत आपण जो मजकूर लिहिला आहे तो अगदीं खोटा आहे व तुमचे रुपये आमचे कडे मुळींच नाहींत व आह्मी तुमचा हिशोब तुह्मास समजून दिला आहे तुमचे कडे आमचे रुपये घेणें निघत आहेत जर तुह्मांस हिशोब पाहणें असल्यास तुह्मी आपली वही वगैरे घेऊन आमचे दुकानीं येऊन पंचा समक्ष हिशोब समजून घ्यावा. आणि आमची जी बाकी निघेल ती आह्मांस देऊन आमची रसीद घ्यावी करीता ह्या नोटीसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत वर लिहिल्या प्रमाणें तजवीज करावी या प्रमाणें आपण न केल्यास तुमचेवर सदहू नोटीसीचे खर्चासुद्धां दिवाणीत दावा करून रकम वसूल करण्यांत येईल कळावे तारीख २०।८।९८ इसवी.

सही

रामचंद्र जोखीराम रुंगठा तर्फे

मुखत्या विठ्ठल आबाजी कोथळकर राहणार आकोले

दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

१८९६ च्या कत्तलीत ब्रिटिश, फ्रेंच व इटालियन यांच्या झालेल्या नुकसानीबद्दल कांपनसेशन देण्याचें टर्कीनें नाकारलें.

चीनांत रशिया व इंग्लंड यांच्यांत जों बांधा पडला आहे त्या कामांत अमेरिकेनें इंग्लंडास मदत करावी अशाबद्दल उद्योग सुरू आहे.

आफ्रीकेंत काम करीत असलेले मुंबईच्या ४ थ्या पलटणींतले लोक इतक्यांत परत मुंबईस येतील असा अदमास आहे.

गव्हरनर जनरलांचे प्रायवेट सेक्रेटरी हे हिंदुस्थानचे हिशेबी प्रधान होणार अशी बोलवा आहे. तसें झाल्यास हा एक नवाच मासला ह्मणावयाचा.

सेगांव येथें एक साहेब रहात असून तो एके दिवशीं घोड्यावर बसून बाहेर गेल्यावर कांहीं वेळानें घोडा मात्र परत आला. साहेब वाटेंत घोड्यावरून पडला असावा असें वाटून मडमेनें आपल्या एका चाकरास दुसऱ्या एका घोड्यावर बसवून साहेबाच्या शोधास पाठविलें, कांहीं वेळानें चाकराचा घोडाही रिकामाच आला. मात्र या घोड्यास कांहीं जखम झालेली असून ती वाघनखें लागल्यासारखी दिसत होती. पुढें तपास करितां त्या दोघासही वाघानें मारलें असें आढळलें. त्यांचीं प्रेतें सांपडलीं पण वाघाचा पत्ता लागला नाहीं.

हिंदुस्थानांतले ९ जाट शिपाई लंकेत तेथील गव्हरनराच्या आर्डलीचे काम करण्यांस पाठविण्यांत येणार आहेत. हिंदुस्थानांतले कां?

चीन प्रकरणाबद्दल विलायतच्या पार्लमेन्ट सभेंत मोठी चर्चा सुरू आहे. विचारलेल्या कित्येक प्रश्नास जबाब देताना मि० कर्झन यांनीं सांगितलें कीं, चीनास मदत करण्याचे इंग्लंडानें कबूल केल्याबद्दल चीन आभार मानीत आहे.

इंग्रजास चिंकिंग पर्यंत रेल्वे करण्यास जर्मनी हरकत करीत आहे. जर्मनीच्या या कृत्यास इंग्लंडानें हरकत घेतली त्यावरून शांतंग प्रांतांतून चीनास रेलवे करावयाची असल्यास चीनानें प्रथम जर्मनीस तें काम सांगावें इतकेंच आमचें ह्मणणें आहे असें जर्मनीनें सांगितलें.

न्यु चंग प्रांतांत रेल्वे करण्याच्या संबंधाच्या रशियाच्या सर्व अटी चीनानें कबूल केल्या व त्याबद्दल इंग्लंड विचार करीत आहे.

रशिया तांबड्या समुद्रास आपल्या आरमाराकरितां एक स्टेशन स्थापन करीत आहे.

चीनच्या आंगास इंग्लंड व रशिया यांची कांहीं चढाओढ लागली आहे असें दिसतें. चीनच्या बाजूस हल्लीं इंग्लंडची वेगळालीं ३९ लढाऊ गलबतें सज्ज असून रशिया व इतर राष्ट्रें यांची ४८ आहेत. ठा० अ०

मासे पुष्कळ प्रकारचे आहेत. व त्यांची आयुष्यमर्यादाही कमीजास्त प्रमाणांत आहे. कांहीं मासे असे आहेत कीं, ते आपल्या दुसऱ्या भाईबंदापेक्षां किती तरी जास्त वर्षें जगतात. कार्प नांवाचें मासे सरासरी २०० वर्षेपर्यंत जगतात. सगळ्यांत अत्यंत दीर्घायुषी जात हीच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ० स० १५४६ मध्यें रशियांत एक मासा धरला होता. त्याच्या शेंपटीवर या वरील सनाचा त्याला धरलें त्या वेळीं छाप मारण्यांत आला. सोनेरी मासे आहेत त्यांना आज कमींत कमी साठ साठ वर्षें होरून गेलीं आहेत; तरी ते जसे धरते वेळीं होते तसे अझून आहेत. सेंट पिटर्सबर्ग येथील रॉयल ॲकेरियममध्यें मासे आहेत ते आज सुमारें १५० वर्षें होऊन गेलीं तरी त्या ठिकाणीं आहेत तसे आहेत. त्यांपैकीं कांहीं मासे मात्र पूर्वीपेक्षां पांचपट वाढले आहेत व कांहीं तर एक इंच सुद्धां वाढलेले नाहींत. क.

पंजाबच्या शेतकरी वर्गानें एक जमीनदारी फंड काढला असून त्याला प्रत्येक शेतकऱ्यानें आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग ऐनजिनसी द्यावा असें ठरविलें आहे. अशा रीतीनें जमा झालेलें धान्य तेजीचा बाजार असेल त्यावेळीं विकून टाकावयाचें, व जो पैसा उत्पन्न होईल त्यांतून कांहीं रकमा ज्यांना आपला जमीन जुमला गहाण किंवा खरेदी दिल्याखेरीज संसार चालविणें कठीण जातें अशांना कर्जाऊ द्यावयाच्या आहेत.

व्यापाराच्या सोईसाठीं पाश्चिमात्य लोक ज्या नव्या कल्पना काढीत आहेत, त्यांस कांहीं सीमाच नाहीं. आमच्या वाचण्यांत असें आलें आहे कीं, गव्हांची कणीक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतांना तिच्या बारदानासंबंधानें फार त्रास पडून मालाची नासधूस फार होते; ह्मणून कणीक दाबून तिच्या विटांसारख्या वड्या तयार करण्याची एकानें युक्ती काढली आहे. कणीक दाबल्यामुळें तिच्या अंगचे पाकनिष्पत्तीला अवश्य असलेले गुण नाहींसे होत नाहींत ही एक महत्वाची गोष्ट आहे. ही युक्ति जर इकडे अमलांत येईल तर, इकडून जाणाऱ्या कोऱ्या वगैरे खंडी गव्हांची कणीक इकडेच तयार करून परदेशी पाठवितां येईल, आणि इकडील बिनरोजगारी मंडळीस तेवढा तरी उद्योग मिळेल.

आजपर्यंत लांकडी आगकाड्या तयार होत आल्या आहेत. परंतु आतां कागदी आगकाड्या तयार करण्यांत येऊं लागल्या आहेत.

निझाम हैद्राबादच्या शेजारी प्लेग आल्यामुळें तो हैद्राबादेंत शिरण्याची फार भीति आहे. ह्मणून प्लेग कमिशनर साहेबांनीं २० हजार रुपये निझाम साहेबांपाशीं खर्चास मागितले असून पुढें दरमहां १०।१० हजार रुपये खर्च खर्च करण्याची मंजुरी मागितली आहे. क० त०

म्हैसूरचे बाल महाराजांचा विवाह होण्याचें घाटत आहे. महाराणी मातुश्रीच्या मनांतून उत्तर हिंदुस्थानांतील एखाद्या पिढीजाद रजपूत घराण्यांतील वधू करावयाची आहे व या कामा करितां दिवाणसाहेब सर शेषाद्री आयर हे कांहीं उमरावांसह उत्तर हिंदुस्थानांत निघाले आहेत. म्हैसूरकराचें घराणें अस्सल क्षत्रियांचें असून आपणांस सूर्यवंशी ह्मणवीत असतें

कोल्हापूर येथील मुलींच्या शाळेवरील सुपरिंटेंडेंट सौ० रखमाबाई केळकर यांची कन्या सौ० कृष्णाबाई ईस एल. एम ॲंड. एस ची परीक्षा पास झाल्यावर दरबारांत कांहीं दिवस नोकरी करण्याच्या अटीवर करवीर सरकारानें मुंबई ग्रांट मेडिकल कालेजांत अभ्यास करण्याकरितां ३० रुपयांची स्कालर्शिप दिल्याचें कळतें.

मिशनरी बाईवर खटला—निगापट्टम येथील मिसेस थामस नांवाच्या मिशनरी बाईनें तेथील पोस्टांतील बाईनें तेथील पोस्टांतील शेषय्या नायडू नांवाच्या मनिआर्डर क्लार्कची अल्पवयी मेहुणी घरांतून पळवून नेली. त्याबद्दल त्यानें फिर्याद केली व समन्स लावलें त्याबरोबर तिणें मुलगी नायडूच्या हवाली करून पावती घेतली. आतां तिजवर खटला चालावयाचा आहे. युरोपिन ब्रिटिशप्रजेप्रमाणें आपली चौकशी व्हावी असें तिचें ह्मणणें आहे.

गत वर्षीं सरहद्दीवरील बंडे मोडण्याबद्दल सुमारें ३० लक्ष पौंड खर्च आला.

स्पेन व अमेरिका—या दोन राष्ट्रांमधील चालू लढाईचा अद्याप यावा तसा अंत आला नाहीं. स्पेनची जरी सर्वस्वी हार झाली तरी तें अद्याप अमेरिकेच्या सल्ला करण्याच्या अटी कबूल करीत नाहीं. त्यानें अमेरिकेच्या सरकारास आपलें ह्मणणें पुष्कळ विस्तारपूर्वक कळविलें आहे. त्या सर्व ह्मणण्याचा जबाब जाण्यास बराच अवकाश लागेल असें ह्मणतात, व तोंपर्यंत ही लढाई चालूच राहील असा रंग दिसतो. पोर्टोरिको बंदरावर चढाई घेऊन गेलेलें लष्कर पुढेंच कुच करीत आहे. गेल्या रविवारीं त्या लष्करानें सांजुआन शहरांवर हल्ला केला होता, त्याचा परिणाम काय झाला तो अद्याप समजला नाहीं. परंतु लढाई बंद झाल्याचें चिन्ह अद्याप दिसत नाहीं. फिलिपाईन येथून आलेल्या बातमीवरून असें समजतें कीं, गेल्या ३१ तारखेस सुमारें ३००० स्पॅनिश लष्करानें मनीलाच्या बाहेर छावणी करून राहिलेल्या अमेरिकन लष्करावर हल्ला केला होता; परंतु अतोनात हानि सोसून त्यांस परतावें लागलें. त्यांचे ३०० लोक ठार व १००० जखमी झाले आणि अमेरिकन लष्करांतील ९ इसम ठार झाले व ४७ जखमी झाले. या लढाईचे प्रसंगीं दंगेखोर लोक तटस्थ होते असें ह्मणतात. स्पेन अमेरिकेच्या अटी कबूल करण्यास तयार आहे. परंतु त्यांतही कांहीं अटी त्यांनीं स्वतःच्या घातल्या आहेत. सानतीयागो येथें तापाची सांथ वाढली आहे, व त्यायोगें अमेरिकन व स्पॅनिश लष्करांतील तमाम लोक आजारी पडले आहेत. मनीला येथील लोकांचे फार हाल होत आहेत. तेथील लोक उंदीर खाऊं लागले आहेत व सर्व प्रजेंत भयंकर रोग उद्भवला आहे.

खानदेश जिल्ह्याचे, पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन भाग करण्याचें घाटत असल्याचें समजतें,

चुकलेल्या लहानमुलांच्या आईबापांचा तावडतोब पत्ता लागावा ह्मणून, कोरियांत लहान मुलांच्या गळ्यांत त्या मुलाच्या आईबापाचें नांव व ठिकाणा कोरलेली एक लहानशी लांकडी किंवा पितळी पट्टी बांधण्याचा तेथील पोलिसांनीं कायदा केला आहे.

हुगळी नदीवर एक पूल व एक रेल्वे स्टेशन बांधण्याविषयीं बंगालच्या चेंबर आफ कामर्स कमेटीनें तेथील रेल्वे खात्याच्या सरकारच्या सेक्रेटरीकडे एक पत्र पाठविलें आहे, व त्यांत पूल व स्टेशन बांधण्यापासून कित्येक फायदे दाखविले आहेत.


## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै
१८९८

A. G. Watson
Agent.

## जाहिरात.

वऱ्हाड प्रांतांतील यवतमाळ येथील युरोपिअन रहिवाशी मयत हेनरी अलेक्झांडर हीथ यांच्या इस्टेटी संबंधानें:—

या जाहिरातीनें कळविण्यांत येते कीं गेल्या १८९७ च्या आगष्टच्या २१ वे तारखेला किंवा त्या सुमाराला वर सांगितलेले यवतमाळ येथें सदरहू हेनरी अलेक्झांडर हीथ साहेब मरण पावले आणि त्यांच्या इस्टेटी विषयींचा मृत्युलेख व त्या बरोबरची मृत्युपत्राची पुरवणी बरहुकूम ( लेटर्स आफ आडमिनिस्ट्रेशन ) इस्टेटीची व्यवस्था करण्याचें अधिकारपत्र सन १८९८ च्या जूलैच्या २७ वे तारखेला थामस वुइथे कफी इसक्वायर यांस दिलें असून तें मुंबई इलाख्यांत सर्वत्र चालेल; तर सदरहू हीथ साहेबांच्या इस्टेटी संबंधानें ज्या कोणाचा हक्कसंबंध असेल त्या सर्वांनीं वरील आडमिनीस्ट्रेटर ( व्यवस्थापक ) यांजकडेस त्यांच्या मुंबईच्या फोर्ट मधील "स्टांडर्ड बिल्डिंगस" मधील आफिसांत या नोटिशीच्या तारखे पासून एका सौरमासाच्या आंत आपापले हक्कसंबंध जाहिर करावे. ही मुदत संपल्या नंतर सदरहू आडमिनिस्ट्रेटर त्यावेळे पर्यंत त्यांच्याकडे जे हक्क दारसे केले जातील त्यांचा योग्य विचार करून नंतर सर्व जिन्नगी ते तिच्या हक्कदारास देऊन टाकतील.

वरील मयत गृहस्थाचें ज्या कोणास कांहीं कर्ज द्यावयाचें असेल किंवा त्याची कांहीं जिन्नगी ज्या कोणापाशीं असेल त्या सर्वांनीं आडमिनिस्ट्रेटर यांस कर्ज देऊन टाकावें किंवा त्यांच्या स्वाधीन जिन्नगी करून टाकावी. आज तारीख ६ आगष्ट १८९८ इसवी.

सही
क्रेग लिंच ॲंड ओवेन
आडमिनिस्ट्रेटरचे अटर्नी.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... .... ....८१

Single copy ........

Advert

Below 10 li

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII | AKOLA MONDAY 29 AUGUST 1898 | NO 34

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख २९ माहे आगष्ट सन १८९८ इ० | अंक ३४

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेव-लेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै १८९८ }
A. G. Watson
Agent.

## जाहिरात.

बऱ्हाड प्रांतांतील यवतमाळ येथील युरो-पियन रहिवाशी मयत हेनरी अलेक्झांडर हीथ यांच्या इस्टेटी संबंधानें:—

या जाहिरलेखानें कळविण्यांत येते कीं गेल्या १८९७ च्या आगष्टच्या २१ वे तार खेला किंवा त्या सुमाराला वर सांगितलेले यवतमाळ येथें सदर्हू हेनरी अलेक्झांडर हीथ साहेब मरण पावले आणि त्यांच्या इस्टेटी विषयींचा मृत्युलेख व त्या बरोबरची मृत्युप-त्राची पुरवणी बरहुकूम ( लेटर्स आफ आड-मिनिस्ट्रेशन ) इस्टेटीची व्यवस्था करण्याचें अधिकारपत्र सन १८९८ च्या जूलैच्या २७ वे तारखेला थामस वुइथे कफी इसक्वा-यर यांस दिलें असून तें मुंबई इलाख्यांत सर्वत्र चालेल; तर सदर्हू हीथ साहेबांच्या इस्टेटी संबंधानें ज्या कोणाचा हक्कसंबंध असेल त्या सवानीं वरील आडमिनीस्ट्रेटर ( व्यवस्थापक ) यांजकडेस त्यांच्या मुंबई-च्या फोर्ट मधील " स्टांडर्ड बिल्डिंगस " मधील आफिसांत या नोटिशीच्या तारखे पासून एका सौरमासाच्या आंत आपापले हक्कसंबंध जाहिर करावे. ही मुदत संपल्या नंतर सदर्हू आडमिनिस्ट्रेटर त्यावेळे पर्यंत त्यांच्याकडे जे हक्क वारसे केले जाती-ल त्यांचा योग्य विचार करून नंतर सर्व जिनगी ते तिच्या हक्कदारास देऊन टाकतील.

वरील मयत गृहस्थाचें ज्या कोणास कांहीं कर्ज द्यावयचें असेल किंवा त्याची कांहीं जिनगी ज्या कोणापाशीं असेल त्या सर्वांनीं आडमिनिस्ट्रेटर यांस कर्ज देऊन टाकावें किंवा त्यांच्या स्वाधीन जिनगी करून टाका-वी. आज तारीख ६ आगष्ट १८९८ इसवी.

सही

क्रेग लिंच अँड ओवेन
आडमिनिस्ट्रेटरचे अटर्नी.

## अध्यापण आणि परीक्षण यासंबधानें कांहीं विचार.

[ रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सि-पाल ट्रेनिंग कालेज, यांनीं "विद्यासमाजा" पुढें वाचलेला निबंध ] नंबर ९

आतां अत्यंत महत्वाच्या एका गोष्टीचें थोडें दिग्दर्शन करितों. ती गोष्ट ही कीं प्रश्न आणि उत्तर यांची परीक्षकांनें इतकी सांगड ठेवावी कीं आपण तिऱ्हाईता प्रमाणें राहून नुसतें मुल्य मांडण्यापुरते अधिकारी व्हावें. ह्मणजे प्रश्न काढते वेळींच उत्तराचें मूल्य इतके बारकाईनें ठरवून टाकावें कीं, त्यांत इच्छेचा भाग फारसा राहूं नये. येथें एका गोष्टीचें आह्मास सहज स्मरण येत आहे. कै. पुरुषोत्तम नारायण भट या नांवाचे एक अत्यंत प्रामाणिक व हुशार न्यायाधीश कांही वर्षांपूर्वीं या प्रांतांत होऊन गेले. ते कोर्टांत विनोदानें वारंवार असें ह्मणत कीं, मी तराजू घेऊन बसलों आहे. एक पारडें वादीचें आहे व दुसरें प्रतिवादीचें आहे. ज्यांत पुरावा व कायद्याचे आधार जास्त पडले तिकडे न्याय चालला. असें ह्मणून ते पक्षकारास किंवा वकिलास असें ह्मणत कीं हें पारडें जड झालें; बोला तुमच्या पारड्यांत तुह्मांस कांहीं घालायचें आहे ? या प्रमाणेंच बऱ्याच अंशीं परीक्षकानें न्यायाधिशाप्रमाणें राहून उत्तर आणि मूल्य यांची सांगड ठेवून तिऱ्हाइता प्रमाणें राहणें इष्ट आहे. ज्यांत लहान सहान प्रश्न मिळून उत्तरें वीस पंच-वीस असतात व मूल्य अंदाजानें ५।६ आंक-ड्यांच्या प्रमाणा इतकें असतें. अशा प्रश्नांत दोन दोन उत्तरांना देखील चार आणे मिळत नाहींत. या करितां प्रत्येक लहानसहान उत्त-राचा विचार करून व प्रत्येकास चार आणे तरी मिळावे अशी व्यवस्था करून एकंदर प्रश्नाला मुल्य ठरविलें तर फार बरें पडतें. असें पुष्क-ळ वेळां केलेलें नसतें हें कित्येक पेपर पा-हिले असतां दिसून येईल. असें न केल्याचा परिणाम हा होतो कीं अंदाजानें कांहीं तरी मुल्य दिलें जातें व पुष्कळ वेळां तें योग्या-हून कमी पडतें. कित्येक विषयांत, उदाहरण, गणित, भाषा, भूगोल वगैरे यांत असें करणें सर्वपक्षीं हितावह आहे. कित्येक विषयांत जसें, अक्षर, इतिहासाचे कित्येक ठाकळ प्रश्न यांत तें जुळण्या सारखें नाहीं. अशा ठिकाणीं जें मूल्य देण्यांत येतें तेथें मात्र माजिस्ट्रेटाचें मत, डाक्तराची नजर ह्मणून जसें लौकिकांत विनोदानें बोलतात त्यासा-रखी थोडीशी परीक्षकाची गोष्ट होते. उत्तम अक्षराला समजा ५० मूल्य ठरविलेलें आहे. या ठिकाणीं बऱ्याच चांगल्या अक्षराला परीक्षक आठ दहा मूल्य देतात, या-बद्दल शिक्षकाची बरीच कुरकुर राहते. येथें विचार करण्या सारखा थोडासा प्रश्न तो हा कीं हें जें उत्तम अक्षर हें अति उत्तम लेखक अति उत्तम अक्षर काढूं शकेल तें घ्यावयाचें कीं त्या इयत्तेच्या मानानें उत्त-म परीक्ष्य जें उत्तम अक्षर लिहूं शकेल तें अक्षर. पहिला अर्थ घेणें अर्थात् सयुक्तिक दि-सत नाहीं. व दुसरा अर्थ घेतला तर या संबं-धांत मूल्य दानांत बरीच काटकसर होते. अ-सें ह्मणण्यास हरकत नाहीं. ही गोष्ट वाच-नास ही लागू आहे. या दोन्ही गोष्टींत अ-भिरुचि हा एक मूल्य दानांत मोठाच अंश-असतो तेव्हां यांत ऐच्छिक भाग बराच असतो. ही निरुपायाची गोष्ट आहे. तथा-पि अभिरुचि काढून जितकें मूल्यदान कांहीं नियमित प्रमाणावर बसवितां येईल तितकें बस विलें गेलें तर बरेंच होईल. ह्मणजे 'दधि मधुरं मधु मधुरं' या श्लोकांतील पूर्वार्धा प्र-माणें न्याय देतां येईल तर उत्तम उत्तरार्धा-प्रमाणें न्याय सर्वत्र देण्यांत येतच आहे. पण सर्वांस तो न्याय असा वाटत नाहीं. आणि तें ही ठिकच आहे कारण अभिरुचि आणि न्याय हीं एकत्र कशीं राहतील ? तेव्हां ही बाब व दुसरी वाचनाची बाब ह्या अशा आहेत कीं यांत अभिरुचिहि मूल्य दानांत प्रमुख राहिलीच पाहिजे. तथापि परीक्षण झटलें ह्मणजे सर्व दृष्टींनीं पाहून जितकीं रुचिवैचिव्यें असतील तितक्यांस जागा देतां येईल तर तसें होणें इष्ट आहे. असें केल्यानें वाईट तें चांगलें होईल अशी भीति बाळगणें नको. वाईटा-स कोणीहि भोक्ता सांपडणार नाहीं. तात्पर्य कांहीं ठिकाणीं जरी परीक्षणास नियमबद्ध करितां येत नाहीं तरी तें निवळ स्वैरही अ-सावें असें ह्मणतां येत नाहीं. आणखी एक साधारण महत्वाची गोष्ट अशी कीं परीक्ष्या-च्या एखाद्या दुसऱ्या उत्तरावरून ( ही गो-ष्ट तोंडी परीक्षेस लागू आहे ) परीक्ष्यास बरा किंवा वाईट न ठरविण्या विषयीं खब-रदारी घेतली पाहिजे. तर कांहीं नियमित प्रश्न ठरवून तितके सर्व त्यास वि-चारून जें निष्पन्न होईल तें खरें. तात्पर्य प्रत्यक्ष प्रमाणानें जो सिद्धांत ठरविण्यास सवड आहे तो त्रासानें अनुमान प्रामाणानें काढूं नये ह्मणजे सर्व पक्षीं समाधान राहील. आण-खी एक लहानशी विचाराची गोष्ट आहे ती अशी कीं परीक्षणांत होईल तितकें निस्सत्व असणें इष्ट आहे. तें नसल्यानें शिक्षणाचे ठिकाणीं असमाधान उत्पन्न होण्यास जागा मिळते. उदाहरणार्थ आपण शुद्धलेखन घेऊं. यांत बऱ्याच प्रसंगीं व्यस्त प्रमाणानें मूल्य बदलण्यांत येतें तें असें कीं शुद्धलेखन जर चांगलें असलें तर दोषांबद्दल अधिक मूल्य बाद करण्यांत येतें व शुद्धलेखन वाईट अस-ल्यास कमी मूल्य बाद करण्यांत येतें. असें न होतां या संबंधाचा निर्बंध ठरलेला असणें इष्ट आहे. असाच प्रकार गणित व इतर विषयांत दुसऱ्या तऱ्हेनें होतो. तो असा कीं उत्तरें बरीं आल्यास कठीण प्रश्न विचारण्यांत येतात. व कच्ची तयारी दिसल्यास सोपे प्रश्न विचारण्यांत येतात. असा प्रकार जरी कित्येक धोरणा करितां होत असला तरी तो अविश्वास उत्पन्न करण्यास कारण होतो. न त्यांतही व्यक्ति-भिन्नत्वानें आणखीहि अंतर पडतें. इंग्लंदांत १२१५ त प्रजेनें राजापासून जे कित्येक हक्क संपादन केले त्यांत " सर्व देशांत एक माप व एक वजन चालावें " अशी एक बाब होती. तसेंच परीक्षणाच्या संबंधानें होणें बरेंच इष्ट आहे. हल्लीं शिक्षणाची अं-शतः अशी एक समजूत आहे कीं परीक्षण जितकें कांहीं धोरणावर चालतें तितकें केवळ ठरीव तत्वांवर चालत नाहीं. तात्पर्य ठरीव तत्वांवर परीक्षणाचें अवलंबन राहिलें असतां शिक्षणासही तशाच तत्वांवर आपला उद्योग करण्यास विश्वासानें झटतां येतें. शिक्षणाचें बरेंच असमाधान ज्यांच्या संबंधानें दृष्टोत्पत्तीस येतें असे परीक्षणा सं-बंधानें जे हे कित्येक विचार सांगितले त्यां चा इतरत्र व्याप्ति असली तरी आपणां शिक्षकांसही ते बरेच लागू आहेत. कारण शिक्षण आणि परीक्षण हीं आपलींही दोन्ही अंगें आहेतच. तेव्हां ते आपणही आपल्या परीक्षक या अंगानें लक्षांत ठेवण्या सारखे आहेत.

येणें प्रमाणें कित्येक नेहमींच्या बोलण्यांत-ले व वादाचे विचार वरील लेखांत आह्मी ग्रथित केले आहेत. आपल्या या सभेपुढें भिन्न भिन्न विषयांवर विद्वान शिक्षक नि-बंध वाचणारच आहेत व व्याख्यानें ही दे-णार आहेत. तथापि आपल्या नेहमींच्या शंका व कित्येक गोष्टी बद्दलचे वाद वगैरे या संबंधानें चर्चा करण्यास व एकमेकांचे अनुभव एकमेकांस कळविण्यास सवड द्यावी अशा हेतूनें हे कित्येक त्रोटक विचार मित्रमंडळी पुढें मांडण्याचें आह्मांस योग्य वाटलें. असे विचार अर्थात् अनेक आहेत पण विस्तार भयास्तव येथेंच आह्मी मंडळीची रजा घेतों.

## अहल्या चरित काव्य.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते— यांस.

वि० वि० मागील पत्रांत कबूल केल्या प्रमाणें कै० कुंटे यांनीं संस्कृत पद्धतीचे जु-ने विद्वान आणि इंग्रजी पद्धतीचे नवीन वि-द्वान यांच्या मधील भेदभाव दाखविण्याच्या संबधाचे जे आपले विचार लिहिले आहेत ते प्रस्तुत विषया संबंधानें आपल्या वाचका-

नी वाचण्यासारखे आहेत. कारण ते वाचले असतां प्रकृत काव्याच्या संबंधानें त्यांस स्वतंत्रपणें विचार करण्यास बरें पडेल. व त्यावरून असें ही दिसेल कीं आधुनिक इंग्रजी शिकलेले विद्वान गद्यात्मक लेख कितीही उत्तम लिहित असले तरी पद्यात्मक ग्रंथ ते लिहूं लागले कीं कमजास्त जुन्याच वळणावर लिहितात. दुसरें, खालील भाषांतर देण्यांत माझा असा उद्देश आहे कीं या नवीन इंग्रजी पंडितांस रुचिभिन्नता ह्मणून कांहीं गोष्ट असते हें सांगावें, आणि जें आपणास आवडत नाहीं तें सहन करण्याची आवश्यकता त्यांत कळावी. इतकें त्यांस कळें आणि "जुनी तऱ्हा ह्मणून कांहीं असते; आपणांस आवडत नाहीं असें जगतांत कांहीं असतें; ही एक वेगळी तऱ्हा आहे" इत्यादि प्रकारें शांततेनें विचार करून मार्थेफिरू प्रमाणें त्यांनीं बरळण्याचें सोडून दिलें तरी मोठें कार्य होईल आणि ते खरे विद्वान ह्मणविण्यास पात्र होतील असें मला वाटतें. आतां उपोद्घात विशेष न लांबविता कुंटे यांचे विचार देतो.

"शास्त्रीयांची संख्या मोठी आहे पण त्यांच्या खालोखाल आपल्या नवीन सुशिक्षित मंडळीची बुद्धिमत्ता शास्त्रीयांच्या बुद्धिमत्तेहून श्रेष्ठ असून त्या बुद्धिमत्ते पासून जी शक्ति अंगीं येण्याची तीहि या नवीन मंडळींत जास्त आहे. या नवीन विद्वानांची अभिरुचि सुधारली आहे. त्यांची बुद्धि प्रगल्भ झालेली आहे. त्यांचे सिद्धांत बहुधां बरोबर असून योग्य विचारांतीं झालेले असतात आणि त्यांचीं मनें पूर्व ग्रहापासून मोकळीं असतात. या करितां न्यायासनावर बसण्यास ते योग्य असतात. पण कित्येक गोष्टीमुळें त्यांस योग्य न्याय देववत नाहीं. ते इंग्रजी वाचतात तेव्हां जें स्तुत्य असेल त्याची ते तारीफ करितात, पण त्यांनीं मराठी पुस्तक हातीं घेतलें कीं त्यांची तब्येत जाते. त्यांना इंग्रजी वाचण्याची संवय असते. इंग्रजी काव्य ह्मणजे काय हें त्यांस पूर्ण कळतें आणि त्यांच्या विद्वत्तेच्या योगानें इंग्रजी कवीच्या मनोवृत्तींत प्रवेश करण्यास ते योग्य असतात. यामुळें सौंदर्य शोधून काढून आपल्या चित्ताचें रंजन करण्यास त्यांना अडचण पडत नाहीं, पण मराठी त्यांची स्वभाषा असून तींत त्यांचें असें होत नाहीं. त्या भाषेंत अपक्वता त्यांच्या नजरेस येते. तींतलीं वाक्यें त्यास कशींचशीं वाटतात. आणि ज्या वृत्तांची यांच्या कानांस संवय नाहीं अशीं वृत्तें त्यांच्या दृष्टीस पडतात. आतां शास्त्रीयांविषयीं पाहूं गेलें तर कवितेच्या एखाद्या ओळींत बरेच संस्कृत शद्ब नसले तर ते दगड घेऊन मारायला उठतील, कारण शुद्ध मराठी शास्त्रीयांच्या कानाला अगदीं झों बल्यासारखें वाटतें. तेव्हां आतां दोन गोष्टि झाल्या. पहिली, नवीन विद्वानांस मराठी असह्य वाटते आणि दुसरी, शास्त्री मराठीस नीच समजतात. दोघांमध्यें साधारण एक गोष्ट दिसते. ती ही कीं मराठी भाषा सुधारण्याविषयीं दोघेही खटपट करीत नाहींत, आणि आपापल्या दृष्टीनें दोघे तिची गंमत पहातात. नवीन विद्वान सरकारी नोकरीच्या मागें आणि धंद्याच्या मागें लागल्यामुळें त्यांना मराठी पुस्तकांकडे ढुंकून पहाण्यास वेळ नाहीं. हे गृहस्थ जेव्हां गद्यात्मक मराठी ग्रंथ लिहितात तेव्हां इंग्रजी ग्रंथकारांच्या किंवा बरहुकूम स्थापन केलेल्या नवीन किंवा अपूर्व पाठशाळेंतले आपण आहों असें दाखवितात. पण काव्य लिहूं लागलें ह्मणजे अष्ट अभिरुचीचे संस्कृत-मराठी कवि जे मोरोपंत आणि वामन यांनीं दाखविलेल्या मार्गाचें तंतोतंत आणि मोठ्या उत्साहानें अनुसरण करितात, आणि त्यांचा कित्ता गिरविण्याकडे आजपर्यंतचे त्याचे यत्न झाले आहेत. हा त्यांचा दोष नव्हे. त्यांचा इलाज नाहीं. त्यांनीं जीं पदें आणि साक्या केल्या आहेत व ज्या काव्याच्या संगीत पद्धतीला योग्य आहेत त्या बऱ्याच अंशीं शुद्ध मराठींत आहेत पण त्यांनीं जे श्लोक किंवा आर्या केल्या आहेत तेथें त्यांची भाषा लंगडी पडली आणि मग संस्कृत शद्ब तींत त्यांनीं यथेच्छ घूसडले आहेत. हीं श्लोक आणि आर्या यांचीं वृत्तें माझ्या मतें वीरपराक्रमवर्णनात्मक किंवा यासारख्या दुसऱ्या काव्याला योग्य आहेत. असो. संस्कृत शद्ब घुसडले ते घुसडले पण त्या शद्बांचीं किंवा मराठी शद्बांचीं रूपें बदललीं आहेत व कित्येकांचीं विद्रूप केलेलीं आहेत. ओळी मागें ओळी अशा रचल्या आहेत कीं जरी कविता काळजीनें पुनः पुनः वाचली तरी तिचा अर्थ कळत नाहीं."

कुंटे यांचे हे वरील विचार नवीन विद्वानांनीं केलेल्या काव्यास लागू आहेत, इतकेंच नाहीं तर वामन, मोरोपंत आणि सर्व जुने प्राकृत कवि यांस लागूं आहेत. ज्यांचे ग्रंथ आपल्या सर्व शाळांतून प्रमुखत्वें करून शिकविलेले जातात व ज्यांचा कित्ता सर्व आधुनिक विद्यार्थ्यांपुढें मांडलेला आहे व या विद्यार्थ्यां पैकीं जे पुढें कवि होतील त्यांनीं जणूं काय ज्यांचा कित्ता वळवावा अशी मांडणारांची इच्छा आहे असे जे कवि मोरोपंत आणि वामन त्यांस कुंटे यांनीं भ्रष्ट अभिरुचीचे असें ह्मटलें आहे. कुंटे यांनीं degenerate असा इंग्रजी शद्ब वापरला आहे. शब्दांची मूळरूपें बदलणें, त्यांना विद्रूप आकार देणें, त्यांचे हातपाय लंगडे करणें हे दोष ज्यांत नाहींत असे मराठी जुनें किंवा नवें काव्य एकही सांपडणार नाहीं. आपल्या पत्रांतील टीकाकारांचें मराठी ग्रंथांचें अवलोकन जर तुटपुंजीचें असलें व त्यांच्या टीकेवरून आहे असें खास वाटतें, तर या गोष्टीस माझा इलाज नाहीं. पण कुंटे यांनीं जें लिहिलें आहे तें सर्व मराठी जुन्या व नव्या ग्रंथाच्या संबंधानें आहे. तेव्हां जी स्थिति इतर ग्रंथाची आहे तीच जर अहल्याचरित काव्याची आहे तर सामान्य दोष यांत विशेषत्वें करून दाखविणें ह्मणजे मी मराठी काव्यें मुळींच वाचलीं नाहींत असें स्पष्ट कबूल केल्यासारखें आहे. अहल्याचरित काव्यांत जितके दोष ह्मणून दाखविले आहेत तितके मी मोरोपंत, वामन किंवा वाटेल तो इतर मराठी कवि यांच्या ग्रंथांत काढून देतों. तेव्हां सर्वत्रच जी स्थिति आहे ती दोषात्मक होऊं शकत नाहीं. तिला जी दोषात्मकता आली आहे ती इंग्रजी दृष्टीनें आली आहे. हा लेख मी पुण्याच्या सुधारक पत्रकारांसही वाचण्याची शिफारस करितों. कारण शब्दांचे हात पाय मोडून त्यांचा उपयोग केल्याबद्दल त्यांनींही या काव्यावर टीका करतांना लेखणीचे दोन हात मारले आहेत. मराठींतील शद्ब जसे बोलण्यांत व गद्यात्मक भाषा लिहिण्यांत येतात तसे कोणत्याच कवीनें पद्यात्मक काव्यांत वापरले नाहींत. ऱ्हस्वाचा दीर्घ किंवा दीर्घाचा ऱ्हस्व करणें किंवा अन्य रीतीनें बदलणें किंवा विद्रूपही करणें ह्या जर गोष्टी कमजास्त सर्व ग्रंथांत आहेत तर त्या अमुक एक काव्यांत असल्याबद्दल विधान करण्यांत काय शहाणपण आहे? या विधानावरून लिहिणाराची अविद्वत्ता मात्र दृष्टीस पडते. माझ्या मतें भाषेसंबंधानें अहल्याचरितकाव्य वामन, मोरोपंत किंवा रघुनाथ पंडित यांच्या काव्यासारखेंच येईल. तेव्हां तीं काव्यें जर आपणांस सह्य आहेत तर हेंच असह्य मानण्यास कारण काय? ज्या बुद्धींत मत्सर आणि द्वेषभाव असतील, जी संकुचित असेल, जिला सादृश्य आणि विरोध हे ओळखतां येत नसतील, जुनें तें चांगलें पण त्याच जातीचें नवें तें वाईट असें ह्मणण्या इतकी जी संस्कृत झाली नसेल तीच बुद्धि या काव्यास त्याज्य ह्मणेल. याच्या उलट जी बुद्धि असेल ती जुन्या काव्यांसारखें हें एक आहे इतकें तरी ह्मणेल. हा माझा शेवटचाच लेख आहे. आपल्या पत्रांतील टीकाकारांस थोडें जास्त शहाणपण यावें ह्मणून एका पंडिताचे मराठी काव्या संबंधाचे शांतपणानें व सर्व बाजूंनीं केलेले विचार मी आपल्या पत्रांतून दिले व त्यांस आपण जागा दिली याबद्दल मी आपला आभारी आहे. आपले वाचक वरील व मागील पत्रांत आलेले विचार वाचून प्रस्तुत टीकाकाराची योग्य किंमत करतील अशी मला उमेद आहे. कळावें.

आपला

एक नेमस्त विचारी.

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध १२ शके १८२०

---

इतर प्रांतांत जशा निरनिराळ्या खात्याच्या परीक्षा होत असतात तशा वऱ्हाडांत ही होत असतात. या प्रांतीं पोलीस खातें, फॉरेस्ट खातें, आणि मुलकी व न्याय खातें यांच्या तीन स्वतंत्र परीक्षा सालीना होतात. प्रत्येक खात्याचे नियम व कामाची वहिवाट हीं विशिष्ट प्रकारचीं व ठराविक असतात; आणि तीं त्या खात्यांत शिरलेल्या नव्या माणसास ठाऊक नसतात. तेव्हां त्या खात्यांतील नविशक्या अधिकाऱ्यांनीं सर्व गोष्टींची माहिती करून घ्यावी आणि अशी माहिती चांगली झाली आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं डिपार्टमेंटल परीक्षा घ्यावी असा परिपाठ पडला आहे. या परीक्षांचें महत्व मोठें आहे आणि उत्तरोत्तर त्या कसोशीनें घेतल्या जातील अशा विषयीं सरकारचें मुख्य पहाणें असतें.

हल्लीं विद्यादानाचा प्रसार मोठा आहे आणि सरकारी चाकरी बद्दल चांगल्या चाग ल्या विद्वानांच्या उड्या असतात. यामुळें निरनिराळ्या खात्याच्या परीक्षा अगोदर देऊन नंतर नोकरी द्या असें ह्मणणारे उमेदवार ही पुष्कळ आढळतात. पण या डिपार्टमेंटल परीक्षांची योजना अगदीं उलट आहे. प्रथम एखाद्या गृहस्थाला अधिकार देतात आणि नंतर त्याला त्या अधिकाराची लायकी येण्यासाठीं त्या खात्याची परीक्षा द्यावयाला लावतात. हा पहिला व्युत्क्रम मार्ग होय. या परीक्षेला आणखी पुष्कळ सवलती असतात वर्षांतून दोन वेळा ही परीक्षा होते. एक एक विषय घेऊन हळू हळू परीक्षा पास झालें तरी चालतें. तीन चार वर्षांच्या मुदतींत गोळाबेरजेनें सर्व विषयांत पसार झालें ह्मणजे संपूर्ण लायकी येते. त्या शिवाय ही परीक्षा देखील पुळपुळीतच होत असते. शाळांतील किंवा युनिव्हरसिटींतील परीक्षा प्रमाणें या परीक्षेंत अधिकारी मंडळी चांगली कसाला लागत नाहीं. असा प्रकार असून देखील कधीं कधीं या परीक्षा न उतरल्यामुळें कांहीं अधिकाऱ्यांस रजा देण्यांत आल्या आहेत खरोखर हा अपराध त्या गृहस्थांचा नाहीं पण त्यांस अधिकार देणाऱ्यांचा आहे. ज्याला शिक्षण चांगलें मिळालेलें असतें तो या परीक्षा देण्याला स्वतांस तयार करूं शकतो; परंतु ज्याला नोकरी निव्वळ मेहरबानीवजा मिळाली असते त्याला ती संभाळता संभाळता मोठी पराकाष्ठा करावी लागते. मुलकी खातें व न्याय खातें यांतील नेमणूका मोठ्या चुकीच्या होतात आणि हीच गोष्ट इतर खात्यांस सारखी लागू पडते. अनधिकारी मनुष्यास अधिकार दिल्याचीं उदाहरणें आमच्या प्रांतीं पुष्कळ आहेत; आणि त्यामुळें त्यांस या डिपार्टमेंटल परीक्षांचा मोठा बागूलबोवा वाटतो यांत कांहीं नवल नाहीं. डिपार्टमेंटल परीक्षा खरोखर जितक्या उपयुक्त व्हाव्यात तितक्या होत नाहींत इतकेंच नाहीं तर विद्या खातें शिवाय करून आमच्या प्रांतीं इतर खात्यांत विद्यासंपत्तीला कांहींच मान मिळत नाहीं. इतर खात्यांत हुद्देदारीच्या जागा मिळविण्याच्या किल्या विद्यादेवीच्या हातीं नाहींत. तिकडील संधानें निराळीं असतात, चाकरी मिळण्याच्या लायकीचे गुण निराळे असतात आणि विद्येविषयीं विचारपूस बहुत करून दांभिकपणाची असते. सारांश, डिपार्टमेंटल परीक्षा वाईट नाहींत पण त्या चाकरी देण्या पूर्वीं घेण्याच्या असून मागाहून घेतल्यामुळें त्यांचा दुरुपयोग फार होतो.

---

डिपार्टमेंटल परीक्षेचें पोंकळ महत्व कधीं कधीं फार वाढतें. याला ताजें उदाहरण ह्मणजे एल. एल. बी परीक्षा पसार झाल्या नंतर ही कायद्याच्या विषया संबंधानें देखील या परीक्षे पासून मुक्तता मिळणार नाहीं असा ठराव प्रांतिक सरकारानें केला आहे. एल एल बी ची परीक्षा

ती कोणीकडे व डिपार्टमेंटल परीक्षा कोणीकडे! मोठमोठाले ग्रंथ वाचणाऱ्यास धुळाक्षरी ओनामाच्या परीक्षेला बसविण्या सारखा हा प्रकार दिसतो. हिऱ्याला कोळशा बरोबर कोळशाच्या गुणाची परीक्षा देण्याला बसविण्या इतकी जाडी विद्वत्ता आमच्या स्थानिक सरकारची आहे. सरकारी रीतच चमत्कारिक आहे आणि वारंवार असले प्रकार घडत असतात तेव्हां या ठरावाबद्दल दुःख मानण्यांत कांहीं हांशील नाहीं. हा ठराव रद्द करण्याविषयीं विनंती मात्र आह्मी करीत आहों तेव्हां तिला यथाकाळ योग्य मान मिळेल अशी आह्मी आशा करितों.

मित व्यया सारखा उत्तम किता व्यवहारांत दुसरा नाहीं. व्यक्तिमात्राला व सरकाराला ही गोष्ट सारखीच लागू पडते; किंबहुना सरकाराला मित व्ययाची मातब्बरी फार मोठी आहे कांकीं त्यांच्या कृतीचा परिणाम फार लांबवर पोचतो. आदा पाहून खर्च ठेवावा असा वाडवडिला पासून उपदेश चालत आलेला आहे परंतु सरकाराला हा नियम चांगलासा कबूल नाहीं असें वाटतें. इंडिया सरकारा पासून तो स्थानिक सरकारापर्यंत सर्व राज्यकारभार उधळपट्टीचा चालू असतो. या उधळपट्टीचा तडाखा आमच्या प्रांतालाही भोगावयाला लागत आहे व अधिकाधीक लागणार आहे. आह्मी असें ऐकतों कीं शाळा खात्यांत काटकसर कोणकोणती होण्या सारखी आहे अशा विषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांकडून विचारणा झाली आहे. ही वदंता खरीच असेल तर मोठी दुःखाची गोष्ट होय; आणि असेंहि लोक बोलतात कीं शाळाखात्याकडील एक मोठीशी रकम कमी करण्यांत येणार आहे. मित व्यया खालीं मोडणारी ही काटकसर असती तर आह्मी कांहीं म्हटलें नसतें. परंतु सरकार आपल्या इतर खात्याच्या खर्चाच्या निभावणीसाठीं शाळाखात्यावर गदा घालीत आहे हें वाईट होय. शाळाखातें. खरोखर सर्व खात्यामध्यें श्रेष्ठ होय आणि जर कांहीं खातीं कमी करण्या सारखीं असतील तर शाळा खात्यावर पाळी शेवटीं आली पाहिजे. तशांत आमच्या प्रांतील शाळाखातें मोठेंसें श्रीमान नाहीं व पूर्वी पासूनच तें भिकारी आहे. पैशाच्या अभावामुळें त्या खात्याचे हातपाय तुटल्या प्रमाणें झाले आहेत आणि विद्यादानाची गरज उत्तरोत्तर वाढती आहे अशा स्थितींत वरील प्रकारची काटकसर सुरू होईल असा आह्मास भरंवसा नव्हता. पोट आणि अवयव यांचा जसा परस्पर संबंध आहे तसा शाळाखातें व इतर खातीं यांच्यामध्यें संबंध आहे. शाळाखात्याचें उत्पन्न कमी करणें ह्मणजे पोटाला उपाशी मारल्या प्रमाणें आहे. लष्कराला जशी त्याच्या मोदीवाल्या शाखेची जरूरी आहे तशी राज्यकारभाराला शाळा खात्याची जरूरी आहे. सरकार कद्रूपणा स्वीकारील तर बरें; पण उधळपट्टी करून शाळाखात्याला काटकसर भोगण्याला लावील तर मोठी चूक होणार आहे. या बाबदींत आमचे लोकप्रिय डायरेक्टर राव बहादूर पटवर्धन मोठे खंबीर आहेत आणि ते असल्या काटकसरी संबंधानें नेटानें सरकाराशी भांडून आपला पक्ष खरा करितील अशी आह्मास उमेद आहे,

# The Berar Samachar

MONDAY, AUGUST 29 1898.

In our last issue, we have shown that our education is faulty because we waste time in studing the English language, We call it a waste of time advisedly. We are proportionately put to a disadvantage and the progress of *real* education is arrested to a wide extent. The English language is nothing to 90 per cent of the vast population. Mere knowledge of the foreign language of our rulers is no gain to many people. Their course of life is fixed and at an early age their greatest care is to earn a competent livelihood. Our school-system goes hard with them and does not enable them to run the next race in life. Experience has another story to tell. It indicates a loss of vitality in the young people; and a general weakness or exhaustion comes upon them to cripple their energies at the out-set of this battle. A man is major when he has completed his 18th. year. We presume that he is fit to begin his alphabets at his 6th year. When he is a grown man he can hardly spare himself for further education. An ordinary man has not got means and leisure to pursue a higher course of education. He must look up for some profession or other. In many families this age-limit is also very low; many young men begin work at their 14th. or 16th. year In agricultural and labouring classes, young boys attend to some work of their father and earn so much for the family in the shape of wages for each day of work. So the total period of education is 12 years between the 6th. and 18th. years of our boys. The matriculation-course almost extends to the same period. And we doubt whether a matriculated student is at all useful to himself if he does not accept service. He is unfit for any independent profession and it is this evil to which we wish to advertise today. So our school-course requires a complete revolution. The smattering knowledge of a matriculate is imperfect in all respects and does him no good. He is at sea when he reviews his career as a man of the world. Our system should be improved in many respects. The course of general education should be taught in the vernacular language and should extend for something like eight years and the remaining four years of the total period of education should be utilized in learning some craft or other. This is of course a rough sketch of our proposal. At present we have not got schools to train the young people for an eight years' course of general education in the native languages. This course will be of a great value and we are sure that it will give a solid foundation for the next course of a technical training of four years. We are further sorry that we have no techinical schools worth the name. Thus, the rising generation is starved of education. The present system is quite unsuited for their requirements. Let us look at the facts as they stand. It is no use to ignore them. Our *studied* blindness has paralysed the national industries. We are no longer a nation of industrial people. The whole country is just like a multitudinous conclave of customers for the manufactured articles of the rest of the world. The only profession native to India is agriculture. The Indian soil cannot be removed to foreign countries for the purpose of agriculture. Agriculture is thus forced upon us. Our raw materials are exported and the exports form the whole of the nation's trade. The high figures of the imports indicate the prosperous trade of other European countries. We are thus hooted out of our own houses. We depend upon foreign countries for the commonest articles of daily use. This fact argues that we shall have soon lived our days if we do not make a move to lift ourselves as a materially prospering and manufacturing nation. For this end, the whole system of education must be changed; and the sooner it is done the better. We are very late to effect this change but it is never late to begin a good work.

The 'Indian Budget' passes without a hitch in the Parliament. This is indeed a misfortune. England is the greatest nation in the world because it possesses the Indian Empire; but it is strange that the budget of this vast dependency should not attract sufficient attention of the House of Commons. It is a case of signal injustice when the Indian-budget presents a sham and unreal picture of prosperity in stead of bankruptcy. In the last number of 'India' we have a succinct summary to show that the cost of war is enormous and beats hollow any comparison with the net deficit due to famine and exchange. The increase of debt proves the false buoyancy of India finance. The following remarks are most noteworthy and we give them below in the words of 'India.':—

"Any Government can make Income and Expenditure balance—*for a time*—by a steady recourse to loans. This is the way of the Government of India, but it is not sound finance. Since 1876 about forty crores ( Rx. 40,000,000 ) have been added to India's silver debt and about £70,000,000 to India's gold debt, not all for railways and irrigation works as the Government of India would fondly have us belive. We hope that the connexion between "India paying her way" and "India handing the money market for loas" will be insisted upon at the debate.

According to the official accounts in each period of twenty years ending respectively with 1895-6, 1896-7, 1897-8, there was an accumulated *net deficit*—Sir James Westland's contention to the contrary notwithstanding, But if we ignore such details as deficits, the last twenty years in Indian finance have been characterised by large additions to taxation—by the imposition of new taxes, and the increase of old ones ( *the revenue from taxes, is nearly double what it was twenty years ago* )—by a steady enhancement of land revenue assessments, by enormous increases of both the rupee and sterling debt, by an additon of £2,000,000 to the sterling charges—if any and all these financial expedients constitute "paying your way," then all we can say is, God help the countries who "pay their way" after the manner and according to the methods of the Indian financial authorities."

## वऱ्हाड

हवामान— पाऊस इंच सव्वा इं

च पडला. वारा जोराचा सुटतो. हल्लीं उघाडी आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. रोगराई नाहीं.

येथील स्टेशनच्या मंडळींनीं श्री गणपतीचा महोत्सव नामी केला. तीन चार दिवस आरास रोषनाई, गायनवादनादि करमणुकी यांची गर्दी उडाली होती.

मे० हेअर साहेब यांची स्वारी वाशिमाहून काल परत येऊन यवतमाळाकडे रवाना झाली. साहेब बहादुरांच्या कामाची सरणी अत्यंत वर्णनीय असून कित्ता घेण्यासारखी आहे.

मेजर वारन हेस्टिंगस यांनीं येथील कचेऱ्यांची वार्षिक तपासणी केली.

सानिटरी कमिशनर डाक्टर स्वेन यांस आकोल्याची स्वच्छता पाहून फार आनंद वाटला.


## NOTICE

Tenders are invited for the contracts for the manufacture and supply of country spirit in the areas mentioned below of the Hyderabad Assigned Districts from the 1st April 1899:—

2. Tenders may be made for—

(*a*) the monopoly of manufacture and sale under the Bombay minimum guarantee system now in force in the said areas; or

(*b*) the manufacture and monopoly of supply to retail vendors under the Madras contract distillery system.

3. The duration of any contract will be fixed at the discretion and under the orders of the Resident at Hyderabad. Full particulars of the other conditions under which tenders may be made, and under which the contracts will be granted, can be obtained on application to the Inspector-General of Excise, Hyderabad Assigned Districts, Amraoti Camp.

4. No tenders will be received after noon on the fifteenth day of October 1898.

5. The contract areas are as follows:—

(*a*) Ellichpur Distillery area.

Ellichpur District.—2.623 square miles with a population at the last census of 315,798.

Amraoti District.—2,759 square miles; population 655,645.

Note—As regards this area, tenderers may offer for the contract under either or both systems for the Ellichpur district alone, or for the Amraoti district alone, or for the whole of the Ellichpur distillery area, which includes both the Ellichpur and the Amraoti Districts.

(*b*) Akola Distillery area.

Akola District.—2,659 square miles; population 574,782,

Malkapur Taluk ( of the Buldana District) .—791 square miles; population 177,877.

W. HASTINGS, MAJOR,
*Inspector General of Excise,*
*Hyderabad Assigned Districts,*


## वर्तमानसार

नी वाचण्यासारखे आहेत. कारण ते वाचले असतां प्रकृत काव्याच्या संबंधानें त्यांस स्वतंत्रपणें विचार करण्यास बरें पडेल. व त्यावरून असें ही दिसेल कीं आधुनिक इंग्रजी शिकलेले विद्वान गद्यात्मक लेख किंतीही उत्तम लिहित असले तरी पद्यात्मक ग्रंथ ते लिहूं लागले कीं कमजास्त जुन्याच वळणावर लिहितात. दुसरें, खालील भाषांतर देण्यांत माझा असा उद्देश आहे कीं या नवीन इंग्रजी पंडितांस रुचिभिन्नता ह्मणून कांहीं गोष्ट असते हें सांगावें, आणि जें आपणास आवडत नाहीं तें सहन करण्याची आवश्यकता त्यांस कळावी. इतकें त्यांस कळलें आणि " जुनी तऱ्हा ह्मणून कांहीं असते; आपणांस आवडत नाहीं असें जगतांत कांहीं असतें; ही एक वेगळी तऱ्हा आहे " इत्यादि प्रकारें शांतपणें विचार करून मार्गें फिरू प्रमाणें त्यांनीं बरळण्याचें सोडून दिलें तरी मोठें कार्य होईल आणि ते खरे विद्वान ह्मणविण्यास पात्र होतील असें मला वाटतें. आतां उपोद्‌घात विशेष न लांबविता कुंटे यांचे विचार देतो.

" शास्त्रीयांची संख्या मोठी आहे पण त्यांच्या खालोखाल आपल्या नवीन सुशिक्षित मंडळीची बुद्धिमत्ता शास्त्रीयांच्या बुद्धिमत्तेहून श्रेष्ठ असून त्या बुद्धिमत्ते पासून जी शक्ति अंगीं येण्याची तीही या नवीन मंडळींत जास्त आहे. या नवीन विद्वानांची अभिरुचि सुधारली आहे. त्यांची बुद्धि प्रगल्भ झालेली आहे. त्यांचे सिद्धांत बहुधां बरोबर असून योग्य विचारांतीं झालेले असतात आणि त्यांचीं मनें पूर्व ग्रहापासून मोकळीं असतात. या करितां न्यायासनावर बसण्यास ते योग्य असतात. पण कित्येक गोष्टीमुळें त्यांस योग्य न्याय देववत नाहीं. ते इंग्रजी वाचतात तेव्हां जें स्तुत्य असेल त्याची ते तारीफ करितात, पण त्यांनीं मराठी पुस्तक हातीं घेतलें कीं त्यांची तब्येत जाते. त्यांना इंग्रजी वाचण्याची संवय असते. इंग्रजी काव्य ह्मणजे काय हें त्यांस पूर्ण कळतें आणि त्यांच्या विद्वत्तेच्या योगानें इंग्रजी कवीच्या मनोवृत्तींत प्रवेश करण्यास ते योग्य असतात. यामुळें सौंदर्य शोधून काढून आपल्या चित्ताचें रंजन करण्यास त्यांना अडचण पडत नाहीं, पण मराठी त्यांची स्वभाषा असून तींत त्यांचें असें होत नाहीं. त्या भाषेत अपकता त्यांच्या नजरेस येते. तींतलीं वाक्यें त्यास कशींचशीं वाटतात. आणि ज्या वृत्तांचीं यांच्या कानांस संवय नाहीं अशीं वृत्तें त्यांच्या दृष्टीस पडतात. आतां शास्त्रीयांविषयीं पाहूं गेलें तर कवितेच्या एखाद्या ओळींत बरेच संस्कृत शब्द नसले तर ते दगड घेऊन मारायला उठतील, कारण शुद्ध मराठी शास्त्रीयांच्या कानाला अगदीं झों बल्यासारखें वाटतें. तेव्हां आतां दोन गोष्टि झाल्या. पहिली, नवीन विद्वानांस मराठी असह्य वाटते आणि दुसरी, शास्त्री मराठीस नीच समजतात. दोघांमध्यें साधारण एक गोष्ट दिसते. ती ही कीं मराठी भाषा सुधारण्याविषयीं दोघेंही खटपट करीत नाहींत, आणि आपापल्या दृष्टीनें दोघे तिची गंमत पहातात. नवीन विद्वान सरकारी नोकरीच्या मागें आणि धंद्याच्या मागें लागल्यामुळें त्यांना मराठी पुस्तकांकडे ढुंकून पहाण्यास वेळ नाहीं. हे गृहस्थ जेव्हां गद्यात्मक मराठी ग्रंथ लिहितात तेव्हां इंग्रजी ग्रंथकारांच्या किंव्हा बरहुकूम स्थापन केलेल्या नवीन किंवा अपूर्व पाठशाळेंतले आपण आहों असें दाखवितात. पण काव्य लिहूं लागलें ह्मणजे भ्रष्ट अभिरुचींचे संस्कृत-मराठी कवि जे मोरोपंत आणि वामन यांनीं दाखविलेल्या मार्गाचें तंतोतंत आणि मोठ्या उत्साहानें अनुसरण करितात, आणि त्यांचा कित्ता गिरविण्याकडे आजपर्यंतचे त्याचे यत्न झाले आहेत. हा त्यांचा दोष नव्हे. त्यांचा इलाज नाहीं. त्यांनीं जीं पदें आणि साक्या केल्या आहेत व ज्या काव्याच्या संगीत पद्धतीला योग्य आहेत त्या बऱ्याच अंशीं शुद्ध मराठींत आहेत पण त्यांनीं जे श्लोक किंवा आर्या केल्या आहेत तेथें त्यांची भाषा लंगडी पडली आणि मग संस्कृत शब्द तींत त्यांनीं यथेच्छ घुसडले आहेत. हीं श्लोक आणि आर्या यांचीं वृत्तें माझ्या मतें वीरपराक्रमवर्णनात्मक किंवा यासारख्या दुसऱ्या काव्याला योग्य आहेत. असो. संस्कृत शब्द घुसडले ते घुसडले पण त्या शब्दांचीं किंवा मराठी शब्दांचीं रूपें बदललीं आहेत व कित्येकांचीं विद्रूप केलेलीं आहेत. ओळी मागें ओळी अशा रचल्या आहेत कीं जरी कविता काळजीनें पुनः पुनः वाचली तरी तिचा अर्थ कळत नाहीं. "

कुंटे यांचे हे वरील विचार नवीन विद्वानांनीं केलेल्या काव्यास लागू आहेत, इतकेंच नाहीं तर वामन, मोरोपंत आणि सर्व जुने प्राकृत कवि यांस लागूं आहेत. ज्यांचे ग्रंथ आपल्या सर्व शाळांतून प्रमुखत्वें करून शिकविलेले जातात व ज्यांचा कित्ता सर्व आधुनिक विद्यार्थ्यांपुढें मांडलेला आहे व या विद्यार्थ्यां पैकीं जे पुढें कवि होतील त्यांनीं जणूं काय ज्यांचा कित्ता वळवावा अशी मांडणारांची इच्छा आहे असे जे कवि मोरोपंत आणि वामन त्यांस कुंटे यांनीं भ्रष्ट अभिरुचीचे असें ह्मटलें आहे. कुंटे यांनीं degenerate असा इंग्रजी शब्द वापरला आहे. शब्दांची मूळरूपें बदलणें, त्यांना विद्रूप आकार देणें, त्यांचे हातपाय लंगडे करणें हे दोष ज्यांत नाहींत असे मराठी जुनें किंवा नवें काव्य एकही सांपडणार नाहीं. आपल्या पत्रांतील टीकाकारांचें मराठी ग्रंथांचें अवलोकन जर तुटपुंजीचें असलें व त्यांच्या टीकेवरून आहे असें खास वाटतें, तर या गोष्टीस माझा इलाज नाहीं. पण कुंटे यांनीं जें लिहिलें आहे तें सर्व मराठी जुन्या व नव्या ग्रंथाच्या संबंधानें आहे. तेव्हां जी स्थिति इतर ग्रंथाची आहे तीच जर अहल्याचरित काव्याची आहे तर सामान्य दोष यांत विशेषत्वें करून दाखविणें ह्मणजे मी मराठी काव्यें मुळींच वाचलीं नाहींत असें स्पष्ट कबूल केल्यासारखें आहे. अहल्याचरित काव्यांत जितके दोष ह्मणून दाखविले आहेत तितके मी मोरोपंत, वामन किंवा वाटेल तो इतर मराठी कवि यांच्या ग्रंथांत काढून देतों. तेव्हां सर्वत्रच जी स्थिति आहे ती दोषात्मक होऊं शकत नाहीं. तिला जी दोषात्मकता आली आहे ती इंग्रजी दृष्टीनें आली आहे. हा लेख मी पुण्याच्या सुधारक पत्रकारांसही वाचण्याची शिफारस करितों. कारण शब्दांचे हात पाय मोडून त्यांचा उपयोग केल्याबद्दल त्यांनींही या काव्यावर टीका करतांना लेखणीचे दोन हात मारले आहेत. मराठींतील शब्द जसे बोलण्यांत व गद्यात्मक भाषा लिहिण्यांत येतात तसे कोणत्याच कवीनें पद्यात्मक काव्यांत वापरले नाहींत. ऱ्हस्वाचा दीर्घ किंवा दीर्घाचा ऱ्हस्व करणें किंवा अन्य रीतीनें बदलणें किंवा विद्रूपही करणें ह्या जर गोष्टी कमजास्त सर्व ग्रंथांत आहेत तर त्या अमुक एक काव्यांत असल्याबद्दल विधान करण्यांत काय शहाणपण आहे? या विधानावरून लिहिणाराची अविद्वत्ता मात्र दृष्टीस पडते. माझ्या मतें भाषेसंबंधानें अहल्याचरितकाव्य वामन, मोरोपंत किंवा रघुनाथ पंडित यांच्या काव्यासारखेंच येईल. तेव्हां तीं काव्यें जर आपणांस सह्य आहेत तर हेंच असह्य मानण्यास कारण काय? ज्या बुद्धींत मत्सर आणि द्वेषभाव असतील, जी संकुचित असेल, जिला सादृश्य आणि विरोध हे ओळखतां येत नसतील, जुनें तें चांगलें पण त्याच जातीचें नवें तें वाईट असें ह्मणण्या इतकी जी संस्कृत झाली नसेल तीच बुद्धि या काव्यास त्याज्य ह्मणेल. याच्या उलट जी बुद्धि असेल ती जुन्या काव्यांसारखें हें एक आहे इतकें तरी ह्मणेल. हा माझा शेवटचाच लेख आहे. आपल्या पत्रांतील टीकाकारांत थोडें जास्त शहाणपण यावें ह्मणून एका पंडिताचे मराठी काव्या संबंधाचे शांतपणानें व सर्व बाजूंनीं केलेले विचार मी आपल्या पत्रांतून दिले व त्यांस आपण जागा दिली याबद्दल मी आपला आभारी आहे. आपले वाचक वरील व मागील पत्रांत आलेले विचार वाचून प्रस्तुत टीकाकाराची योग्य किंमत करतील अशी मला उमेद आहे. कळावें.

आपला
एक नेमस्त विचारी.

## वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १२ शके १८२०

इतर प्रांतांत जशा निरनिराळ्या खात्याच्या परीक्षा होत असतात तशा वऱ्हाडांत ही होत असतात. या प्रांतीं पोलीस खातें, फॉरेस्ट खातें, आणि मुलकी व न्याय खातें यांच्या तीन स्वतंत्र परीक्षा सालिना होतात. प्रत्येक खात्याचे नियम व कामाची वहिवाट हीं विशिष्ट प्रकारचीं व ठराविक असतात; आणि तीं त्या खात्यांत शिरलेल्या नव्या माणसास ठाऊक नसतात. तेव्हां त्या खात्यांतील नवशिक्या अधिकाऱ्यांनीं सर्व गोष्टींची माहिती करून घ्यावी आणि अशी माहिती चांगली झाली आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं डिपार्टमेंटल परीक्षा द्यावी असा परिपाठ पडला आहे. या परीक्षांचें महत्व मोठें आहे आणि उत्तरोत्तर त्या कसोशीनें घेतल्या जातील अशा विषयीं सरकारचें मुख्य पहाणें असतें.

हल्लीं विद्यादानाचा प्रसार मोठा आहे आणि सरकारी चाकरी बद्दल चांगल्या चांगल्या विद्वानांच्या उड्या असतात. यामुळें निरनिराळ्या खात्याच्या परीक्षा अगोदर देऊन नंतर नोकरी द्या असें ह्मणणारे उमेदवार ही पुष्कळ आढळतात. पण या डिपार्टमेंटल परीक्षांची योजना अगदीं उलट आहे. प्रथम एखाद्या गृहस्थाला अधिकार देतात आणि नंतर त्याला त्या अधिकाराची लायकी येण्यासाठीं त्या खात्याची परीक्षा द्यावयाला लावतात. हा पहिला व्युत्क्रम मार्ग होय. या परीक्षेला आणखी पुष्कळ सवलती असतात वर्षांतून दोन वेळा ही परीक्षा होते. एक एक विषय घेऊन हळू हळू परीक्षा पास झालें तरी चालतें. तीन चार वर्षांच्या मुदतींत गोळाबेरजेनें सर्व विषयांत पसार झालें ह्मणजे संपूर्ण लायकी येते. त्या शिवाय ही परीक्षा देखील पुळपुळीतच होत असते. शाळांतील किंवा युनिव्हरसिटींतील परीक्षा प्रमाणें या परीक्षेंत अधिकारी मंडळी चांगली कसाला लागत नाहीं. असा प्रकार असून देखील कधीं कधीं या परीक्षा न उतरल्यामुळें कांहीं अधिकाऱ्यांस रजा देण्यांत आल्या आहेत खरोखर हा अपराध त्या गृहस्थांचा नाहीं पण त्यांस अधिकार देणाऱ्यांचा आहे. ज्याला शिक्षण चांगलें मिळालेलें असतें तो या परीक्षा देण्याला स्वतांस तयार करूं शकतो; परंतु ज्याला नोकरी निव्वळ मेहरबानीवरून मिळाली असते त्याला ती संभाळता संभाळता मोठी पराकाष्ठा करावी लागते. मुलकी खातें व न्याय खातें यांतील नेमणुका मोठ्या चुकीच्या होतात आणि हीच गोष्ट इतर खात्यांस सारखी लागू पडते. अनधिकारी मनुष्यास अधिकार दिल्याचीं उदाहरणें आमच्या प्रांतीं पुष्कळ आहेत; आणि त्यामुळें त्यांस या डिपार्टमेंटल परीक्षांचा मोठा बागुलबोवा वाटतो यांत कांहीं नवल नाहीं. डिपार्टमेंटल परीक्षा खरोखर जितक्या उपयुक्त व्हाव्यात तितक्या होत नाहींत इतकेंच नाहीं तर विद्या खातें शिवाय करून आमच्या प्रांतीं इतर खात्यांत विद्यासंपत्तीला कांहींच मान मिळत नाहीं. इतर खात्यांत हुद्देदारीच्या जागा मिळविण्याच्या किल्ल्या विद्यादेवीच्या हातीं नाहींत. तिकडील संधानें निराळीं असतात, चाकरी मिळण्याच्या लायकीचे गुण निराळे असतात आणि विद्येविषयीं विचारपूस बहुत करून दांभिकपणाची असते. सारांश, डिपार्टमेंटल परीक्षा वाईट नाहींत पण त्या चाकरी देण्या पूर्वीं घेण्याच्या असून मागाहून घेतल्यामुळें त्यांचा दुरुपयोग फार होतो.

डिपार्टमेंटल परीक्षेचें पोकळ महत्व कधीं कधीं फार वाढतें. याला ताजें उदाहरण ह्मणजे एल. एल. बी परीक्षा पसार झाल्या नंतर ही कायद्याच्या विषया संबंधानें देखील या परीक्षे पासून मुक्तता मिळणार नाहीं असा ठराव प्रांतिक सरकारानें केला आहे. एल एल बी ची परीक्षा

ती कोणीकडे व डिपार्टमेंटल परीक्षा कोणीकडे ! मोठमोठाले ग्रंथ वाचणाऱ्यास धुळाक्षरी ओनामाच्या परीक्षेला बसविण्या सारखा हा प्रकार दिसतो. डिऱ्याला कोळशा बरोबर कोळशाच्या गुणाची परीक्षा देण्याला बसविण्या इतकी जाडी विद्वत्ता आमच्या स्थानिक सरकारची आहे. सरकारी रीतच चमत्कारिक आहे आणि वारंवार असले प्रकार घडत असतात तेव्हां या ठरावाबद्दल दुःख मानण्यांत कांहीं हांशील नाहीं. हा ठराव रद्द करण्याविषयीं विनंती मात्र आह्मी करीत आहों तेव्हां तिला यथाकाळ योग्य मान मिळेल अशी आह्मी आशा करितों.

मित व्यया सारखा उत्तम कित्ता व्यवहारांत दुसरा नाहीं. व्यक्तिमात्राला व सरकाराला ही गोष्ट सारखीच लागूं पडते; किंबहुना सरकाराला मित व्ययाची मातब्बरी फार मोठी आहे कांकीं त्यांच्या कृतीचा परिणाम फार लांबवर पोचतो. आदा पाहून खर्च ठेवावा असा वाडवडिला पासून उपदेश चालत आलेला आहे परंतु सरकाराला हा नियम चांगलासा कबूल नाहीं असें वाटतें. इंडिया सरकारा पासून तो स्थानिक सरकारापर्यंत सर्व राज्यकारभार उधळपट्टीचा चालूं असतो. या उधळपट्टीचा तडाखा आमच्या प्रांतालाही भोगावयाला लागत आहे व अधिकाधीक लागणार आहे. आह्मी असें ऐकतों कीं शाळा खात्यांत काटकसर कोणकोणती होण्या सारखी आहे अशा विषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांकडून विचारणा झाली आहे. ही वदंता खरीच असेल तर मोठी दुःखाची गोष्ट होय; आणि असेंही लोक बोलतात कीं शाळाखात्याकडील एक मोठीशी रकम कमी करण्यांत येणार आहे. मित व्यया खालीं मोडणारी ही काटकसर असती तर आह्मी कांहीं ह्मटलें नसतें. परंतु सरकार आपल्या इतर खात्याच्या खर्चाच्या निभावणीसाठीं शाळाखात्यावर गदा घालीत आहे हें वाईट होय. शाळाखातें. खरोखर सर्व खात्यामध्यें श्रेष्ठ होय आणि जर कांहीं खातीं कमी करण्या सारखीं असतील तर शाळा खात्यावर पाळी शेवटीं आली पाहिजे. तशांत आमच्या प्रांतील शाळाखातें मोठेंसें श्रीमान नाहीं व पूर्वीं पासूनच तें भिकारी आहे. पैशाच्या अभावामुळें त्या खात्याचे हातपाय तुटल्या प्रमाणें झाले आहेत आणि विद्यादानाची गरज उत्तरोत्तर वाढती आहे अशा स्थितींत वरील प्रकारची काटकसर सुरूं होईल असा आह्मास भरंवसा नव्हता. पोट आणि अवयव यांचा जसा परस्पर संबंध आहे तसा शाळाखातें व इतर खातीं यांच्यामध्यें संबंध आहे. शाळाखात्याचें उत्पन्न कमी करणें ह्मणजे पोटाला उपाशी मारल्या प्रमाणें आहे. लष्कराला जशी त्याच्या मोदीवाल्या शाखेची जरूरी आहे तशी राज्यकारभाराला शाळा खात्याची जरूरी आहे. सरकार कद्रूपणा स्वीकारील तर बरें; पण उधळपट्टी करून शाळाखात्याला काटकसर भोगण्याला लावील तर मोठी चूक होणार आहे. या बाबदींत आमचे लोकप्रिय डायरेक्टर राव बहादूर पटवर्धन मोठे खंबीर आहेत आणि ते असल्या काटकसरी संबंधानें नेटानें सरकाराशी भांडून आपला पक्ष खरा करितील अशी आह्मास उमेद आहे,

# The Berar Samachar

MONDAY, AUGUST 29 1898.

In our last issue, we have shown that our education is faulty because we waste time in studing the English language, We call it a waste of time advisedly. We are proportionately put to a disadvantage and the progress of *real* education is arrested to a wide extent. The English language is nothing to 90 per cent of the vast population. Mere knowledge of the foreign language of our rulers is no gain to many people. Their course of life is fixed and at an early age their greatest care is to earn a competent livelihood. Our school-system goes hard with them and does not enable them to run the next race in life. Experience has another story to tell. It indicates a loss of vitality in the young people; and a general weakness or exhaustion comes upon them to cripple their energies at the out-set of this battle. A man is major when he has completed his 18th. year. We presume that he is fit to begin his alphabets at his 6th year. When he is a grown man he can hardly spare himself for further education. An ordinary man has not got means and leisure to pursue a higher course of education. He must look up for some profession or other. In many families this age-limit is also very low; many young men begin work at their 14th. or 16th. year In agricultural and labouring classes, young boys attend to some work of their father and earn so much for the family in the shape of wages for each day of work. So the total period of education is 12 years between the 6th. and 18th. years of our boys. The matriculation-course almost extends to the same period. And we doubt whether a matriculated student is at all useful to himself if he does not accept service. He is unfit for any independent profession and it is this evil to which we wish to advertise today. So our school-course requires a complete revolution. The smattering knowledge of a matriculate is imperfect in all respects and does him no good. He is at sea when he reviews his career as a man of the world. Our system should be improved in many respects. The course of general education should be taught in the vernacular language and should extend for something like eight years and the remaining four years of the total period of education should be utilized in learning some craft or other. This is of course a rough sketch of our proposal. At present we have not got schools to train the young people for an eight years' course of general education in the native languages. This course will be of a great value and we are sure that it will give a solid foundation for the next course of a technical training of four years. We are further sorry that we have no techinical schools worth the name. Thus, the rising generation is starved of education. The present system is quite unsuited for their requirements. Let us look at the facts as they stand. It is no use to ignore them. Our *studied* blindness has paralysed the national industries. We are no longer a nation of industrial people. The whole country is just like a multitudinous conclave of customers for the manufactured articles of the rest of the world. The only profession native to India is agriculture. The Indian soil cannot be removed to foreign countries for the purpose of agriculture. Agriculture is thus forced upon us. Our raw materials are exported and the exports form the whole of the nation's trade. The high figures of the imports indicate the prosperous trade of other European countries. We are thus hooted out of our own houses. We depend upon foreign countries for the commonest articles of daily use. This fact argues that we shall have soon lived our days if we do not make a move to lift ourselves as a materially prospering and manufacturing nation. For this end, the whole system of education must be changed; and the sooner it is done the better. We are very late to effect this change but it is never late to begin a good work.

The 'Indian Budget' passes without a hitch in the Parliament. This is indeed a misfortune. England is the greatest nation in the world because it possesses the Indian Empire; but it is strange that the budget of this vast dependency should not attract sufficient attention of the House of Commons. It is a case of signal injustice when the Indian-budget presents a sham and unreal picture of prosperity in stead of bankruptcy. In the last number of 'India' we have a succinct summary to show that the cost of war is enormous and beats hollow any comparison with the net deficit due to famine and exchange. The increase of debt proves the false buoyancy of India finance. The following remarks are most noteworthy and we give them below in the words of 'India.':—

"Any Government can make Income and Expenditure balance—*for a time*—by a steady recourse to loans. This is the way of the Government of India, but it is not sound finance. Since 1876 about forty crores ( Rx. 40,000,000 ) have been added to India's silver debt and about £ 70,000,000 to India's gold debt, not all for railways and irrigation works as the Government of India would fondly have us belive. We hope that the connexion between "India paying her way" and "India handing the money market for loas" will be insisted upon at the debate.

According to the official accounts in each period of twenty years ending respectively with 1895-6, 1896-7, 1897-8, there was an accumulated *net deficit*—Sir James Westland's contention to the contrary notwithstanding, But if we ignore such details as deficits, the last twenty years in Indian finance have been characterised by large additions to taxation—by the imposition of new taxes, and the increase of old ones ( *the revenue from taxes, is nearly double what it was twenty years ago* )—by a steady enhancement of land revenue assessments, by enormous increases of both the rupee and sterling debt, by an additon of £2,000,000 to the sterling charges—if any and all these financial expedients constitute "paying your way," then all we can say is, God help the countries who "pay their way" after the manner and according to the methods of the Indian financial authorities."

## वऱ्हाड

हवामान— पाऊस इंच सव्वा इं

च पडला. वारा जोराचा सुटतो. हल्लीं उघाडी आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. रोगराई नाहीं.

येथील स्टेशनच्या मंडळींनीं श्री गणपतीचा महोत्सव नामी केला. तीन चार दिवस आरास रोषनाई, गायनवादनादि करमणुकी यांची गर्दी उडाली होती.

मे० हेअर साहेब यांची स्वारी वाशिमाहून काल परत येऊन यवतमाळाकडे रवाना झाली. साहेब बहादुरांच्या कामाची सरणी अत्यंत वर्णनीय असून कित्ता घेण्यासारखी आहे.

मेजर वारन हेस्टिंगस यांनीं येथील कचेऱ्यांची वार्षिक तपासणी केली.

सानिटरी कमिशनर डाक्टर स्वेन यांस आकोल्याची स्वच्छता पाहून फार आनंद वाटला.


NOTICE

Tenders are invited for the contracts for the manufacture and supply of country spirit in the areas mentioned below of the Hyderabad Assigned Districts from the 1st April 1899:—

2. Tenders may be made for—

(*a*) the monopoly of manufacture and sale under the Bombay minimum guarantee system now in force in the said areas; or

(*b*) the manufacture and monopoly of supply to retail vendors under the Madras contract distillery system.

3. The duration of any contract will be fixed at the discretion and under the orders of the Resident at Hyderabad. Full particulars of the other conditions under which tenders may be made, and under which the contracts will be granted, can be obtained on application to the Inspector-General of Excise, Hyderabad Assigned Districts, Amraoti Camp.

4. No tenders will be received after noon on the fifteenth day of October 1898.

5. The contract areas are as follows:—

(*a*) Ellichpur Distillery area.

Ellichpur District.—2.623 square miles with a population at the last census of 315,798.

Amraoti District.—2,759 square miles; population 655,645.

Note—As regards this area, tenderers may offer for the contract under either or both systems for the Ellichpur district alone, or for the Amraoti district alone, or for the whole of the Ellichpur distillery area, which includes both the Ellichpur and the Amraoti Districts.

(*b*) Akola Distillery area.

Akola District.—2,659 square miles; population 574,782.

Malkapur Taluk ( of the Buldana District) .—791 square miles; population 177,877.

W. HASTINGS, MAJOR,
*Inspector General of Excise,*
*Hyderabad Assigned Districts.*


## वर्तमानसार

गेल्या पंचवीस वर्षांपूर्वी बायका जितक्या उंच होत्या, त्यापेक्षां अलीकडे बायकांची उंची दोन इंचांनीं जास्त वाढली आहे.

मनुष्याच्या डोक्याच्या एका चौरस इंच जागेंत केंसांची संख्या बहुतकरून १००० असते.

एफेल टॉवरच्या घड्याळाच्या लंबका इतका लांब लंबक सगळ्या जगांत नाहीं. त्याची लांबी ३७७ फूट आहे.

समुद्राच्या तळीं सुमारें ५०० फूट खोल फोटोग्राफ घेतां येतात. व तसे पुष्कळ फोटो घेण्यांत आले आहेत.

जर्मनींत स्टेशना स्टेशनावरून चांगले शिकवलेले राघू पाळलेले आहेत. ते स्टेशन प्ल्याटफॉमवर गाडी आली ह्मणजे स्टेशनचे नांव घेऊन सारखें ओरडत असतात.

मनुष्याच्या साऱ्या आयुष्यक्रमांत सरासरीनें एका वर्षांतून नऊ दिवस तरी तो आजारी असतो.

पुरुषां पेक्षां बायकांचा विमा उतरण्यांत पुष्कळ नफा आहे असें कित्येक लाईफ इंन्शुअरन्स कंपन्यांचें मत आहे. स्त्रिया पुरुषांपेक्षां अपघातानें फारच थोड्या मरतात.

तीन मैल चालून येण्याला पायाला जितके श्रम पडतात त्याच्या निम्म्यानेंही बायसिकलवरून पंधरा मैल जाऊन येण्याला पायाला श्रम पडत नाहींत.

सुएजचा कॅनाल सारा ९९ मैल लांबीचा आहे.

प्रतिवर्षीं समुद्रांत २०० जहाजें बुडतात असा अजमास आहे.

प्यारिसमध्यें अलीकडे अशी एक कागदाची जात तयार केली आहे कीं, तो कागद विस्तवांत टाकला किंवा दिव्यावर धरला तरी जळत नाहीं. या कागदाचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं तो कागद १४८ तास पर्यंत विस्तवांत घालून ठेविला होता, पण तो जळला नाहीं.

अमेरिकेंत आज काल २००० स्त्रिया डाक्तरणीचा धंदा करीत आहेत. त्यांपैकीं १६० स्त्रिया होमिओप्याथिक डाक्तरणी आहेत.

चिनी लोकांचे एक 'राष्ट्रीय स्तोत्र' या नांवाचें गाणें आहे तें इतकें लांबलचक आहे कीं तें मात्र ह्मणायला पुरा दिवस लागतो. क०

पायपुसणी— अलीकडे दारांत टाकावयाची पायपुसणी नवीन तऱ्हेची निघालीं आहेत. बाहेरून येणाऱ्या मनुष्यानें त्यांवर पाय देतांच घरांत अडकविलेली घंटा घणघण वाजूं लागून दारांत कोणी आल्याचे घरांतल्या माणसांस समजतें.

आयर्लंडांत १३४ वर्षें वयाचा एक पोष्ट मास्तर असून तो या कामाशिवाय दुसरीं कामें ही करतो ह्मणतात ! हें खरें असेल काय?

फ्रान्स देशांत ब्रिटनी भागांत थोड्या दिवसांपूर्वी एक कोळ्याचा धंदा करणारा वृद्ध गृहस्थ मृत्यु पावला. तो हा धंदा ५० वर्षें करीत होता, परंतु तो पुरुष नाहीं असा कधीं कोणाला ही संशय आला नाहीं. त्यानें आपल्या धंद्यांत बरेच पैसे मिळविले होते व धोंवताळच्या सर्व लोकानां तो प्रिय असे आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यानें एक मेल्यावर दुसरी अशा दोन बायका केल्या होत्या. पण दोन बायका करून ही गोष्ट फुटूं दिली नाहीं! तो मेल्यावर मात्र तो पुरुष नसून स्त्री होता हें लोकांना समजलें व सर्व आश्चर्यचकित झाले.

महाराणी व्हिक्टोरिया यांचें मृत्युपत्र एंवढें मोठें आहे कीं, त्याचें एक पुस्तकच बांधलें आहे!

एकंदर जगांत इंग्रजी भाषा किती लोक बोलतात याचें प्रमाण एका गणिती खटाटोप्यानें काढलें आहे, तें असें--इंग्लंड, स्काटलंड, आयर्लंड मिळून ४,८०,००,०००, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत एकंदर ६,००,००,००० वस्ती आहे. त्यापैकीं ५,७०,००,००० लोक इंग्रजी बोलाणारे आहेत. कानडामध्यें ४०,००,००० आस्ट्रेलिआंत ३०,००,००० वेस्टइंडिअन्बेटांत ३७,००,००० व हिंदुस्थानांत व ब्रिटिश वसाहतींत मिळून एकंदर १०,००,००० या सगळ्यांची बेरीज अदमासें १०,००,००,००० इतकी होते. ही संख्या दिवसानुदिवस वाढतच जाणार.

हालंदमध्यें सकाळीं माणसें जागीं करण्याचें काम कांहीं लोक अगदीं मोठ्या पहांटेस उठून करितात. घरोघर जाऊन "उठा उजाडलें." असें सांगून प्रत्येक घरांतलीं माणसें जागीं करतात. याचें कारण ते लोक पराकाष्ठेचे झोंपाळू आहेत. दिवस दोन तीन तास जरी बाहेर आला असला तरी त्यांची झोंप पुरी अशी मुळींच होत नाहीं यामुळें पुष्कळ धंदेवाईक लोकाचें नुकसान होऊं लागलें. तेव्हां कांहीं लोकांनीं माणसें सकाळींच जाऊन जागीं केलीं असतां आपणाला त्यांच्यापासून कांहीं तरी प्राप्ति होईल या हेतुनें पहाटेस उठून आपल्या नेमलेल्या घरीं जाऊन घरांतील सगळ्या माणसांना उठविण्याचा एक नवीनच धंदा काढला. त्या जागेकरूं लोकांस दर आठवड्याला त्यांच्या कामाचे पैसे मिळतात. व याच धंद्यावर ते लोक आपला उदरनिर्वाह करितात. ते दारावर जाऊन ठोके तरी मारतात अगर नेमलेल्या आळींतून सारखी घांट तरी वाजवीत फिरतात. या धंद्यावर त्या लोकांना पैसेही बरेच मिळतात. सकाळीं तास दोनें तास काम केलें कीं सारा दिवस ते राजासारखे खुशालींत अगर झोंपेंत घालवितात. असा धंदा आजपर्यंत कोठेंही ऐकण्यांत नव्हता. क.

तीन सर्पांची विलक्षण गोष्ट—थोड्या दिवसापूर्वी 'पावर' पत्रांत एक चमत्कारिक हकीकत प्रसिद्ध झाली आहे. कुचबिहार संस्थानांत वडपिहा नांवाच्या गांवीं गेल्या एप्रिल महिन्यापासून एक आश्चर्यकारक प्रकार पाहण्यांत येतो. एका मनुष्यास मुलगा झाला. थोड्याच दिवसांनीं त्या मुलाची आई आपल्या त्या मुलाला सूतिका गृहांतच सोडून थोडी बाजूला कांहीं कामाकरितां जाऊन लागलीच परत आली. इतक्यांत त्या ठिकाणीं बसलेले तीन सर्प तिच्या दृष्टीस पडले. हें तिन्हीही सर्प आपापल्या फडा उभारून एक मध्यमार्गी व दोन दोन्हीकडे बसले होते. ही बाई येतांच ते तिन्ही सर्प पळून गेले. ते सर्प पाहतांच या बाईनें मोठा आक्रोश केला इतक्यांत तिचा नवरा तेथें आला व त्यानें भयभीत होऊन त्यांच्यावर काठी उगारली व एका सर्पावर त्या काठीचा प्रयोग केलाही. त्या सर्पाच्या शेपटावर या काठीचा वार लागला व त्या योगानें त्याची थोडीशी शेंप तुटली. थोडा वेळ गेल्यानंतर पाहतात तो हे तिन्ही सर्प पुनः त्या ठिकाणीं येऊन त्या मुलाजवळ बसले. त्यांतच हा लांडा सर्पही होता. त्यांना पूर्वीं प्रमाणें बसलेले पाहून व त्यांच्यापासून मुलाला कोणत्याही प्रकारची हानि होत नसल्याचा विश्वास त्या उभयतां स्त्री पुरुषांस आल्यावरून तीं त्यांचा छल करीत नाहींत तेव्हांपासून हा क्रम आज तागाईत सारखा चालत आला आहे. मुलाला त्या सर्पापासून कोणत्याही प्रकारची इजा होत नसून ते मनुष्यविरहित मूल राहिलें कीं लागलीच त्याच्या जवळ येऊन बसतात व कोणी मनुष्य येताच लागलींच ते पळून जातात. हा चमत्कार पुष्कळ लोकांनीं पाहिला असून अद्याप तो क्रम चालू आहे. हा चमत्कारच ह्मणावयाचा. मागील अनुभवावरून हा मुलगा वाचला जगला तर मोठा भाग्यशाली निघेल असा पुष्कळ लोकांचा ग्रह झाला आहे. अ.

इंग्रज सरकारच्या एकंदर राज्यांत ३६ कोटि ५० लक्ष लोकसंख्या आहे. पैकीं हिंदुस्थानांत २८॥ कोटी आहे. ही संख्या फ्रान्स, रशिया व जर्मनी यांच्यापेक्षां १८ कोटींनीं अधिक आहे.

ट्रान्सवॉलच्या राज्याधिकारी सभेंत ज्या कोणा आपल्या प्रजेपैकीं मनुष्यास १२ मुलगे होतील त्याला १०० पौंड बक्षीस देण्याचें कायद्याचें बिल पुढें आलें आहे.

वृश्चिकोत्सव—धारवाड जिल्ह्यांत राणेबिनुराजवळ एक वृश्चिक देव आहे. येथें दरसालप्रमाणें थोडे दिवसांपूर्वीं यात्रा भरली होती. हा देव सुधारकांचा नाहीं. मेंढपाळ, गुरेंराखे वगैरेंचा तो देव आहे. यंदांचा उत्सव पाहण्यास धारवाडचे एक वकील व दुसरी बरीच मंडळी गेली होती . त्या मंडळीला वृश्चिकभक्तांचे छोकरे रानांतून विंचू गोळा करतांना दिसले. कोणी ओंजळींत १०१५ विंचू घेतले आहेत; कोणी अंगावर चालवीत आहेत; अशा रीतीनें वृश्चिक देवाच्या पालख्या त्यांनीं ढोल हलग्या वगैरे वाद्यें वाजवीत आणिल्या. देव सिंहासनारूढ झाल्यावर तद्भक्तांनीं त्याचें पूजार्चन केलें; आणि मग देवापुढें ठेविलेल्या पाळ्यांत आणिलेले विंचू अर्पण करण्यास सुरुवात केली; त्यानें अर्धे अधिक पाळें भरलें. चमत्कार असा कीं, ते विंचू मोठाले असूनही त्यावेळीं दंश करीनात. वकील, सबजज्ज, वगैरेंनीं सर्व कल्पना लढवून पाहिल्या; परंतु ते चावत कां नाहींत हें कळेना; ह्मणून आश्चर्यचकित होऊन गेले. ह्या विंचवांपैकीं एक विंचू एका मुलानें घरीं आणतांच तेथें त्यानें नांगीचा सपाटा देऊन त्याला हगेंरे मुतेंरे करून सोडलें. काय चमत्कार असेल तो असो. क० त०

हिंदुपदपातशहा छत्रपति महाराज सातारकर यांच्या जवाहिराचा उघड लिलांव होण्याच्या जाहिराती फडकल्या आहेत. धारवाडचे कालिदासकर्ते यांनीं या बाबतींत एक लेख लिहून हें जवाहीर शिंदे होळकर गायकवाड व कोल्हापूरकर यांनीं आपण खरेदी करावें, व तें परदेशी जाऊं देऊं नये अशी मोठ्या कळकळीनें विनंती केली आहे. तिचा उपयोग कितपत होतो हें पाहणें आहे. याच विषयावर दुसरीकडे एक पत्रव्यवहार दिला आहे, त्याकडे आमच्या रजवाड्यांचें लक्ष जाईल अशी आशा आहे. स० वि०

नैनातील येथील दारूच्या कारखान्यावरचा डोंगर ढासळून त्याखाली भट्टी दडपून गेली आणि युरोपियन आफीसर मि. रिची व दुसरे पुष्कळ लोक ठार झाले.

चीनांत शान्सी येथें एक कोळशाची खाण सापडली आहे ती १४,००० चौरस मैलांची असून त्यांत ६,३०,००,००,००० टण कोळसा आहे. सगळ्या पृथ्वींत आज जो कोळसाचा खप आहे त्या मानानें चालल्यास हा कोळसा सगळ्या पृथ्वीस २००० वर्षेंपर्यंत पुरेल असें होतें! कोळसाही फार चांगला आहे.

इंग्रज व अमेरिकन यांचा चिनांत जो हक्क संबंध आहे त्याकरतां फिलिपाइन बेटे कायम प्रमाणें आपल्या ताब्यांत ठेवणें जरूर आहे असें अमेरिकेंतल्या मुख्य मुख्य वर्तमानपत्रांचें ह्मणणें आहे.

इंग्रजांस मिळालेलें चीनांतलें वई वाई हें ठिकाण व्यापाराचें अगदीं मध्यस्थान असून महत्वाचें आहे असें सांगत त.

मांचेस्टर येथें दोघां बेलिफांच्या खटल्याचा निकाल करीत असतां ता. १६ जुलै रोजीं तेथील कोर्टाचा जज्ज पारी यास गोळी घालून ठार करण्यांत आलें.

विलायतेस लंडन शहरांत उन्हाळा फार होत असून उन्हाळ्याच्या कारणानें कित्येक लोक मरत आहेत. अ०

हिंदुस्थान सरकारानें एक लष्करी कमिटी नेमून सर हट्टीवरील गत वर्षाच्या लढाईंत मेलेल्या मनुष्यांचे संबंधानें बारसास प्रत्येक युरोपियन शिपायास १५० रुपये आणि पेन्शनदार नेटिवाला ७५ व बिन पेन्शनदारास १०० रुपये प्रमाणें पेट्रिआटिक फंडांचे पैसे द्यावे असें ठरविलें आहे.

माळव तालुक्याच्या करंजगांवचे प्रसिद्ध वाघ मारणारे विद्वान बे० रा० रा० रामभटजी मराठे यांना नुकतीच देवाज्ञा झाल्याचें समजलें आहे. हे चांगले वैदिक, ज्योतिषी व चितारी असून त्यांनीं एकंदर ६० वाघ हिंमतीनें मारिले होते. श०

तक्तपोशीची जमीन—प्यारिस शहरांत पुष्कळ ठिकाणीं लांकडांच्या तुकड्यांची जमीन करीत असत. परंतु अशा जमिनींत अनंत सूक्ष्म कीटक राहतात व अंडीं घालतात, असें समजल्यावरून आतां असल्या जमिनी करीत नाहींत.

तुरटीचें पाणी अंगाला चोपडावें ह्मणजे डास डसत नाहींत, असें एकजण ह्मणतो तर याचा अनुभव घेऊन पहावा.

पर्जन्यातिशयानें भडोचकडील कापूस व बाजरी या पिकांना बरेंचसें नुकसान पोंचलें आहे. क. त.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.